
म.ग्रं.सं. ठाणे
विषय : भू. प्रवास
सं. क्र. : ८०



REFBK-0006246

मुद्रक व प्रकाशक

लक्ष्मण नारायण चापेकर, आर्यसंस्कृति मुद्रणालय

१९८/१७ सदाशिव, टिळक रस्ता, पुणें २

# प्रस्तावना

अकराव्या आवर्तनाने एकादशणीची पूर्तता होते त्याप्रमाणे ह्या माझ्या अकराव्या ग्रंथपुष्पाने लेखनार्चनाची परिसमाप्ति होत आहे. त्यांतहि हें शेंडेपुष्प निखिल जगाचें पाप धुऊन टाकणाऱ्या गंगा-यमुनांसारख्या पवित्र नद्यांवर पडत आहे ही संदेहाकुल मनालाहि क्षणभर समाधान देणारी गोष्ट आहे.

यूरल व विंध्य पर्वतांपेक्षा हिमालय जरी वयाने कनिष्ठ असला तरी उंचींत व भव्यपणांत तो सर्व जगांत श्रेष्ठपणाचा मान पटकावून बसला आहे ह्यांत संशय नाहीं. अशा ह्या हिमगृहाचें दर्शनच काय पण आक्रमणहि झाल्याने साभिमान आनंद झाल्यावांचून राहत नाहीं. गंगोत्री, जमनोत्री, केदार-बदरी व पशुपति ही पंचस्थली म्हणजे अर्धा हिमालय होय. ह्या आम्हीं पाहिलेल्या हिमालयांतील सर्व प्रकारची सृष्टि लोकोत्तर आहे. देखणीं जनावरें, वैविध्यपूर्ण सुंदर वृक्षावलि, विशाल प्रस्तर आणि कष्टाळू, कणखर पण गोंडस, सुजाण व उमदा जनसमूह ह्यांचें चित्ताकर्षक चित्र उभारण्याचें कौशल्य माझ्या लेखणींत कधींच नव्हतें व आजहि नाहीं. तसेंच माझी दृष्टि उजू; नसलेलें पाहणारी कवीची दृष्टि मला नाहीं. गंगेच्या पात्रांत शौचविधि करून सर्वत्र लोकांनी करून ठेवलेला हिडिसपणाच मला दिसतो. आकाशांतील तारे मला तारेच दिसतील. वाऱ्याने हलविलेल्या वृक्षांचा विप्रकीर्ण कुसुमचय माझ्या डोळ्यांना दिसणार नाहीं. ह्यास्तव ह्या माझ्या प्रवासपुस्तकांत सृष्टिसौंदर्याच्या अलंकारिक व मोहक वर्णनांची मेजवानी रसिकांना मिळणार नाहीं किंवा मादक व चंचल कल्पनांच्या क्रीडाहि अवलोकितां येणार नाहींत. हिमालयांत नैसर्गिक स्थितींत ओबडधोबड दगडांचे तुकडे चोहोंकडे पडलेले असतात त्याच नमुन्याच्या भरड व चरबट शब्दशलाकांतून येथे वाचकांस ठेचाळत जावें लागेल. मीं जें पाहिलें व ऐकलें तें तसेंच्या तसेंच येथे दिलें आहे; मात्र माहिती बरोबर मिळावी म्हणून कसून प्रयत्न केला आहे.

नेपाळ-टेहरीच्या लहानमोठ्या अधिकाऱ्यांनी मला माहिती पुरविली. उत्तरकाशीचे तहसीलदार व सध्या देवप्रयाग येथे सबडिव्हिजनल ऑफिसर म्हणून काम करीत असलेले मामराजसिंग ह्यांच्याकडून मला टेहरी संस्थानच्या कायद्याचें

# हिमालयांत

६२५४

लेखक

नारायण गोविंद चापेकर

REFBK-0006246

REFBK-0006246

कार्तिक वद्य ३ शक १८६३

मूल्य पावणेतीन रुपये

मुद्रक व प्रकाशक

लक्ष्मण नारायण चापेकर, आर्यसंस्कृति मुद्रणालय

१९८/१७ सदाशिव, टिळक रस्ता, पुणें २

# प्रस्तावना

अकराव्या आवर्तनाने एकादशणीची पूर्तता होते त्याप्रमाणे ह्या माझ्या अकराव्या ग्रंथपुष्पाने लेखनार्चनाची परिसमाप्ति होत आहे. त्यांतहि हें शेंडेपुष्प निखिल जगाचें पाप धुऊन टाकणाऱ्या गंगा-यमुनांसारख्या पवित्र नद्यांवर पडत आहे ही संदेहाकुल मनालाहि क्षणभर समाधान देणारी गोष्ट आहे.

यूरल व विंध्य पर्वतांपेक्षा हिमालय जरी वयाने कनिष्ठ असला तरी उंचींत व भव्यपणांत तो सर्व जगांत श्रेष्ठपणाचा मान पटकावून बसला आहे ह्यांत संशय नाही. अशा ह्या हिमगृहाचें दर्शनच काय पण आक्रमणहि झाल्याने साभिमान आनंद झाल्यावांचून राहत नाही. गंगोत्री, जमनोत्री, केदार-बदरी व पशुपति ही पंचस्थली म्हणजे अर्धा हिमालय होय. ह्या आम्हीं पाहिलेल्या हिमालयांतील सर्व प्रकारची सृष्टि लोकोत्तर आहे. देखणीं जनावरें, वैविध्यपूर्ण सुंदर वृक्षावलि, विशाल प्रस्तर आणि कष्टाळू, कणखर पण गोंडस, सुजाण व उमदा जनसमूह ह्यांचें चित्ताकर्षक चित्र उभारण्याचें कौशल्य माझ्या लेखणींत कधींच नव्हतें व आजहि नाही. तसेंच माझी दृष्टि उजू; नसलेलें पाहणारी कवीची दृष्टि मला नाही. गंगेच्या पात्रांत शौचविधि करून सर्वत्र लोकांनी करून ठेवलेला हिडिसपणाच मला दिसतो. आकाशांतील तारे मला तारेच दिसतील. वाऱ्याने हलविलेल्या वृक्षांचा विप्रकीर्ण कुसुमचय माझ्या डोळ्यांना दिसणार नाही. ह्यास्तव ह्या माझ्या प्रवासपुस्तकांत सृष्टिसौंदर्याच्या अलंकारिक व मोहक वर्णनांची मेजवानी रसिकांना मिळणार नाही किंवा मादक व चंचल कल्पनांच्या क्रीडाहि अवलोकितां येणार नाहीत. हिमालयांत नैसर्गिक स्थितींत ओबडधोबड दगडांचे तुकडे चोहोंकडे पडलेले असतात त्याच नमुन्याच्या भरड व चरबट शब्दशलाकांतून येथे वाचकांस ठेचाळत जावें लागेल. मीं जें पाहिलें व ऐकलें तें तसेंच्या तसेंच येथे दिलें आहे; मात्र माहिती बरोबर मिळावी म्हणून कसून प्रयत्न केला आहे.

नेपाळ-टेहरीच्या लहानमोठ्या अधिकाऱ्यांनी मला माहिती पुरविली. उत्तरकाशीचे तहसीलदार व सध्या देवप्रयाग येथे सबडिव्हिजनल ऑफिसर म्हणून काम करीत असलेले मामराजसिंग ह्यांच्याकडून मला टेहरी संस्थानच्या कायद्याचें

पुस्तक मिळालें. त्या पुस्तकाचा उपयोग मीं मिळवलेली माहिती ताडून पाहण्याच्या कामीं फार झाला. नेपाळांत मला विठ्ठलशास्त्री पाध्ये ह्यांचें अप्रतिम साहाय्य मिळालें. ह्या सर्वांचा मी अत्यंत ऋणी आहें. करमरकरांनी मला माहिती दिली तिची तर किंमतच करतां येण्यासारखी नाही. ह्यांनी प्रथम मला वाटाण्याच्या अक्षताच लावल्या. माझा नेट लागलेला पाहून तुम्ही प्रश्न विचारा, त्याचें उत्तर देईन म्हणूं लागले. अखेरीस त्यांची खात्री पटतांच मनमोकळेपणाने त्यांना माहीत होतें तें सर्व मला त्यांनी सांगितलें.

नेपाळांत माहिती देण्यास लोक कचरतात. भाषण-स्वातंत्र्य दिसण्यांत तरी आलें नाही. आम्ही नेपाळांत जाण्यापूर्वी नुकताच सरकारने चारपांच तरुणांचा बली घेतला होता अशी कुजबूज माझ्या कानीं आली. ह्या तरुणांचा अपराध म्हणजे राज्यकारभारांत सुधारणा करा ही विनंती. नेपाळांत वर्तमानपत्र नाही; सभा भरूं देत नाहीत. अशा स्थितींत कांही नवशिक्षित तरुणांनी मुख्य प्रधानांच्या आवाराच्या भिंतीवर हस्तलिखित सूचनांचा कागद चिकटविला. ह्या अक्षम्य व प्रघोर अपराधाबद्दल बिचारे प्राणास मुकले. कायद्याने मनुष्यवधाची शिक्षा ठेवलेली नाही, पण हत्या म्हणजे वध नाही ! एकंदरींत स्वतंत्र देशाची व्याख्या अशी करतां येईल की, ज्या देशांत राजाला आपल्या प्रजेवर मनसोक्त अंमल चालवितां येतो तो देश स्वतंत्र ! हिंदुस्थानांतील हिंदूंना नेपाळ सरकाराविषयीं अभिमान वाटतो; परंतु नेपाळ सरकारला हिंदुस्थानांतील हिंदूंविषयीं अभिमान किंवा कळकळ वाटते असें मला वाटत नाही. नेपाळ सरकारच्या कपाळावर स्वातंत्र्याचें कुंकू ब्रिटिश सरकारच्या मेहेरनजरेमुळेच राहिलें आहे. ह्या स्वतंत्र (?) देशांत साहेब व हिंदु ह्यांचा दर्जा सारखाच असावयास पाहिजे तथापि अनुभव मात्र निराळा आला. कुलीखानीहून परत येतांना वाटेंत पासपोर्ट तपासण्याची कचेरी आहे. त्या ठिकाणीं आमची तासभर खोटी झाली. कारण काय तर दोन साहेब नेपाळास जावयाचे होते, त्यांचा खाना चालला होता. ह्या साहेबांकरिता रस्ता सोडून कडेला सर्वांस बसावें लागलें. साहेबमजकूर गेले तेव्हा इतरेजनांची दाद लागली. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ब्रिटिश सरकारच्या मांडलिकाहून नेपाळच्या राजाचा अधिक दर्जा लावणें कठीण पडेल. नेपाळचा राज्यकारभारहि अद्यापि जुन्या वळणावर आहे. मनुयाज्ञवल्क्यांच्या काळांत नेपाळ वावरत आहे. आधुनिकतेचा जो थोडा प्रकार दिसतो तो स्वतःच्या ऐपआरामाच्या वांच्छेचें फल

होय. मनुयाज्ञवल्क्याचा अंमल जरी नेपाळांत असला तरी ह्या दोन विद्वानांच्या ग्रंथांतील राजव्यवहारप्रकरणें फाडून टाकलेले असावेत असें दिसतें.

रा. द. ग. कुलकर्णी ह्यांनी लिहिलेल्या "केदार आणि नारायण" ह्या पुस्तकाच्या प्रस्तावनेंत यात्रा व प्रवास ह्यांतील भेद मीं विशद केला आहे. तसेंच प्रवाशाला माहिती जमविण्याच्या कामीं येणाऱ्या अडचणींचाहि उल्लेख केला आहे. त्या सर्वांची मी येथे पुनरुक्ति करीत नाहीं. तथापि प्रवाश्याने सामान्यतः कोणत्या गोष्टींचें निरीक्षण करावें हें सांगणें अप्रस्तुत होणार नाही. माझ्या मतें स्थलांची भौगोलिक स्थिति, हवामान, पर्जन्य, वृक्ष, पशु, पक्षी, घरांची बांधणी, स्त्री-पुरुषांचे चेहरे (डोळे, नाक, रंग), पोषाख, अलंकार, भाषा, आचार, धर्म, देवळें, शासनपद्धति, पंचांग अथवा कालगणना, उद्योगधंदे व सामाजिक चालीरीती इतक्या गोष्टींची नोंद सुशिक्षित प्रवाशांनी आपल्या प्रवासग्रंथांत करणें जरूर आहे. 'नानाश्चर्यनिरीक्षण' हा प्रवासाचा हेतु असला पाहिजे. ह्या दिशेने मीं प्रयत्न केला आहे. तो साधला आहे असें मी म्हणत नाही.

केवळ छापतां येतें ह्या सवलतीचा उपयोग करून पुष्कळ लिखाण प्रसिद्ध केलें जातें. परंतु तर्कशुद्ध अनुमानें आम्हांस काढतां येत नाहींत; कार्यकारणभाव उपेक्षिला जातो; कोणत्या गोष्टीस किती महत्त्व द्यावें ह्याचें ज्ञान नाही, व समर्पक शब्द उपयोजण्याचें साधत नाही. लेखनविद्येचा शास्त्रोक्त अभ्यास आम्ही करीत नाही. अभ्यास केला तरी अभ्यासकाची प्रतिभा म्हणून एक चीज आहेच. संस्कृतांत एक श्लोक आहे– अश्वःशस्त्रं शास्त्रं वीणा वाणी नरश्च नारी च। पुरुषविशेषं प्राप्ता भवन्ति योग्या अयोग्याश्च ॥ माझ्या दोषांची मला जाणीव उत्पन्न झाली आहे. एवढेंच नव्हे तर आपल्या लिहिण्याने आपण टाकाऊ ग्रंथांत तर भर घालीत नाहीं ना अशीहि शंका केव्हा केव्हा डोकावते. सईबाईसंबंधाने नेपाळांत मला अभिनव माहिती मिळाली नसती तर मी ही पुस्तक प्रसिद्ध करण्याची उठाठेवहि केली नसती. आजपर्यंत प्रसिद्ध न झालेली ही माहिती आहे.

पुस्तक छापण्याच्या कामीं आर्यसंस्कृति मुद्रणालयाचे व्यवस्थापक श्री. य. ग. वझे ह्यांनी फार परिश्रम घेतले. फोटोंची निवडानिवड त्यांनीच केली. मला त्यांत विशेष गम्य नाही. श्री. बाळासाहेब पंत, त्यांचे चिरंजीव भय्यासाहेब, रा. ब. अत्रे, व रा. श्री. रा. टिकेकर ह्यांनी घेतलेले फोटो ह्या पुस्तकांत वापरले आहेत. ह्या सर्वांचा मी अत्यंत आभारी आहें.

शुद्धलेनासंबंधी दोन शब्द लिहिणें अवश्य आहे. शुद्धलेखनसमितीचे नियम अनुसरले आहेत हें सांगण्याची गरज नाही. तथापि एकच शब्द अनेक रीतींनी लिहिलेला वाचकांस आढळेल. ह्याचें मुख्य कारण म्हणजे एकाच्या हातचा सर्व मजकूर लिहिलेला नाही; उ० काटमांडू-खाटमांडू; वीरगंज-बीरगंज; समशेर-शमशेर; जमनोत्री-जम्नोत्री.

उच्चारभेदामुळे लेखनभेद अपरिहार्य आहे. कित्येक ठिकाणीं तो मुद्दाम राखावा असेंहि वाटतें. उ. वीरगंज व बीरगंज. बंगाली लोक वचा ब उच्चार करतात. परंतु बीरच्या ऐवजी वीर म्हटल्याने महाराष्ट्रीयांस सहज अर्थबोध होतो.

संस्कृत भाषेच्या अभ्यासाने अर्वाचीन मराठींत लेखनभेद बऱ्याच प्रमाणांत होऊं लागला. संस्कृत भाषेचें वळण वेगळें व मराठीची प्रवृत्ति वेगळी. दक्षिणा हा संस्कृत शब्द; परंतु मराठींत इचा लोप होण्याची प्रवृत्ति. त्यामुळे एकच शब्द पण दक्षिणा व दक्षणा अशा दोन प्रकारांनीं लिहिला जातो. कारण उच्चार दोन होतात. त्याचप्रमाणे शनिवार-शनवार. मधल्या इचा लोप होणें हा मराठीचा स्वभाव; उ० गिरिजा-गिरिजाबाई-गिरजाबाई; गोचिडी-गोचडी. तात्पर्य हा लेखन-भेद अपरिहार्य आहे. ह्याशिवाय स्थानिक लोक व बाहेरचे प्रवासी ह्यांच्या उच्चा-रांत फेर पडतो. नेपाळी लोक भीमफेदी, आम्लेखगंज, थामकोट असे उच्चार करीत असले तर इंग्रेजी शब्दांवरून उच्चार करणारा प्रवासी तींच स्थळें निराळ्या तऱ्हेने उच्चारतो.

पशुपतीचें देवालय ज्या नदीच्या कांठीं आहे त्या नदीच्या नांवाचा उच्चार तिकडे वाग्मती-बागमती असा करतात. तथापि एखादा चोखंदळ संस्कृतज्ञ वाङ्मती असा उच्चार करण्याचा आग्रह करतोच. कारण त्याच्या विचारांची धांव पुराणत्वाकडे असते. असो; शेवटीं—

निर्वपामि लिखितानि वह्नये
निर्वृतेन मनसा— अतःपरम् ।
जीवितावधि मिता वहन् समाः ।
निष्क्रियत्वमपि शर्मदं भवेत् ॥

बदलापूर
कार्तिक वा। ३ श. १८६३ }

**ना. गो. चापेकर**

# चित्रानुक्रम

## नेपाळ


| अनुक्रमांक | चित्राचें नांव | छायाचित्रकार |
|---|---|---|
| १ | पशुपतीचें मंदिर | श्री. रा. टिकेकर |
| २ | भूतनाथ मंदिर | ” |
| ३ | नेपाळांतील रज्जुमार्ग | ” |
| ४ | थापथली-विजयस्तंभ | ” |
| ५ | लक्ष्मीनारायणाच्या मूर्ति | नेपाळांतील छायाचित्रकार |
| ६ | लक्ष्मीनारायणाचें मंदिर | ” |
| ७ | हिमालयांतील वाहनें—कंडी (पेन्सिल स्केच) | य. ग. वझे |
| ८ | ” दंडी | श्रीमंत राजेसाहेब पंत |
| ९ | नेपाळी (नेवारी) विणकर कन्या | श्री. रा. टिकेकर |
| १० | फीत विणणारी भूतिया स्त्री | ” |
| ११ | पहाडी धनगर | रावबहादूर अत्रे |
| १२ | नेपाळी मच्छीमार व त्यांचीं साधनें | श्री. रा. टिकेकर |
| १३ | श्री. कापरेकर व श्री. वासुदेवराव चापेकर | रावबहादूर अत्रे |
| १४ | गंडकी तीरावरील माघी पौर्णिमेचें धर्मकृत्य | श्री. रा. टिकेकर |
| १५ | माघोत्सवांतील मिरवणूक | ” |


## गंगोत्री-जमनोत्री


| अनुक्रमांक | चित्राचें नांव | छायाचित्रकार |
|---|---|---|
| १६ | हरिद्वार गंगाघाट | रावबहादूर अत्रे |
| १७ | ” गंगेशेजारी | ” |
| १८ | जमनोत्री पहाड | श्रीमंत राजेसाहेब पंत |
| १९ | टेहरीजवळून गंगा | श्री. भय्यासाहेब पंत |
| २० | भटवाडी चट्टीजवळ | ” |
| २१ | गंगोत्रीच्या वाटेवर | ” |
| २२ | उत्तरकाशी मंदिर | श्रीमंत राजेसाहेब पंत |
| २३ | पहाडांतील अवघड रस्ता | ” |
| २४ | शिवमंदिर, धराली | ” |
| २५ | देवद्वार झाडें, हरसीलजवळ | श्री. भय्यासाहेब पंत |

| | | |
|---|---|---|
| २६ | गंगोत्री | श्रीमंत राजेसाहेब पंत |
| २७ | हिमालयांतील वनश्री | ,, |
| २८ | चिडचीं झाडें | श्री. भय्यासाहेब पंत |
| २९ | गंगेचे दंड | ,, |
| ३० | सिंघोटी डोंगरावरून | ,, |
| ३१ | श्री गंगोत्री मंदिर | ,, |


## बद्री केदार


| | | |
|---|---|---|
| ३२ | मार्गांवर | रावबहादूर अत्रे |
| ३३ | पहाड आणि पठार | ,, |
| ३४ | श्रीकेदारनाथ मंदिर | ,, |
| ३५ | हिमाच्छादित गिरिशिखर | ,, |
| ३६ | नदीवरील झुलता पूल | ,, |
| ३७ | दोन्ही तीरांवर वसलेलें शहर व झुलता पूल | ,, |
| ३८ | डोम स्त्री छटांगी हिचा नाच | ,, |
| ३९ | पहाडी स्त्रिया | ,, |
| ४० | पहाडी कुटुंब | ,, |

---

| | | |
|---|---|---|
| | मलपृष्ठावरील चित्र | य. ग. वझे |


## नकाशे


| | | | |
|---|---|---|---|
| १ | नेपाळ–यात्रामार्ग दाखविणारा नकाशा | | |
| २ | सईबाईच्या वाड्याचा नकाशा | | |
| ३ | विद्यमान लक्ष्मीनारायणमंदिराचा नकाशा | | |
| ४ | गंगोत्री-जमनोत्री यात्रामार्ग नकाशा | | |
| ५ | बदरी-केदार | ,, | ,, |


---

[ या पुस्तकांत छापलेले सर्व ब्लॉक श्री. के. सी. भिडे, महाराष्ट्र फोटो झिंको, पुणें, यांनी तयार केले आहेत. ]

---

# प्रवासकाल

## शक १८६३

### नेपाळ

| | | |
|---|---|---|
| फाल्गुन शु। ७ | ते | चैत्र शु। ३ |
| (५-३-१९४१) | | (३०-३-१९४१) |

### गंगोत्री-जम्नोत्री

| | | |
|---|---|---|
| वैशाख शु। ५ | ते | ज्येष्ठ शु। ८ |
| (१-५-१९४१) | | (३-६-१९४१) |

## शक १८६१

### केदार-बदरी

| | | |
|---|---|---|
| वैशाख वा। १० | ते | ज्येष्ठ वा। ३० |
| (१४-५-१९३९) | | (१७-६-१९३९) |

# अनुक्रमणिका

**नेपाळ** पृ. १-५३

**परिशिष्ट १ लें–** राज्यव्यवस्था, गादीचा वारसा, प्रधानकीचा वारसा, चलन, वजनें, जमीन, जंगल, फौज, तह. पृ. १४-२१

**परिशिष्ट २ रें–** समाजस्थिति, कालगणना. पृ. २२-३०

**परिशिष्ट ३ रें–** आंतरिक्षवहनमार्ग. पृ. ३१-३२

**परिशिष्ट ४ थें–** नेपाळी भाषा. पृ. ३२-३५

**परिशिष्ट ५ वें–** पेशवे, लँडनने केलेल्या चुका, लँडनने केलेली बदनामी, लक्ष्मीनारायणाचें मंदिर, करमरकरांची माहिती, लँडनने उल्लेखलेलें पेशव्यांचें जवाहीर, शिलालेख. पृ. ३५-५३

**गंगोत्री जमनोत्री** पृ. ५४-७३

**परिशिष्ट १ लें–** टेहरी संस्थान. पृ. ६५-६७

**परिशिष्ट २ रें–** कृष्णाश्रमस्वामी. पृ. ६७-६८

**परिशिष्ट ३ रें–** **लोकस्थिति :** कांहीं विशिष्ट चाली, बायकांची अदलाबदल, कठालाविवाह, कन्याविक्रय, पांडवी विवाह, काडीमोड, पुनर्विवाह, धार्मिक अवनति, एका क्षत्रियाचें मत, नीचशूद्र, नागपूजा, अनुकरणीय कायदे, कांहीं क्षत्रियजाती, प्रेतयात्रा. पृ. ६८-७३

**केदार-बदरीनारायण** पृ. ७४-१०३

**परिशिष्ट १ लें–** **देवस्थानें :** बदरीनारायण, केदार; केदारचे पंडे, देव. पृ. ८२-८९

**परिशिष्ट २ रें–** **सामाजिक :** ब्राह्मण, नांवें– बायकांचीं, पुरुषांचीं; पोशाख, साडेपांच भाऊ, पत्राचा मायना, चालीरीती. पृ. ८९-९३


**परिशिष्ट ३ रें–** **भौगोलिक :** शेती, उष्णतामान. पृ. ९३-९४

**परिशिष्ट ४ थें–** पंचांग. पृ. ९५-९६

**परिशिष्ट ५ वें–** गढवाली भाषा. पृ. ९६-१००

**परिशिष्ट ६ वें–** **संकल्प :** हरिद्वारचा, देवप्रयागचा, ऋषीकेशचा, गरुडगंगेचा, बदरीनाथचा, केदारचा, काशीचा, प्रयागचा, नेपाळचा, अयोध्येचा, गंगोत्रीचा, मटवाडीचा, जमनोत्रीचा. पृ. १००-१०३

---



काठमांडू
पशुपति
भीमफेडी
अमलेकगंज
नेपाळ
३० ६०
१" = ६० मैल
शिमला
हरद्वार
दिल्ली
आग्रा
B.N.W.R.
प्रयाग
कराची
कलकत्ता
इटारसी
नागपूर
मुंबई
मद्रास
१२० २४० ४८०
१" = २४० मैल

१२६८

# हिमालयांत

## नेपाळ

अनेक कारणांमुळे नेपाळाविषयीं मनांत कुतूहल उत्पन्न झालें होतें. नेपाळ म्हणजे शरणागतांचें आश्रयस्थान ही गोष्ट इतिहासावरून मनावर बिंबली होती. मुसलमानांच्या धोळधाडीपुढे हतबल झालेले रजपुत व क्षत्रिय ह्यांनी नेपाळचा मार्ग सुधारला. तसेंच, मुसलमानांच्या असह्य जुलमाने त्रस्त होऊन बुद्धानुयायांनी आपल्या धर्माचें संरक्षण करण्याकरिता व असंस्कृत मुसलमानांकडून ग्रंथांचा नाश होऊं नये ह्या हेतूने सर्व ग्रंथसंभार बरोबर घेऊन नेपाळची वाट धरली. अगदी अलीकडे १८५७ सालच्या युद्धांतील अग्रेसर जो नानासाहेब पेशवा, ह्याला पळण्याचा प्रसंग आला तेव्हा त्याला नेपाळचीच आठवण झाली.

आज सर्व जगांत हिंदु राजा असणारें स्वतंत्र राष्ट्र असें नेपाळचेंच होय. आणि पशुपति व मुक्तिनाथ ह्यांच्या निवासामुळे नेपाळ देशाला जरी क्षेत्राचा महिमा प्राप्त झाला असला तरी हिंदूंच्या स्वातंत्र्याचें—मिळमिळीत कां होईना—निशाण फडकत असलेला नेपाळ देश प्रत्येक आधुनिक सुशिक्षित हिंदूने धर्मक्षेत्र मानलें तर त्यांत आश्चर्य नाही. ह्यास्तव नेपाळ पाहण्याची मला उत्कट इच्छा उत्पन्न झाली होती.

परवानगीवांचून नेपाळराज्यांत प्रवेश करतां येत नाही. परंतु मुख्य प्रधान महाराजे यांच्याकडे परवानगी मिळण्याविषयीं विनंतीचें पत्र पाठवतांच पंधरा दिवसांच्या आंत परवानगी दिल्याचें उत्तर आलें. मह्याबरोबर पंधरा माणसें असतील व आम्ही पंधरा दिवस काटमांडूला राहूं, असें पत्राने कळविलें होतें; व परवानगीहि त्याप्रमाणे आली.

तारीख ५ मार्च सन १९४१ रोजीं अलाहाबाद एक्स्प्रेसने आम्ही मुंबईहून निघालों व दुसऱ्या दिवशीं सकाळीं प्रयागला जाऊन पोंचलों. तारीख ६ व ७

रोजीं प्रयाग येथे आमचा मुक्काम झाला. भागीरथीच्या पश्चिमतीरावर आणि कालिंदीच्या उत्तरतीरावर विष्णुप्रजापतिक्षेत्रांत वसलेल्या ह्या नांवारूपाच्या शहरांत अनेक देवांच्या सुंदर मूर्ति पाहून मनाला अवर्णनीय आनंद होतो. व्यास, यमधर्म, वाल्मीकि, नृसिंह, राम, वेणीमाधव, शेष, दुर्वास, जांबुवंत, सूर्यनारायण, दत्तात्रेय, ब्रह्मदेव, अग्नि, वायु, मार्कंडेय, प्रयागराज अशा ह्या असंख्य देवांची सभा भरलेली किल्ल्यांत दिसून येते. रेड्यावर बसलेला यम, मेंढा वाहन असलेला अग्नि, तसेंच कुत्र्यावर बसणारा कालभैरव या मूर्ति पाहतांच पौराणिक कथांची उजळणी सहजासहजीं होते. या किल्ल्यांत बदरीनारायणाची मूर्ति आम्हांस दाखविण्यांत आली. ह्या सभेंत पशुपतीची गैरहजेरी कां लागावी हें समजत नाहीं. किल्ल्याबाहेर गंगेच्या कांठीं वेणीमाधव व वासुकी ह्यांचीं देवळें प्रेक्षणीय आहेत. वेणीमाधव हें विष्णूचें नांव आहे. अर्थात् लक्ष्मीची मूर्ति विष्णूच्याच शेजारीं उभी असणें अपरिहार्य आहे. असें सांगण्यांत आलें की, लक्ष्मीचें दुसरें नांव वेणी असून तें त्रिवेणीसंगमावरून पडलें असावें. परंतु गंगा ही महादेवाशीं संबद्ध आहे, माधवाशीं नाहीं. या माधवावर रुद्राचा अभिषेक होत असतो ! ह्यावरून उपासनाशास्त्र भटजींनी गुंडाळून ठेवलें आहे असा संशय येतो. वासुकीच्या मूर्तीवरून सर्व हिंदुस्थानभर नागसंस्कृतीचा कसा प्रसार झाला होता हे विचार मनांत येतात. भारद्वाज आश्रमांत आम्ही गेलों आणि तेथे शिवलिंगाचें दर्शन घडलें ! भारद्वाजआश्रमाशेजारींच आनंदभुवन नांवाचा नेहरूंचा बंगला आहे. ह्याला आधुनिक क्षेत्राचें स्वरूप प्राप्त झालेलें दिसलें. आम्ही टांग्यांतून उतरतांच एक मनुष्य आम्हांला पाहून आमच्याकडे धावत आला व आम्हांस त्याने भुवनांत हिंडवून एखाद्या भाटाप्रमाणे मोतीलाल नेहरू कोठे बसत, जवाहरलालची मातुश्री कोणत्या ठिकाणीं उभी राहून सकाळच्या प्रहरीं गंगामातेचें दर्शन घेई, इत्यादि सर्व पाढा भडाभड वाचला. त्याच्या ह्या आगंतुक कामगिरीचें बक्षीस मिळणें स्वाभाविक होतें. सारांश, आनंदभुवनाने एका माणसास पोटाचें साधन निर्माण केलें आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

प्रयागचे पंडे यजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे आहेत. मला तेथे असें समजलें की, ह्या पंड्यांच्या अनौरस पुत्रांना पंडे-ब्राह्मणांत समाविष्ट होण्यास फारशी अडचण पडत नाहीं.

प्रयाग व काशी येथे प्रेतापुढे विस्तवाचें मडकें घेऊन चालण्याची पद्धत

नाही. ह्यावरून आमच्या इकडील लोकांपेक्षा तिकडचे लोक अधिक विवेकी असावे असें वाटूं लागतें.

गंगानदी म्हणजे परमेश्वराने अलाहाबादच्या लोकांना सोनें देऊन ठेविलें आहे असें दिसतें. कारण, उन्हाळ्यांत नदीच्या कोरड्या पात्रांत शेकडो बिघे जमिनींत निरनिराळीं पिकें काढतां येतात. जमीन नैसर्गिकरीत्याच पाणथळ व खताड असल्यामुळे फारसे परिश्रम न करतां धान्य व भाजीपाला यांची समृद्धि होते. अशा शेतीपुढे सायासाच्या शेतीचा निभाव लागणें कठीण आहे. प्रयाग येथे, किंबहुना उत्तर हिंदुस्थानांत, वाहतुकीचे तांगे पाहिले म्हणजे भारतकालीन अर्जुनाच्या रथाची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही. एवढ्या सुधारलेल्या शहरांत तांगेवाल्यांचा अव्यवस्थित व मलिन पोशाख पाहून आश्चर्य वाटतें. तांगेवाल्यांना गणवेश देण्याची कल्पना तेथील अधिकाऱ्यांना सुचलीच नाही काय?

असो. तारीख ८ रोजीं बी. एन. डब्ल्यू.च्या १० वाजून २० मिनिटांच्या सकाळच्या गाडीने आम्हीं प्रयाण केलें. रक्सोलपर्यंत माणशीं ४८= तिकिटाला पडले. बी. एन. डब्ल्यू.चे डबे मोडकेतोडके व गैरसोयीचे कांहीं ठिकाणीं आढळले; त्याप्रमाणे स्टेशनवरील अधिकारीहि आपल्या कामांत दक्ष नसल्याचें अनुभवास आलें. रक्सोलच्या मार्गाबद्दल कितीतरी वेळ वाटाघाट केली असतांहि अलाहाबादसिटीच्या स्टेशनमास्तराने गाडीला थेट मझफरपूरपर्यंत जाणारा डबा लावण्यांत येतो हें आम्हांस सांगितलें नाही. योग्य डब्यांत न बसल्यामुळे रात्रीच्या प्रवासांत आम्हांला बरीच गैरसोय सोसावी लागली.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं १०॥ वाजतां रक्सोल स्टेशनवरती आम्ही उतरलों व तेथून तांग्यांनी बीरगंज येथे १२ वाजतां येऊन पोंचलों. रक्सोलपासून बीरगंज दोन मैल लांब आहे. बीरगंज येथे ज्या धर्मशाळेंत आम्ही उतरलों होतों त्या धर्मशाळेची इमारत चुनेगची, प्रशस्त व सोईची अशी होती. धर्मशाळेला रखवालदारहि आहे; परंतु झाडझूड नसल्यामुळे अत्यंत गलिच्छ स्वरूप त्या इमारतीस प्राप्त झालें होतें. कित्येकांना कुरूप वस्तूला सुरूप करण्याचें साधतें तर दुसऱ्या कित्येकांचा सुरूप पदार्थाचा कुरूप पदार्थ बनविण्यांत हातखंडा असतो. बीरगंज हें नेपाळ राज्यांतलें एक मोठें शहर आहे. रक्सोलपासून आमलेक गंजपर्यंत ५० मैल नेपाळसरकारचा आगगाडीचा रस्ता आहे. ह्या रस्त्यावरील रक्सोलनंतर बीरगंज हें दुसरें स्टेशन होय. ह्या ठिकाणीं एक इंग्लिश हायस्कूल

आहे. शाळेंत दीडशेंहून अधिक विद्यार्थी नाहींत. पंधरा हजार वस्तीच्या मानानें विद्यार्थ्यांची संख्या कमी आहे ह्यांत कांहीं शंका नाही. तथापि इंग्रजी विद्या देण्याचा नेपाळी राज्यांत आता कोठे प्रारंभ होत आहे ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे असमाधानाला कारण राहत नाही.

बीरगंज येथे तीन अधिकारी आहेत. त्यांना सुभा एक, सुभा दोन, सुभा तीन अशीं नांवें आहेत. मला आलेलें पत्र दाखवून पासपोर्ट घेण्याकरिता सुभा नं. तीन कडे जावें लागलें. ह्या गृहस्थांस इंग्रजी साधारण येत होतें. उपेंद्रबहादूर नांवाचे हे अधिकारी क्षत्रिय आहेत असें समजलें. ह्या गृहस्थांकडून मला बरीचशी माहिती मिळाली. ग्वाल्हेरच्या शिंद्यांचें लग्न ज्या मुलीबरोबर झालें त्याबद्दलहि त्यांनी भीत भीत पण बरीच माहिती दिली. संध्याकाळीं ४॥ च्या सुमारास उपेन्द्र-बहादुरांनी सुभा नं. १ कडे मला नेलें. हे गृहस्थ मोठे रुबाबदार दिसले. ऑफिस-च्या समोरच्या बागेंत हातांत काठी धरून उभ्यानेच सभोंवती उभे असलेल्या दर्शनलोलुप गृहस्थांपैकी एकाजवळ बोलत होते. त्यांच्या उंचीमुळे व कृशतेच्या अभावामुळे त्यांच्या शरिराला थोडासा भव्यपणा आला होता. हेहि गृहस्थ चाच-पडत माझ्याजवळ इंग्रजी बोलले. ह्या सुभ्यांचें दर्शन घेऊन परत आल्यावर उपेन्द्र-बहादुरांना पासपोर्ट देण्याविषयी आठवण दिली. त्यांनी आपल्या कारकुनाला बोलावून आणलें, तेव्हा असें समजलें की, आम्हांला पासपोर्ट देण्याबद्दलचें नेपाळी अधिकाऱ्यांचें पत्र बीरगंज अधिकाऱ्यांकडे आलेलें नाही. हें सर्व खरेंहि असेल. नजरचुकीने बीरगंजच्या सुभ्यास कळविण्याचें राहिलें असेल. परंतु नेपाळच्या राज्य-व्यवस्थेसंबंधाने ज्या अफवा माझ्या कानांवर आल्या होत्या त्यांमुळे अनेक तर्क-कुतर्कांचे तरंग मनांत उचंबळूं लागले. मीं सुभ्यांना अनेक प्रश्न विचारले त्यामुळे ह्यांना मजविषयी कांहीं संशय तर आला नसेल ना ही शंका प्रामुख्याने डोकावूं लागली. मी फोनवरून विचारतों असें जरी आश्वासन मला मिळालें तरी मनाला यत्किंचितहि धीर येईना. दुसऱ्या दिवशीं सकाळीं ८॥। ची गाडी. सकाळीं जाग्या-वर अधिकारी मिळणार कसे आणि परवानगी गाडीच्या पूर्वी येणार कशी हा विचार मनांत येऊन येयून परत जाण्याचा प्रसंग येतो कीं काय असा संशयहि मनाला शिवून गेला. श्रीपशुपतीवर भार टाकून आम्हीं तर दुसऱ्या दिवशीं सकाळीं सामानासह स्टेशनवर येऊन मुक्काम ठोकला. आठ वाजेपर्यंत फोनचें उत्तर नाही हाच जबाब आम्हांला मिळत होता. परंतु आठ वाजतां अेकदाचें आम्हांस

अनुकूल उत्तर आलें. आणि उपेन्द्रबहादुरांनी ताबडतोब पासपोर्ट लिहून आमच्या हवालीं केला. निराशेनंतर इष्टसिद्धि झाली असतां उत्साहाचें वातावरण निर्माण होणें साहजिकच आहे. रक्सोलपासून काटमांडूपर्यंत तारेच्या ऐवजीं फोनची सोय असून एका हिन्दी अक्षराला अर्धा नेपाळी पैसा व इंग्रजी एका शब्दाला अर्धा आणा असा दर ठेवला आहे.

सुभ्याच्या टेबलावर एक कायद्याचें पुस्तक असून तें नेपाळी भाषेंत होतें. पुस्तकावर 'श्री गणेशायनमः

आदालती बंदोबस्तको इजलाराको' असे शब्द होते.

बीरगंजला ७० इंच पाऊस पडतो असें येथील सुभ्यानें मला सांगितलें.

बीरगंजहून आम्ही निघालों ते ११॥ वाजतां सकाळीं आमलेकगंजला येऊन थडकलों. हें नेपाळ गाडीचें शेवटचें स्टेशन होय. येथून १६ रुपयांना एक स्वतंत्र लॉरी करून भीमफेडीचें २७ मैलांचें अंतर दुपारीं दोहोंच्या सुमारास तोडलें. येथेहि सोईची अशी सरकारी धर्मशाळा आहे. स्नानें व भोजन आटपून रात्रीं धर्मशाळेंतच मुक्काम केला. पुढे पायी चाल असल्यामुळे दंड्या, कंड्या, कुली ठरवण्यांत दिवस केव्हा संपला तेंहि समजलें नाही. भीमफेडीपासून ठाणकोटपर्यंत पायीं प्रवास करावा लागतो. भीमफेडी ते ठाणकोट यांमधील अंतर सुमारें २० मैल आहे. मार्गानें मैलांचे दगड नसल्यामुळे नक्की आंकडा सांगणें कठीण झालें आहे. एका इंग्रजी पुस्तकांत हें अंतर १८ मैल दिलें आहे.

भीमफेडी येथे 'रोपरोड' म्हणजेताररस्ता, अथवा मालरस्ता म्हणा, आम्हांस पाहावयास मिळाला. भीमफेडीपासून काटमांडूपर्यंत उंच डोंगरावरून सरळ मार्गानें १४ मैल ठिकठिकाणीं खांब उभे करून त्यांच्यावरून तारा टाकल्या आहेत. ह्या तारांवरून माल नेण्यांत येतो. पोतीं राहतील असे पाळणे करून ते तारेला अडकवतात. विजेच्या शक्तीनें ते तीन तासांत काटमांडूला जाऊन पोंचतात. अशा प्रकारची व्यवस्था हिंदुस्थानांत दुसऱ्या कोठेहि झालेली नाही.

ता. ११ रोजीं सकाळीं ६ वाजून २० मिनिटांनी भीमफेडीच्या बाहेर पडून ३॥ वाजतां दुपारीं कुलीखानी येथे येऊन पोंचलों. आमच्यापैकीं कांही मण्डळी दंडींत व कंडींत बसली होती व कांही पायीं चालत होती. कुलीखानी येथे नदी असल्यामुळे स्नानें करून आम्हीं एका घरांत जेवणें आटपलीं. नंतर ४ च्या सुमारास कुलीखानीहून कूच केलें. सायंकाळीं ७ वाजतां चेतलांग येथे

पोचून मुक्काम केला. तारीख १२ बुधवारीं चेतलांगहून ६ वाजतां सकाळीं निघून आम्ही दंडींत बसणारे लोक ९ वाजतां ठाणकोट येथे येऊन पोचलों. एवढ्या प्रवासांत दोन डोंगर चढावे उतरावे लागले. ह्या डोंगरांना सीसागढी व चंद्रगिरी हीं नांवें आहेत. ठाणकोटहून पशुपति १० मैल असून रस्ता मोटारीचा असल्यामुळे हा प्रवास अर्थातच मोटारीने झाला. पशुपतीच्या अगदी जवळ असलेल्या धर्मशाळेंत आमचा मुक्काम असल्याकारणाने सांजसकाळ देवाचें दर्शन मिळण्याची सोय झाली.

पशुपतीचें मंदिर भव्य असून आवार विस्तीर्ण आहे. सर्वत्र शिवालयें व उघड्या पिंड्या दृष्टीस पडतात. पशुपतीचें रूप इतर शिवलिंगांप्रमाणे आहे. केदारनाथाचें येथे धड आहे असें बाह्यतः मानण्यास तरी कांहीं चिन्ह नाहीं. पशुपति चतुर्मुख आहे. म्हणजे चार मुखें चार दिशांनी दाखविलेलीं आहेत. मधलें मुख पांचवें मानलें जातें. पशुपतीचे चार पुजारी आहेत. मुख्य पुजारी, ज्याला रावळ म्हणतात तो, म्हैसुरी ब्राह्मण आहे; आणि बाकीचे तीन गुर्जर, बावडेकर व पाध्ये असे कऱ्हाडे ब्राह्मण आहेत. पशुपतीचा पुजारी गोदावरीच्या दक्षिणेस जन्मला पाहिजे असा नियम आहे. पुजाऱ्याची नेमणूक राजगुरूकडून केली जाते. दाक्षिणी ब्राह्मणांपैकी प्रत्येकाला देवाचें एक मुख संभाळावें लागतें. रावळाकडे दोन मुखें असतात. देवापुढे ठेवलेल्या पैशांची वांटणी पांच हिश्यांत होऊन त्यांपैकी रावळाला दोन हिस्से मिळतात. पुजाऱ्याला देवाचीं शेतें दिलेलीं आहेत. ह्या शेतांबद्दल ते सरकारसारा भरून उत्पन्न घेतात. रावळाला १८० मोरी धान्य व बाकीच्या पुजाऱ्यांना ६० मोरी धान्य प्रत्येकीं येतें. एक मोरी म्हणजे सरासरी २० अधोल्या भरतात. एक मोरी धान्याला ६ रुपयांच्या आसपास भाव असतो.


नित्यपूजेच्या वेळीं अभिषेकानंतर पशुपतीच्या मस्तकावर 'श्रीयंत्र' लिहून त्याची पूजा करतात. दर पूर्णिमेस पशुपतीची विशेष पूजा होते. ह्या पूजेस १५ शें रुपयांचा खर्च येतो व हा सर्व खर्च सरकारांतून केला जातो. शेजारींच कालभैरवाची मूर्ति आहे. त्याला दर पूर्णिमेस रेडा, बोकड, मेंढा, बदक व कोंबडा असे पांच बळी दिले जातात. म्हैस, बकरी वगैरे स्त्रीजातीच्या जनावरांचा बलि देण्यास कायद्याची मना आहे. काटमांडूंत नरदेवीचें एक स्थान आहे. ह्या देवीला पूर्वी पुरुष बली देत असत असें म्हणतात. लौकिक समज असा आहे की, ७०० शें वर्षांपूर्वी पशुपतीची पूजा एका संन्याशाकडे होती.




१ पशुपतीचें मंदिर



२ भूतनाथ (बौद्धनाथ) मंदिर



३ नेपाळांतील रज्जुमार्ग.



४ थापाथली-विजयस्तंभ.

गुह्येश्वरी, विश्वरूप, गोरखनाथ इत्यादि देवांचीं देवळेंहि पाहण्यासारखीं आहेत. गुह्येश्वरी ही पशुपतीची स्त्री. पशुपति असलेल्या गांवाला देवपाटण असें म्हणतात. पशुपतीचें देवालय वाग्मती नदीच्या कांठावर आहे. ह्या नदीच्या पली-कडे गुह्येश्वरी देवालयाच्या समोर बौद्धांचें एक फार मोठें देवालय आहे. ह्या देवालयाच्या दर्शनाकरिता अनेक देशांतील बौद्ध लोक येत असतात. पशुपतीच्या जवळच्या गांवांत बहुधा घरीं कोणी मरत नाही. प्राणोत्क्रमणाच्या पूर्वी मरणोन्मुख स्थितींत असणाऱ्या माणसाला वाग्मतीच्या घाटावर आणून त्याचीं पावलें पाण्यांत भिजतील अशा तऱ्हेने त्यास ठेवतात. देहावसान लवकर न झाल्यास शेजारीं अस-लेल्या खोल्यांत त्याला आणून ठेवतात. वाग्मतीच्या घाटावरच श्मशान असल्या-मुळें प्रेताला अन्यत्र नेणें भाग पडत नाही. घाटावर चौथुरे आहेत त्यांवर प्रेत ठेवून तें अग्निसात् केलें जातें.

शुक्रवार तारीख १४ रोजीं आम्ही पायींच काटमांडू गांवांत गेलों. पशु-पतीपासून काटमांडू निदान तीन मैल तरी लांब आहे. गांवांत जोशी आडनांवाचे एक जहागीरदार आहेत. त्यांची पत्नी आमच्या गांवची असल्यामुळे तिला भेटण्या-करिता आम्ही त्यांच्याकडे गेलों. चालत गेल्यामुळे गांवची परिस्थिति न्याहाळून बघतां आली. या जोशांना जहागिरी कशी मिळाली त्याचा अलौकिक इतिहास सांगतात. ह्यांच्या तपस्वी पूर्वजाने कालभैरवाला हसवून त्याच्याकडून लाडू खाव-विले अशी एक दंतकथा आहे. दुसरी दंतकथा अशी आहे की, नृसिंहाच्या देवळाजवळ कोणी गेलें असतां त्यास मरण येई. जोशांनी ह्या कालभैरवाला आपल्या घरीं आणून आपल्या घरची नृसिंहाची मूर्ति तेथे नेऊन ठेवली आणि अशा रीतीने दर्शनेच्छूंच्या मरणाची भीति नाहीशी केली. जोशांचा कुलस्वामी नृसिंह आहे.

ह्याखेरीज आणखी एक प्रचलित कथा सांगण्यांत येते. तिबेटी लोक नेपाळवर चालून आले. नेपाळच्या राजाची तयारी नव्हती. राजा घाबरून गेला. अशा प्रसंगीं जोशी भटजींनी त्याला आश्वासन दिलें आणि आपल्या तपोबलाने तिबेटी लोकांचा मोर्चा परतविला. त्यांनी आपला कालभैरव तिबेटी सैन्याजवळ नेऊन त्याला फर्माविलें की, हें सैन्य तुला भक्ष्य म्हणून दिलें आहे; तूं त्याचा संहार कर. कालभैरवाला आपल्या भक्ताची आज्ञा पाळणें भागच होतें. तिबेटी सैन्य वाख्याने भराभर मरूं लागलें व त्याला माघार घ्यावी लागली. तेव्हा राजाने

प्रसन्न होऊन २४ तासांत घोड्यावर बसून जितकी जमीन आक्रमिली जाईल तितकी तुम्हांस बक्षीस देईन असें सांगितलें. जोशांच्या जहागिरीचा उगम अशा पौराणिक कथांत आहे. कांही असो, एका महाराष्ट्रीयाला नेपाळराज्यांत प्राचीन काळापासून जहागिरी आहे ही गोष्ट महत्त्वाची आहे. दिलेलें इनाम परत घेण्याच्या अनेक युक्त्या राजांना काढतां येतात. अशाच कारणांनी जोशांची पूर्वीची जहागीर आता चौथ्या हिश्यानेहि नाही असें म्हणतात.

शनिवार तारीख १५ रोजीं महाराज मुख्य प्रधान यांचे खाजगी कारभारी मरीची मानसिंग यांस भेटावयास गेलों. बडा काजी हा त्यांचा सरकारी हुद्दा आहे. पंचावनीच्या घरामध्ये हे गृहस्थ असावेत. हे जातीने नेवारी असून अत्यंत सभ्य, शिष्टाचारपालनांत वाकबगार, चतुर व मुत्सद्दी दिसले. हे इंग्रजी भाषा अस्खलितपणें बोलूं शकतात. बड्या काजींना भेटल्यामुळे नेपाळी अधिकाऱ्यांच्या कर्तबगारीची मला थोडीबहुत कल्पना करतां आली. ह्यांना राज्यकारभाराची चांगली माहिती आहे. इ. १९२३ सालीं इंग्लिशांबरोबर झालेला तह वाचण्याचें काम ह्यांच्याकडेच होतें. राज्यकारभारासंबंधाने ह्यांच्याकडून मला बरीच माहिती मिळाली. सायंकाळीं आम्ही गुह्येश्वरी, गोरखनाथ, विश्वरूप वगैरे देवांचें दर्शन घेऊन आलों. सिंह हें शक्तीचें वाहन असल्यामुळे प्रत्येक देवालयाच्या आवारांत सर्वत्र दगडाचे सिंह दृष्टीस पडतात.

दुसऱ्या बाजीरावाची बायको सईबाई ही नानासाहेबाच्या बायकोसह नेपाळांत राहत होती व तेथे तिने लक्ष्मीनारायणाचें मंदिर बांधलें आहे हें माहीत असल्यामुळे रविवारीं सकाळींच त्या मंदिराचा शोध करण्याकरिता, पशुपतीचे पुजारी विठ्ठलशास्त्री पाध्ये ह्यांना बरोबर घेऊन गांवांत गेलों. विठ्ठलशास्त्र्यांच्यामुळे मंदिर शोधून काढण्यास आम्हांस फारसा वेळ लागला नाही. परंतु पुजारी पूजा करून मंदिराला कुलूप लावून निघून गेल्यामुळे देवाचें दर्शन न घेतांच आम्हांला परतावें लागलें. दुपारीं भातगांव व गोकर्ण येथे जाऊन बूढानीलकंठाचेंहि दर्शन घेऊन आलों. भातगांव (भक्तपूर) हें पूर्वीचें राजधानीचें शहर होतें. आणि आता जरी राजधानीच्या वैभवाला हें शहर मुकलें असलें तरी त्यांत प्राचीन वैभवाचें स्मरण करून देणारीं अनेक चिन्हें अद्यापि अस्तित्वांत आहेत. दाट वस्ती, चार चार मजली इमारती, भव्य राजवाडा व देवळें हीं सर्व ह्या शहराने राज्यवैभव उपभोगल्याचें सुचवितात. भातगांवीं सुमारें दोनशें फूट लांबीचा व शंभर फूट रुंदीचा, उत्तम

दगडांनी बांधलेला एक मोठा तलाव आम्हांस पाहावयास सांपडला. सिद्धपुष्कर हें या तळावाचें नांव. पाण्यांत तांबडे मासे असल्याचें दिसलें. येथे दत्तात्रेयाचें मंदिर पाहण्यासारखें आहे. त्यांत विशेष हें की, दत्ताची मूर्ति एकमुखी आहे व हातांत शंखचक्र आहेत. देवाचा पुजारी जन्मसंन्यासी आहे असें आम्हांस सांगण्यांत आलें. ह्याचा अर्थ नैष्ठिक ब्रह्मचारी असा कदाचित् असेल. ह्या मंदिरासमोरच एका अत्युच्च स्तंभावर गरुडाची मूर्ति आहे.

बूढानीलकंठाची तळ्यामध्ये उताणी पडलेली व भव्य अशी शेषशाईचतुर्भुज विष्णूची ही मूर्ति आहे; शंकराची नाही. ह्या मूर्तीचें पाण्यांत पडलेलें प्रतिबिंब मनोवेधक आहे. सुमारें १२ फूट लांबीची ती मूर्ति असावी. उजव्या दोन हातांपैकी, वरच्या हातांत चक्र व खालच्या हातांत कमळ, आणि डाव्या वरच्या हातांत गदा व खालच्या हातांत शंख, अशा स्वरूपांत असलेली ही मूर्ति कुतूहलास्पद आहे ह्यांत शंका नाही. हें देवस्थान काटमांडूपासून सात मैलांवर आहे.

बूढानीलकंठाचें दर्शन घेऊन आम्ही पशुपतीपासून चार मैलांवर असणाऱ्या गोकर्णाकडे वळलों. येथे शिवलिंग असून देवालयाचें आवार अनेक देवांच्या मूर्तींनी भरून गेलें आहे. देवाचीं चांदीचीं उपकरणीं पाहून उपेक्षितांपैकी हा देव नाही असें वाटलें. ह्या देवाचा पुजारी करमरकर आडनांवाचा चित्पावन ब्राह्मण आहे. ह्या करमरकरांचे वडील येथे आले. ह्या कुटुंबाचें गेलीं ८० वर्षें नेपाळांत वास्तव्य आहे. पशुपतीप्रमाणे गोकर्णाला गुरवाची पूजा नाही. देवाच्या जमिनीचें सुमारें पांचशे रुपयांचें उत्पन्न पुजाऱ्यास मिळत असतें. सईबाईला व नानासाहेबाच्या बायकोला ज्यांनी प्रत्यक्ष पाहिलें असे हे एकटेच दक्षिणी गृहस्थ आहेत. ह्यांच्यापासून मला नानासाहेबांच्या संबंधानें विश्वसनीय माहिती मिळाली.

सोमवारीं (ता. १७) लक्ष्मीनारायणाच्या देवळाचा व मूर्तीचा फोटो काढून घेण्यांत सकाळचा वेळ गेला. आणि पुनः ११॥ च्या सुमारास वर सांगितलेल्या करमरकरांना बरोबर घेऊन भूकंपांत पडलेल्या सईबाईच्या वाड्याच्या खुणा व स्थिति समजून घेतली.

हें काम उरकल्यावर जवळच असलेलें पाटण नांवाचें प्राचीन राजधानीचें शहर पाहण्यास निघालों. भातगांवाप्रमाणेच येथे एक प्रशस्त राजवाडा असून मोठमोठीं घरें व देवळें दृष्टीस पडलीं. मुंबईच्या राणीच्या बागेप्रमाणे येथे पशुपक्षांचा अजबखाना आहे. प्राण्यांची संख्या फार नसली तरी निवडक आहे.

एकंदरींत नेपाळांत देवळें फार; २७०० आहेत असें म्हणतात. सर्व देवळें पागोड्याच्या धर्तीवर बांधलेलीं असतात.

मंगळवारीं (ता. १८) लक्ष्मीनारायणाच्या मंदिरीं असलेला शिलालेख उतरून घेतला. हेंच आमचें नेपाळमधील शेवटचें कार्य होय. कारण दुसऱ्या दिवशीं सकाळीं ८ वाजून १० मिनिटांनी लॉरींत बसून आम्ही ठाणकोटचा मार्ग सुधारला. पन्नास मिनिटांत ठाणकोटला येऊन पोहोचलों. तेथून आमचा पुनः पायीं प्रवास सुरू झाला. भीमफेडीला दुसऱ्या दिवशीं सकाळीं १० वाजतां जाऊन पोहोचलों. भीमफेडीस जेवण न करतां १२। वाजतां निघून १॥। वाजतां आमूलेख्-गंजला आलों. येथून आगगाडीच्या मार्गानें रक्सोलला संध्याकाळीं ६॥ वाजतां जाऊन रात्रीं तेथेंच मुक्काम केला. ह्या सबंध दिवसांत कोणाचेंहि जेवण झालें नाहीं.

शुक्रवारीं ( ता. २१) सकाळीं ओढ्यावर स्नानें उरकून ७॥। च्या गाडीनें रक्सोल सोडलें. शनिवारीं सकाळीं उजाडत काशीस आलों. येथें आमचा मुक्काम बिंदुमाधवाच्या देवळांत होता. हें देऊळ श्रीमंत पंतप्रतिनिधि ह्यांचें असल्यामुळें तेथें उतरण्याची आगाऊच सोय केली होती. औंधकरांचा वहिवाटदार येथें असतो. सर्व दिवस काशीविश्वेश्वर, अन्नपूर्णा, शिंद्यांचा बालाजी इत्यादि देवळांचें दर्शन घेण्यांत गेला. चौंडेमहाराजांची गांठ पडली. दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं त्यांच्या महाराष्ट्रभुवनाचा उद्घाटनसमारंभ श्रीमंत बाबासाहेब घोरकर यांच्या हस्तें व्हाव-याचा होता त्याचें त्यांनी आमंत्रण दिलें.

रविवार (ता. २३) सकाळीं हिंदुविद्यापीठांत गेलों. प्रो. पुणतांबेकर व डॉ. आळतेकर यांच्या भेटी झाल्या. एकंदरींत विस्तार प्रचंड पण खोली उथळ अशा आशयाचें या विद्यापीठाचें केलेलें वर्णन कानीं पडलें. वर सांगितल्याप्रमाणें संध्याकाळची वेळ उद्घाटनसमारंभांत गेली. ह्या समारंभास पं. राजेश्वरशास्त्री व देवकीनंदनाचार्य आले होते. ह्या प्रसंगीं चौंडेमहाराजांच्या इच्छेवरून मला दोन शब्द बोलावे लागले. गोपूजन म्हणजे गोपालन होतेंच असें नाहीं, परंतु गोपालनानें गोपूजन मात्र होतें हेंच मुख्यतः सांगितलें.

सोमवार (ता.२४) दुपारीं चौंडेमहाराजांबरोबर पंडित मदनमोहन मालवीय ह्यांस भेटावयास गेलों. मालवीयजी बरेच थकलेले व श्रान्त दिसले. कायाकल्पाचा त्यांच्या शरिरावर कांही परिणाम झाल्याचीं चिन्हें दिसून आलीं नाहीत. ४। पासून ६। पर्यंत दोन तास मालवीयांच्या खोलींत आमची बैठक होती. पंडितजी मंद

आवाजांत पण सारखे बोलत होते. त्या वेळीं त्यांच्या डोक्यांत गोधनाशिवाय अन्य विचार नव्हता. गुरचरण कोठे मिळेल, किती गाई पोसतां येतील, हे विचार व तद्विषयक योजना चालल्या होत्या. अर्ध्या तासांत निकाल लागणाऱ्या गोष्टींचा खल दोन तास चाललेला पाहून पंडितजी आता कामांतून गेले असा ग्रह होणें स्वाभाविक होतें. पंडितजींना पाहून माझी थोडी निराशाच झाली. संशोधनपूर्वक सूक्ष्म विचार करण्याची वृत्ति असल्याचें आढळून आलें नाही. कांहीसा सनातनी भाबडेपणाच अधिक प्रमाणांत असावा असें वाटलें. अभ्यासक्रमांत आमूलाग्र फरक केला पाहिजे, विद्या अर्थकरी केली पाहिजे, हिंदुस्थानांत इंग्लिश माणसाप्रमाणे कोणालाच इंग्रजी बोलतां येत नाही, मलाहि चांगलें इंग्रजी बोलतां येत नाही, एवढ्या उद्गारांव्यतिरिक्त पंडितजींकडून दुसरें कांहीहि ऐकावयास मिळालें नाही.

बुधवार (ता.२६) नेपाळचे राजगुरु पंडित हेमराज हे मोठे विद्वान गृहस्थ आहेत असें मला समजलें होतें. नेपाळांत ते काशीस गेल्याचें समजल्यावरून येथे आल्यावर त्यांची भेट घेण्याचें ठरविलें व दुपारीं ३ वाजतां त्यांना भेटण्यास गेलों. त्यांच्या लौकिकाप्रमाणे हे गृहस्थ चतुर व विद्वान आहेत, असें त्यांच्या संभाषणावरून सहज दिसून आलें. त्यांना संस्कृत, हिंदी व नेपाळी ह्या भाषा चांगल्या अवगत असून इंग्रजी व मराठीहि थोडेंबहुत समजतें. पुण्याच्या भारत-इतिहाससंशोधक मण्डळाचे ते सभासद होते. त्यांनी अलीकडे काश्यपसंहिता या नांवाचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला आहे. त्याला त्यांनी एक संस्कृतांत लिहिलेली २३३ पानांची प्रचंड प्रस्तावना जोडली असून त्यांत धन्वंतरी वगैरे प्राचीन आचार्यांचा कालनिर्णय केला आहे. प्रस्तावनेंतील मुद्दे एक तासपर्यंत ते मला समजावून देत होते. माझ्या वीस वर्षांच्या परिश्रमाचें हें कार्य आहे असें त्यांनी बजावून सांगितलें, आणि प्रस्तावना वाचून पाहतां ह्यांत एका अक्षराचीहि अति-शयोक्ति नाही, असें मलाहि वाटतें.

काशीस चित्पावनांचीं सुमारें १२५ कुटुंबें आहेत. त्यांचीं आडनांवें येणें-प्रमाणे— लेले, ओक, बापट, गोखले, खरे, गाडगीळ, नेने, केळकर, गोरे, जोशी, पाटणकर, भट (काश्यपगोत्री), गोडबोले, भागवत, पुराणिक, गोरे (त्यांचें दुसरें नांव जोशी आहे), आचवल, चितळे, गोडसे, वझे, बोडस, देव, आठवले, फडके, रटाटे, भावे, सहस्रबुद्धे, कालेकर, रानडे, पाळंदे, मेहेंदळे, शिदोरे, खाडिल-कर, रिसबूड, दातार, म्हसकर, करमरकर, थत्ते, बेहेरे, सोहनी, मराठे, दामले,

शारंगपाणी, मुस्कुटे, पटवर्धन, वैशंपायन, दाते इत्यादि. काशीस चित्पावनांची तीनशें वर्षांपूर्वीची वसती होती असें दाखविणारें कोणतेंहि प्रमाण मला उपलब्ध झालें नाही. लेल्यांचा कुळस्वामी वाडेश्वर असून हरिहरेश्वर ही त्यांची ग्रामदेवता आहे. लेल्यांचा मूळगांव गोळप व तेथलाच हरिहरेश्वर हा देव. इकडील मोडक हिरण्यकेशी आहेत. परंतु लेल्यांनी मला असें सांगितलें की रायपूर येथील मोडक ऋग्वेदी आहेत. काशीचे सहस्रबुद्धे ऋग्वेदी आहेत. सहस्रबुद्धे दोन्ही शाखांचे आहेत. परंतु मोडक ऋग्वेदी असल्याचें मला प्रथमच समजलें. गोखले ह्यांचें दुसरें नांव वाघमारे आहे. रटाळ्यांचेच पुढे मराठे झाले असें म्हणतात.

घाटावर दक्षिणा घेण्याची वहिवाट नाही. तीर्थावर दक्षणा घेण्याचा निषेध आहे असें समजलें. महादेवापुढील दक्षिणा ब्राह्मण घेत नाही. येथे मीं प्रथम ऐकलेली ही गोष्ट माझ्या महादेवविषयक कल्पनांस पोषक आहे. घाटावर पंड्यांची वृत्ति नाही तथापि काशीविश्वेश्वराचा पुजारी पंड्याब्राह्मण आहे. अन्नपूर्णेचें देऊळ एका गोसाव्याच्या मालकीचें आहे असें म्हणतात.

अयोध्या हें एक पडिक खेडें असावें अशी माझी भ्रामक समजूत होती. परंतु सुदैवानें ह्या पुराणनगरीचें दर्शन घेण्याचा निर्धार झाला; आणि फाल्गुन अमावास्येच्या दिवशीं दुपारीं अयोध्येस आलों. नथूभटजींच्या राममंदिरांत आम्ही उतरलों होतों. दुसऱ्या दिवसापासून रामनवमीचा उत्सव सुरू झाला; अयोध्येस चैत्रांत रामजन्माचा उत्सव होत नाही हें मीं ऐकलें होतें तें खोटें असल्याचें अनुभवास आलें. बाकी नथूभटजी मढीकर ह्यांचा हा उत्सव अर्वाचीन असल्यामुळे त्यास विशेष महत्त्व आहे असें वाटत नाही.

अयोध्येची लोकसंख्या वीस हजारांवर असून चुनेगच्ची भव्य इमारतींनी नगराला शोभा आली आहे. शहरांतील स्वच्छता मनांत भरण्यासारखी आहे. शरयू नदीचें पात्र विस्तृत असून नावा फिरण्याइतकें पाणी खोल आहे. बांधीव घाट व मजल्याच्या धर्मशाळेच्या हवेल्या, आणि त्याच्या जोडीला जनसंमर्दाच्या अभावामुळे आलेला निवान्तपणा, यांमुळे मनुष्याचें मन तेथे रमल्याशिवाय राहत नाही. मात्र स्नानसंध्या करण्याच्या ठिकाणीं नदींत गांवांतील घाण गटारें सोडून देणाऱ्या मूढात्म्यांची अविचारी करणी भाविक यात्रेकरूंचें मन संतप्त करते. अपवित्राला पवित्र करणाऱ्या शरयू नदीचा पाणउतारा करण्याच्या हेतूने बुद्ध्या तर हीं गटारें सोडलीं नसतील ना?

घरांच्या मानाने माणसांचा शुकशुकाट कां असावा याचें कारण मला समजलें नाही.

संध्याकाळींच आम्ही देवदर्शनार्थ बाहेर पडलों; रामाचा अभिषेक झाला तें रत्नसिंहासन, रामाचें जन्मस्थान इत्यादि मंदिरें पाहिलीं. हनुमानगढींत बसलेला हनुमान प्रथमच येथे पाहिला. मारुतीची उभी मूर्ति सर्वत्र आढळते परंतु बसलेल्या व निजलेल्या स्थितींत मूर्ति फारशा आढळत नाहीत.

अयोध्येचा राजा अथवा तालुकदार यांचें निवासस्थान पाहिलें. विद्यमान राजेसाहेब दत्तक आहेत असें समजलें. आम्ही गेलों त्या दिवशीं ते राजवाड्यांत नव्हते. कोठे शिकारीला गेले असल्याचें समजलें. राजवाड्याच्या आवारांत राधाकृष्ण व दर्शनेश्वर या देवांचीं अत्यंत सुंदर मंदिरें आहेत. स्वच्छता वर्णनीय असून अन्य ठिकाणच्या देवालयांचा कोंदटपणा येथे आढळला नाही. हीं देवळें बघितल्यावर हिंदु देवळांविषयीच्या माझ्या कल्पनांत मला बदल करणें भाग पडलें. दर्शनेश्वराच्या अभिषेकाकरिता प्रयागहून नित्य गंगेचें पाणी येत असतें.

सत्तावन सालच्या बंडामध्ये इंग्लिश सरकारवर केलेल्या उपकारांच्या फेडींत अयोध्येच्या राजाला त्याची जहागीर परत देण्यांत आली आहे. या जहागिरीचें सुमारे वीस लक्षांचें उत्पन्न आहे असें ऐकलें. गांवांत विजेचे दिवे आहेत. राजवाड्यांत एक लहानसें सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय आहे. एकंदरींत अयोध्या शहर मोठें, स्वच्छ व सुंदर आहे ह्यांत शंका नाही.

गुढीपाडव्यास दुपारपर्यंत आम्ही अयोध्येस होतों परंतु गुढी उभारल्याचें दिसलें नाही. गुढ्या उभारण्याची रीतच नाही असें म्हणतात.

अयोध्येहून लखनौ शहर बघण्याच्या उद्देशाने ता. २८ रोजीं संध्याकाळीं तेथील महाराष्ट्रसमाजांत जाऊन उतरलों. पण तेथील अनास्था पाहून व कांही काळ एकांतवासाची शिक्षा भोगून आणि पुनः कोणत्याहि महाराष्ट्रसमाजांत उतरणें बरें नाहीं अशी मनाशीं खूणगांठ बांधून मीं आपला प्रवास एकदम आखडता घेऊन घराची वाट धरली.

## परिशिष्ट १ लें

# राज्यव्यवस्था

नेपाळच्या राज्यकारभाराचे वृत्तान्त मिळविण्याची खटपट करूनहि मिळाले नाहीत. प्रसिद्ध होत असतात कीं नाही ह्याविषयींच शंका येते. स्वातंत्र्याचें हें लक्षण असावें ! रा. मरीची मानसिंगांनी तोंडी दिलेल्या माहितीप्रमाणे नेपाळची लोकसंख्या ६० लाख असावी. इ. स. १९२०-२१ सालीं शिरगणती झाली म्हणतात. राज्याचें उत्पन्न सुमारे २॥ कोटींचें आहे. उत्पन्नाच्या मुख्य बाबी म्हणजे जंगल व जमीनमहसूल ह्या होत. तांबें, लोखंड व शिसें ह्यांच्या खाणी राज्यांत आहेत. परंतु त्यांपासून फारसा फायदा अद्यापि होत नाही. शास्त्रीय पद्धति अद्यापि अमलांत यावयाची आहे. १२।१३ वर्षांपूर्वी जो आगगाडीचा रस्ता तयार केला त्याच्यापासून मात्र ५० ते ६० हजार रुपयांचा निवळ फायदा होतो. आगगाडी-प्रमाणेताररस्ता (रोपरोड) ही फायद्याची बाब झाली आहे.

काटमांडू ४७५० फूट उंचीवर आहे. नेपाळचे अक्षांश २६ ते ३० व रेखांश ८० ते ८८ आहेत.

विशेष गोष्ट म्हणजे नेपाळांत मिठावर कर नाही. आगगाडीनेहि मीठ बिन-पैशाने पाठवितां येतें.

नेपाळांत पूर्वी सरकारी कचेऱ्या रविवारीं बंद असत. आता कचेऱ्यांना शनवारची सुट्टी असते.

नेपाळांत कागद चांगला तयार होतो. तो लोकतापाटापासून करतात. पाटा म्हणजे तंतू; दोरा. लोकता हें झाडाचें नांव.

लँडनने १९२० सालच्या शिरगणतीचे आंकडे दिले आहेत ते असे—

| | | |
|---|---|---|
| लोकसंख्या | | ५५७३७९१ |
| घरांची संख्या | | ९५७६०९ |
| काटमंडूची लोकसंख्या— | | १०८८०५ |
| पाटणची | ,, | १०४९२८ |
| मातगांवची | ,, | ९३१७६ |

उंचीच्या प्रमाणांत लोकसंख्येचे आंकडे येणेंप्रमाणे —

डोंगरावर— २०३१८८२

दरींत — ३६७०१०

सपाटीवर— २१७५८६४

( दोन संख्यांत थोडा फरक आहे. )

नेपाळची लांबी ५०० मैल व रुंदी १३० मैल आहे. सध्याची काटमांडूची दरी पूर्वी नागवास नांवाचें सरोवर होतें. विपश्यीच्या कृपेने पाणी निसरून वस्ती करण्याजोगी जमीन राहिली असें वर्णन स्वयंभुपुराणांत आहे.

## गादीचा वारसा

१ राजा.

२ त्याचे मुलगे, नातू वगैरे. वडील पुत्रास गादी मिळण्याचा हक्क. तो निपुत्रिक वारल्यास त्याचा धाकटा भाऊ.

३ राजाचे भाऊ व त्याचे मुलगे. (अर्थात् राजाच्या औरस पुत्रसंततीच्या अभावीं.)

४ राजाची बायको— राणी.

५ राजाच्या मुली आणि त्यांचे मुलगे. (ह्यांतहि वडिलकीच्या क्रमाने वारसाहक्क मिळतो.)

६ राजाचे चुलते.

एकाच्या अभावीं दुसरा अशा अनुक्रमाने वरील वारसांची याद्दी दिली आहे.

राजा महाराजाधिराज ही पदवी लावतो. हल्लींचा राजा त्रिभुवनवीर विक्रमशा याचा जन्म ३० जून १९०६ रोजीं झाला.

राज्यकारभारासंबंधाने राजाला कोणताहि हुकूम सोडण्याचा अधिकार नाही. सर्व सत्ता प्रधानाने आपल्या हातीं ठेवली आहे. राजाच्या नांवाने नाणें चालतें एवढेंच राजाच्या अस्तित्वाचें द्योतक आहे.

राजाने बाहेर पडावयाचें झाल्यास त्याला आपल्या आधीच संपुष्टांत आलेल्या अधिकारालाहि मुकावें लागतें.

महाराजाधिराज ह्यास पांच सरकार असें म्हणतात. ह्याचें कारण त्याच्या नांवाच्या पाठीमागे पांच वेळां श्रीकार काढावा लागतो. पूर्वी तीन श्री काढीत तेव्हा तीन सरकार म्हणण्याची वहिवाट असे. परंतु सांप्रत मुख्य प्रधानाला तीन सरकार म्हणण्याचा प्रघात पडला आहे.

राजा व प्रधान दोनहि रजपूत जातीचे आहेत.

गादीवर बसणारा राजपुत्र एकाच वेळेला दोन बायकांशीं लग्न लावतो असें म्हणतात.

## प्रधानकीचा वारसा

एक प्रधान मेल्यानंतर वडीलकीच्या क्रमाने त्याचे भाऊ प्रधानाच्या गादीवर बसतात. प्रधानकी वंशपरंपरा असल्याने प्रधानकीची एक स्वतंत्र गादी नेपाळांत निर्माण झाली आहे. एका भावानंतर त्याच्या खालचा, तो मेल्यावर त्याच्या खालचा भाऊ, अशा क्रमाने प्रधानकीचीं वस्त्रें पालटलीं जातात. याप्रमाणे भावांची पिढी संपल्यावर त्यांच्या मुलांत जो वयाने सर्वांत मोठा असेल तो प्रधानकीच्या गादीवर बसतो. ही वारसदारीची योजना जंगबहादुराने ठरवून दिली आहे.

### अलीकडील मुख्य प्रधान

| | |
|---|---|
| (१) जंगबहादुर | ता.२५ फे. १८७७ रोजीं मयत. |
| (२) राणाउदीपसिंग | ता.२२ नो. १८८५ रोजीं मारला गेला. |
| (३) वीरसमशेर | ता.५ मार्च १९०१ रोजीं मयत. |
| (४) देवसमशेर | ता.२१ जून १९०१ रोजीं पदच्युत. |
| (५) चंद्रसमशेर | —— —— —— १९०१ पासून. |

पूर्वीचा मुख्य प्रधान मातबरसिंग यास जंगबहादुराने १८ मे १८४५ रोजीं ठार मारलें व १७ स. १८४५ रोजीं स्वतः मुख्य प्रधान झाला.

नेपाळ सरकारचें स्वतःचें नाणें आहे. तथापि इंग्रेजी नाणें तेथे चालतें. तराईत तर सरकारसाराहि इंग्रेजी नाण्यांत देतां येतो. ह्यावरून नेपाळच्या हिंदुराज्यांत इंग्रेज सरकारची छाप कशी आहे तें दिसून येईल.

# नेपाळी चलन

| | | | |
|---|---|---|---|
| ४ दाम | = १ पैसा | | |
| ४ पैसे | = १ आणा | | १०० पैसे = १ रुपया |
| ६¼ आणे | = १ सुका | | ५० पैसे = अर्धा रुपया किंवा मोहोर |
| २ सुके | = १ मोहोर | | |
| २ मोहरा | = १ रुपया | | |

अर्ध्या रुपयाच्या नाण्याला मोहोर असें नांव आहे.

इंग्रेजी एक रुपया म्हणजे नेपाळी सवा रुपया होतो. नेपाळी रुपया १७१ ग्रेनांचा भरतो. त्यांत ४/५ चांदी असते.

## तांब्याचीं नाणीं

१ पैसा; २ पैसे; ५ पैसे व अर्धा पैसा.

## चांदीचीं नाणीं

१ रुपया किंवा १०० पैसे; अर्धा रुपया किंवा ५० पैसे (मोहोर); पाव रुपया किंवा २५ पैसे. ह्याशिवाय २० पैशांचें एक चांदीचें नाणें असतें.

## सोन्याचीं नाणीं

अश्रीफा = १ तोळा सोन्याचें. एके ठिकाणीं ह्या नाण्याला बक्ला असेंहि म्हटलें आहे.

अर्ध्या तोळ्याच्या सोन्याच्या नाण्याला पाट्ला ही संज्ञा आहे.

पूर्वी १६ आण्यांचा रुपया असे. आता तो प्रचारांत नाही. जमाखर्चा-पुरता त्याचा उपयोग सध्या करतात.

पूर्वीच्या नाण्यांवर बैलाचें चित्र असे. शंकराचें वाहन नंदी ह्या नात्यानें तें योग्यच म्हटलें पाहिजे.

लिच्छवी राजे आपणांस सूर्यवंशी म्हणवीत. ह्यास्तव त्यांच्या नाण्यांवर सूर्य काढलेला आढळतो.

संवत् १९८३ चें सोन्याचें नाणें मीं पाहिलें. हेंच अश्रफी नांवाचें नाणें. त्याच्या एका बाजूला वाटोळीं "३ श्री गोरखनाथ" अशीं अक्षरें असून मध्ये "श्रीभवानी" हीं अक्षरें होतीं. उलट बाजूस "श्री श्री श्री त्रिभुवनवीर विक्रम-साहदेव महाराजाधिराज" अशीं अक्षरें होतीं.

रुप्याच्या नाण्यांवर वरीलप्रमाणे लेख असून शिवाय "एक रुपया नेपाळ" हे शब्द अधिक होते. मीं पाहिलेलें रुप्याचें नाणें संवत् १९९१ चें होतें.

पैशांवर 'पशुपतिनाथ' अशीं अक्षरें आढळलीं.

गोरखनाथ हा मत्स्येन्द्रनाथाचा शिष्य. नेपाळची संरक्षक देवता गोरखनाथ असावी असें दिसतें. गोरखनाथाचें देऊळ पशुपतीजवळ आहे.

भवानी ही रजपूत राजांची कुलदेवता.

पशुपति हा क्षेत्राचा अधिपति.

प्राचीन काळीं नेपाळांत भाजलेल्या मातीचीं उपनाणीं (token coins) असत. कदाचित् विटांच्या आकाराचीं असतील. नेपाळांत विटा पक्क्या भाजलेल्या असून कणखर असतात. रस्तेहि विटांचे करतात.

## वजनें

| सोनें | चांदी |
|---|---|
| १० लाल = १ मासा | ८ लाल = १ मासा |
| १० मासे = १ तोळा | १२ मासे = १ तोळा |

## जमीन

खाटमांडूदरींतील जमीन अत्यंत सुपीक आहे. परंतु दरीबाहेरील डोंगराळ जमीन अतिशय हलकी असून तराईची जमीन मध्यम आहे. तराई म्हणजे सपाट प्रदेश.

१ बिघा म्हणजे २० कट्टे अथवा ८१०० हात जमीन.

जमिनीची मोजणी झालेली आहे. बिघ्याला २॥ ते १० रु. (नेपाळी) पर्यंत सरकारसारा आहे. रत्नागिरी जिल्ह्यांतील खोती पद्धतीप्रमाणे जमीनदारी पद्धत नेपाळांत आहे. जमीनदाराला वसुलावर शेंकडा पांच रुपये सरकारांतून मिळतात. कित्येक ठिकाणीं कायम कुळारक आहे.

भात, गहूं, मका हीं पिकें होतात. तांदूळ उत्तम प्रकारचा पिकतो. भाताच्या कांही जातीः—१ मशीनू (सुवासिक तांदूळ), २ माशीं (खाण्यास गोड), ३ थापाचीनी (हलकें भात), ४ घैय्यां, ५ मन्सुरा, ६ आंगा.

भाताचें माप— २० अधोल्या = १ मोरी.

एका मोरीला सुमारें ६ रु. भाव असतो. पावशेराला माना म्हणतात.

राइटसाहेबानें आपल्या पुस्तकांत जमिनीचे प्रकार व मापें दिलीं आहेत तीं येणेंप्रमाणे:—

जमिनीची प्रत— १ सकबु (उत्तम), २ वल्लबु (मध्यम), ३ पंबु (कनिष्ठ).

### मोजणी

७५ चौ. यार्ड = १ जन

३०० चौ. यार्ड = ४ जन = १ रोपणी

७५०० चौ. यार्ड = २५ रोपणी = १ खैत

१ खैत = १$\frac{१}{२}$ इंग्लिश एकर

राइटसाहेबाच्या मतानें एक खैत जमिनींत २१० रु. चें उत्पन्न होतें.

### जमिनीच्या मापाचें कोष्टक

६$\frac{१}{३}$ हात (९ फूट ३ इंच) = १ सांखळी

१६ चौरस सांखळ्या = १ मूरी

४ मूरी = १ रोपणी

९०×९० यार्ड = १ बिघा.*

डोंगराळ जमिनीवरच्या कुळांचे तीन प्रकार आहेत. स्वतःच्या दोन बैलांनीं नांगरणाऱ्या कुळाला हल म्हणतात. अशा कुळांना बिघ्यामागे १ रु. सारा द्यावा लागतो.

स्वतःचा एक बैल व दुसऱ्याकडून घेतलेला एक बैल ह्यांनी नांगरणाऱ्या कुळाला पटे म्हणतात. सारा बिघ्यास पाऊण रुपया. कुदळीनें जमीन नांगरणारा कुदळ्या अथवा कुदळे. ह्याला सारा बिघ्यास अर्धा रुपया.

तराईत उत्पन्नाच्या निम्मे इतका सारा असतो.

## जंगल

जंगल ही एक सरकारी उत्पन्नाची बाब आहे. मैदानावर व सुमारे ४००० फूट उंचीवरच्या प्रदेशावर असलेलें जंगल किफायतशीर होतें. अगदी वर वर जावें तों झाडेंहि उगवत नाहीत आणि उगवलीं तरी तोडून लाकडांची वाहतूक करतां येत नाही.

---

* निरनिराळ्या मापांचा मेळ बसतच असें नाही.

नेपाळच्या जंगलांत साल, शिसू, खैर वगैरे वृक्ष आहेत. जंगलाचे लिलाव करून ठेकेदार घेतात. हे ठेकेदार ब्रिटिश मुलखांतले बहुधा असतात. जंगलाची सुधारणा इंग्लिश अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने केली जाते. इंग्लिश अधिकाऱ्यांना अशा रीतीने नेपाळांत प्रवेश मिळतो. लढाईच्या वेळीं नेपाळ सरकारच्या जंगलाचा उपयोग नेपाळी फौजेप्रमाणे इंग्रज सरकारास होतो. लोहमार्गांच्या "सिलिपाटां"-करिता नेपाळ सरकार आपल्या जंगलांतील लाकूड इंग्रज सरकारास जकात न घेतां देतें.

## झाडें

झाडांना सामान्यतः रुख (वृक्षाचा अपभ्रंश) म्हणतात. कांहीं झाडांचीं नांवें येथे देतों.

१ **खरी** — उन्हाळयांत छाया चांगली देतें. इमारतीच्या उपयोगी नाही.

२ **लपशी** — आंबट फळ; काळा पिवळा रंग; ह्याचें लोणचें करतात.

३ **मसाला** — पानांना वास चांगला येतो. पानें लहान असतात. आरंभीं रुंदी अधिक व लांबी थोडी. कांहीं कालानंतर रुंदी कायम राहून लांबी वाढत जाते.

४ **झुशेफूल** — ह्या झाडाचें फूल खाली लोंबतें राहतें.

## फौज

मुख्य प्रधानांच्या खाजगी कारभाऱ्यांनी राज्यांत ४५००० फौज असल्याचें मला सांगितलें. १९२८ सालीं लिहिलेल्या आपल्या पुस्तकांत लँडन याने ४१४५७ हा आंकडा दिलेला आहे. यांपैकी २८५९७ इतके शिपाई कायम पगारी असून १२८६० सैनिक प्रसंगीं कामाला येण्यासारखे आहेत. कायमच्या फौजेपैकी बावीस हजार पांचशे वीस (२२५२०) लोक खुद्द खाटमांडू येथे असून बाकीचे ६०७७ सैनिक राज्यांत इतर ठिकाणीं ठेवलेले आहेत. शिबंदीच्या दोन पलटणी दीपळ येथे व दोन पोखरा येथे असतात. कायम फौजेपैकी तीन पलटणी पालपा येथे व एक पलटण बैटडी येथे ठेवली असून बाकीच्या सर्व पलटणी खाटमांडूच्या दरींत आहेत. याशिवाय इलाम, कुलजंग, पिउठाणा, गढी, पटी, उदयपूर वगैरे ठिकाणीं कांहीं सैन्य असतें. कोणत्या धोरणाने हें सैन्य विभागलेलें आहे हें मला सांगतां येत नाही. परंतु बरेंच सैन्य खुद्द खाटमांडू येथे असल्याने तें राज्याच्या

रक्षणासाठीं अवश्य म्हणून तेथे आहे किंवा स्वतःचें बूड ढळूं न देण्याकरिता ठेवलें आहे हा विचार करण्यासारखा विषय आहे.

तीन वर्षें प्रत्येकाने सैन्यांत नोकरी केलीच पाहिजे अशी सक्ती आहे. तीन वर्षांच्या शेवटीं पलटणींच्या अधिकाऱ्याने शिफारस केल्यास कोणत्याहि शिपायास कायमपणें फौजेंत राहण्याचा हक्क आहे. ब्राह्मणांवर ही सक्ती नाही.

शिपायांकरिता सरकारी खोल्या बांधल्या नाहीत. म्हणून शिपायांस आपापल्या सोयीप्रमाणे बिऱ्हाडें करून गांवांत राहावें लागतें. याचा परिणाम असा होतो की, गांवांत हिंडतांना रस्तोरस्तीं लष्करी पोशाखांत असलेले शिपाई प्रवाशाच्या नजरेस पडतात व त्यामुळे येथे लष्करी अम्मल आहे कीं काय असा संशय येतो. कपाळाला गंध नाही असा शिपाई विरळा. शिपाईगिरी आणि ब्राह्मणगिरी ह्यांचें अधिराज्य असल्याचा प्रत्यय येतो.

नेपाळच्या फौजेला हत्यारें व दारूगोळा ह्यांचा पुरवठा इंग्लिश सरकाराकडून होतो. पलटणींची कवायत पाहण्यास इंग्रज लष्करी अधिकारी मधून मधून येतो. गेल्या युद्धांत व चालू युद्धांत गुरखा पलटण ब्रिटिशांच्या उपयोगी फार पडली.

## तह

तिबेट व नेपाळ ह्या दोन देशांचें युद्ध जुंपून अखेरीस चैत्र शुा ३ संवत् १९१२ (इ. स. १८५६) ह्या दिवशीं तह झाला. तिबेट सरकारने गुरखा सरकारला दरसाल १०००० रुपये द्यावे असें ह्या तहांत ठरलें. ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे तहाच्या पहिल्याच कलमाने दोनहि राष्ट्रांनीं चिनी बादशाहाचा मान राखून त्याच्या आज्ञेंत पूर्ववत् वागण्याचें कबूल केलें. (असें असून आज इंग्रजांचीच बूज नेपाळांत अधिक राखिली जात आहे.) ह्या तहाला साक्षीदार परमेश्वर आहे !

ब्रिटिश सरकार व नेपाळ सरकार ह्यांच्यांत २१ दिजेंबर १९२३ रोजीं तह झाला. ह्या तहाने नेपाळला ब्रिटिश सरकारकडून स्वातंत्र्य मिळालें. अर्थातच मोठा थाटामाटाचा समारंभ करून तहावर शिक्कामोर्तब करण्यांत आलें. पूर्वी नेपाळ सरकारवर रेसिडेंट लादला होता त्याच्या ऐवजी ब्रिटिश सरकारचा वकील आला. दारूगोळा, शस्त्रास्त्रें बिनजकातीने नेपाळ सरकारला पुरविण्याचें ब्रिटिश सरकारने अभिवचन दिलें.

## परिशिष्ट २ रें

# समाजस्थिति

नेपाळांतील हिंदुसमाज जातिबद्ध असूनहि वर्णबद्ध आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ह्यांमध्ये अनंत जाती आहेत. अस्पृश्यवर्ग निराळा नाही. शूद्रांत अस्पृश्यांचा समावेश होतो. स्पृश्य शूद्र व अस्पृश्य शूद्र असा भेद करतात. भंगी वगैरे अस्पृश्य शूद्र थोडे आहेत. न्हावी स्पृश्य असून त्याच्या हातचें पाणी सर्व वर्णांना चालतें. अस्पृश्य वगळून कोणत्याहि वर्णाच्या माणसाच्या हातचें पाणी दुसऱ्या कोणत्याहि वर्णाच्या माणसाला चालतें. नेपाळांत महार जात नाही.

सर्व ब्राह्मण मांसाहारी आहेत. ब्राह्मण क्षत्रियाकडे जाऊन वेदोक्त (?) श्राद्ध करतो.

पूर्विया (पूर्वे), कुमाई, मैथिल आणि देवभाज हे चार प्रकारचे ब्राह्मण नेपाळांत आहेत. ह्या चारी जातींच्या ब्राह्मणांत रोटीबेटीव्यवहार होत नाही. राजगुरु हे कुमाई जातीचे आहेत. देवभाज हे पूर्वीच्या मल्लराजांचे गुरु व उपाध्ये होते. मैथिल हे मिथिला देशचे राहणारे. देवभाज ह्यांना उपाध्येहि म्हणतात.

दुसऱ्या जाती नाहीत असें नाही. नेपाळी व नेवारी लोक निराळे. किरात, लिंबू, राई, गुरुंग, मगर इत्यादि अनेक जाती नेवारी लोकांत आहेत. आमचे कूली मैसुरी जातीचे होते. हर्गबहादूर हें एका कुलीचें नांव. त्याच्या बापाचें नांव विचारतां माहीत नाही म्हणाला! नेपाळांत असतांना आम्ही नोकर ठेवला होता तो क्षत्रिय असून त्याचें नांव मायला सर्वध्वज थापा. थापा हें आडनांव; सर्वध्वज हें बापाचें नांव. ह्याचें गोत्र काश्यप. पुत्र रामगोपाळ व कन्या पूर्णकुमारी अशीं दोन अपत्यें त्याला होतीं.

आमचे बहुतेक कूली मैसुरी जातीचे होते. त्यांचीं नांवें इमानसिंग कृष्णसिंग, लालसिंग मानबहादूर, शेत्ये समानसिंग, जीतबहादूर धनबहादूर.

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या लोकांत प्रचलित असलेलीं नांवें एकत्र केलीं तर तो एक मनोरंजक विषय होईल. काशीच्या एका न्हाव्याने आपलें नांव मंगरू भगन असें सांगितलें. भगन हें त्याच्या बापाचें नांव. छेदी व धन्नू ह्या नांवाचे त्याला दोन मुलगे असून त्यांच्या आईचें नांव झेन्नू आहे. असो.

नेवारी लोकांत चार वर्ण आहेत. तथापि वैश्यांचा भरणा विशेष असें म्हणतात. नेपाळच्या ब्राह्मणांनी परधर्मीयांना हिंदूंत घेऊन त्यांस वैश्यवर्ण दिला असा बोलवा आहे. ब्राह्मणांत सातव्या आठव्या वर्षी मुलाची मुंज करतात.

सामान्य नियम असा की, जिच्या हातचें अन्न चालतें तीच स्त्री लग्नाची बायको होऊं शकते. तथापि अनुलोमविवाह रूढ असल्यामुळे निरनिराळ्या वर्णांच्या बायका करतां येतात. प्रतिलोमविवाह सर्वस्वी निषिद्ध आहे. अन्य जातीची किंवा वर्णाची स्त्री केली असतां लग्नांत होमहवनाची अवश्यकता नसते: फक्त कलशपूजन करतात. त्रैवर्णिक वर व शूद्र कन्या ह्यांच्या विवाहांत हा कलशविधी-सुद्धा कधी होतो, तर कधी होत नाही. सारांश, लग्नाची बायको आणि बिन-लग्नाची बायको ह्यांतील अंतर फारच सूक्ष्म आहे. सर्व वर्ण— ब्राह्मण धरून— मांसाहारी; आणि पाणी सर्वांना सर्वांच्या हातचें चालतें. त्यामुळे विवाहाचें क्षेत्र नेपाळांत विस्तृत झालें आहे ह्यांत आश्चर्य नाही. आपल्याकडे एक जात दुसऱ्या जातीच्या हातचें अन्नग्रहण करीत नाहींच परंतु जलपानहि करणार नाही. त्या कारणाने जातीजातींत तुटकपणा निर्माण झाला आहे.

ज्या स्त्रीच्या हातचें अन्न चालत नाही त्या स्त्रीबरोबर विवाह केला तरी पति तिच्या हातचें शिजवलेलें अन्न केव्हाहि खाणार नाही. आपण ज्याला धान्यफराळ म्हणतों तो अशा स्त्रीच्या हातचा घेण्यास प्रत्यवाय नाही.

नेपाळांत सप्रवरविवाह होतात. कौंडिण्य व वासिष्ठ हीं गोत्रें विवाहाला प्रतिबंधक नाहीत. ह्यावरून सगोत्राचा निर्बंध सप्रवरापर्यंत आमच्याकडे ताणला गेल्याची गोष्ट पाठीमागल्या काळांत घडली असावी.

भारद्वाज गोत्रांत परस्परविवाह होतो म्हणजे भारद्वाज गोत्रापुरता सगोत्र-त्वाचा निर्बंध ढिला झाला आहे. तथापि दोन भारद्वाज निराळे असें कल्पून पळ-वाट काढतां येते.

ब्राह्मणांत मामेबहिणीबरोबर लग्न होत नाही. क्षत्रियांत होतें.

मुलगी ऋतुस्नात होण्याच्या पूर्वी तिचें लग्न होतें. लग्न मुलीच्या घरीं लागतें. मुलीचे पैसे घेण्याची वहिवाट नाही. साधारणतः लग्नाचा प्रकार असा— मुलीच्या घरीं वर जातो. मुलीचा बाप वराला तीन प्रदक्षिणा घालतो आणि गंधाक्षत लावतो. आंतरपाट सासरा व जावई ह्यांच्यामध्ये धरतात. आपल्याप्रमाणे वधू व वर ह्यांमध्ये नाही. नंतर मुहुर्तावर कन्यादान होतें. अश्मारोहण वगैरे पुढील विधि यथाशास्त्र

## परिशिष्ट २ रें

# समाजस्थिति

नेपाळांतील हिंदुसमाज जातिबद्ध असूनहि वर्णबद्ध आहे. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र ह्यांमध्ये अनंत जाती आहेत. अस्पृश्यवर्ग निराळा नाही. शूद्रांत अस्पृश्यांचा समावेश होतो. स्पृश्य शूद्र व अस्पृश्य शूद्र असा भेद करतात. भंगी वगैरे अस्पृश्य शूद्र थोडे आहेत. न्हावी स्पृश्य असून त्याच्या हातचें पाणी सर्व वर्णांना चालतें. अस्पृश्य वगळून कोणत्याहि वर्णाच्या माणसाच्या हातचें पाणी दुसऱ्या कोणत्याहि वर्णाच्या माणसाला चालतें. नेपाळांत महार जात नाही.

सर्व ब्राह्मण मांसाहारी आहेत. ब्राह्मण क्षत्रियाकडे जाऊन वेदोक्त (?) श्राद्ध करतो.

पूर्विया (पूर्वे), कुमाई, मैथिल आणि देवभाज हे चार प्रकारचे ब्राह्मण नेपाळांत आहेत. ह्या चारी जातींच्या ब्राह्मणांत रोटीबेटीव्यवहार होत नाही. राज-गुरु हे कुमाई जातीचे आहेत. देवभाज हे पूर्वीच्या मल्लराजांचे गुरु व उपाध्ये होते. मैथिल हे मिथिला देशचे राहणारे. देवभाज ह्यांना उपाध्येहि म्हणतात.

दुसऱ्या जाती नाहीत असें नाही. नेपाळी व नेवारी लोक निराळे. किरात, लिंबू, राई, गुरुंग, मगर इत्यादि अनेक जाती नेवारी लोकांत आहेत. आमचे कूली मैसुरी जातीचे होते. हर्गबहादूर हें एका कुलीचें नांव. त्याच्या बापाचें नांव विचारतां माहीत नाही म्हणाला ! नेपाळांत असतांना आम्ही नोकर ठेवला होता तो क्षत्रिय असून त्याचें नांव मायला सर्वध्वज थापा. थापा हें आडनांव; सर्वध्वज हें बापाचें नांव. ह्याचें गोत्र काश्यप. पुत्र रामगोपाळ व कन्या पूर्णकुमारी अशीं दोन अपत्यें त्याला होतीं.

आमचे बहुतेक कूली मैसुरी जातीचे होते. त्यांचीं नांवें इमानसिंग कृष्ण-सिंग, लालसिंग मानबहादूर, शेत्ये समानसिंग, जीतबहादूर धनबहादूर.

हिंदुस्थानांतील निरनिराळया लोकांत प्रचलित असलेलीं नांवें एकत्र केलीं तर तो एक मनोरंजक विषय होईल. काशीच्या एका न्हाव्याने आपलें नांव मंगरू भगन असें सांगितलें. भगन हें त्याच्या बापाचें नांव. छेदी व धन्नू ह्या नांवाचे त्याला दोन मुलगे असून त्यांच्या आईचें नांव छेन्नू आहे. असो.

नेवारी लोकांत चार वर्ण आहेत. तथापि वैश्यांचा भरणा विशेष असें म्हणतात. नेपाळच्या ब्राह्मणांनी परधर्मीयांना हिंदूंत घेऊन त्यांस वैश्यवर्ण दिला असा बोलवा आहे. ब्राह्मणांत सातव्या आठव्या वर्षी मुलाची मुंज करतात.

सामान्य नियम असा की, जिच्या हातचें अन्न चालतें तीच स्त्री लग्नाची बायको होऊं शकते. तथापि अनुलोमविवाह रूढ असल्यामुळे निरनिराळ्या वर्णांच्या बायका करतां येतात. प्रतिलोमविवाह सर्वस्वीं निषिद्ध आहे. अन्य जातीची किंवा वर्णाची स्त्री केली असतां लग्नांत होमहवनाची अवश्यकता नसते: फक्त कलशपूजन करतात. त्रैवर्णिक वर व शूद्र कन्या ह्यांच्या विवाहांत हा कलशविधी-सुद्धा कधी होतो, तर कधी होत नाही. सारांश, लग्नाची बायको आणि बिन-लग्नाची बायको ह्यांतील अंतर फारच सूक्ष्म आहे. सर्व वर्ण—ब्राह्मण धरून—मांसाहारी; आणि पाणी सर्वांना सर्वांच्या हातचें चालतें. त्यामुळे विवाहाचें क्षेत्र नेपाळांत विस्तृत झालें आहे ह्यांत आश्चर्य नाही. आपल्याकडे एक जात दुसऱ्या जातीच्या हातचें अन्नग्रहण करीत नाहीच परंतु जलपानहि करणार नाही. त्या कारणाने जातीजातींत तुटकपणा निर्माण झाला आहे.

ज्या स्त्रीच्या हातचें अन्न चालत नाही त्या स्त्रीबरोबर विवाह केला तरी पति तिच्या हातचें शिजवलेलें अन्न केव्हाहि खाणार नाही. आपण ज्याला धान्यफराळ म्हणतों तो अशा स्त्रीच्या हातचा घेण्यास प्रत्यवाय नाही.

नेपाळांत सप्रवरविवाह होतात. कौंडिण्य व वासिष्ठ हीं गोत्रें विवाहाला प्रतिबंधक नाहीत. ह्यावरून सगोत्राचा निर्बंध सप्रवरापर्यंत आमच्याकडे ताणला गेल्याची गोष्ट पाठीमागल्या काळांत घडली असावी.

भारद्वाज गोत्रांत परस्परविवाह होतो म्हणजे भारद्वाज गोत्रापुरता सगोत्र-त्वाचा निर्बंध ढिला झाला आहे. तथापि दोन भारद्वाज निराळे असें कल्पून पळ-वाट काढतां येते.

ब्राह्मणांत मामेबहिणीबरोबर लग्न होत नाही. क्षत्रियांत होतें.

मुलगी ऋतुस्नात होण्याच्या पूर्वी तिचें लग्न होतें. लग्न मुलीच्या घरीं लागतें. मुलीचे पैसे घेण्याची वहिवाट नाही. साधारणतः लग्नाचा प्रकार असा— मुलीच्या घरीं वर जातो. मुलीचा बाप वराला तीन प्रदक्षिणा घालतो आणि गंधाक्षत लावतो. आंतरपाट सासरा व जावई ह्यांच्यामध्ये धरतात. आपल्याप्रमाणे वधू व वर ह्यांमध्ये नाही. नंतर मुहुर्तावर कन्यादान होतें. अश्मारोहण वगैरे पुढील विधि यथाशास्त्र

होतो. वेगवेगळ्या जातींत लग्नाचे वेगवेगळे प्रकार रूढ असणें शक्य आहे. एका इंग्रजी ग्रंथकाराने प्रत्यक्ष पाहिलेल्या राजघराण्यांतील लग्नसमारंभाचें वर्णन केलें आहे त्यावरून गोष्टी कळतात त्या अशाः— मनुष्याच्या पाठीवर बसवून मुलीला आणतात. मुलगा व मुलगी ह्यांची मिरवणूक मुलीच्या मुक्कामावर आल्यानंतर कांहीं वेळाने मुलीचा भाऊ मुलाच्या कपाळीं गंध लावतो. वराला वधूच्या माण-सांनी मान्यता दिली असें गंध लावण्याने दर्शविलें जातें. पुढे धार्मिक विधि होतो. दुसरे दिवशीं मुलीसह मुलगा आपल्या घरीं येतो. मुलगी हत्तीवर बसलेली दाराशीं उभी राहते. मुलगा एकटाच नोकराच्या पाठीवर बसून गृहप्रवेश करतो. पाठी-मागून मुलगी घरांत जाते. नंतर एका उच्चस्थानीं तें दांपत्य बसतें व मुलाची बहीण मुलाला कुंकू लावते.

निरनिराळ्या जातींत विवाहसंबंध घडला म्हणजे संततीच्या जातीचा प्रश्न उद्भवतो. संततीच्या जातीचे तीन प्रकार संभवतात. बापाची जात, आईची जात आणि वैकल्पिक जात, हे ते तीन प्रकार होत. नेपाळांत तीनहि प्रकार रूढ अस-ल्याचें अनुभवास आलें.

ब्राह्मणाला क्षत्रियकन्येशीं लग्न करतां येतें. परंतु अशा संबंधापासून झालेला मुलगा क्षत्रिय होतो; ब्राह्मण होत नाही. हें मातृसावर्ण्य झालें.

ब्राह्मण, वैश्यांच्या व शूद्रांच्या बायका करतात. हें लग्न कमी प्रतीचें समजलें जातें. कित्येक तर ह्या संबंधास लग्न म्हणण्यासहि तयार नाहीत. अशा संबंधा-पासून झालेल्या प्रजेची जात खत्री ठरविण्यांत आली आहे. परंतु हा खत्री जातीने ब्राह्मणासारखा असतो. ब्राह्मणाकडून त्याची मुंज लागते. अर्थात् तो जानवें घालतो. खत्री म्हणजे क्षत्रिय नव्हे. अशा मुलाबरोबर बापाचा अन्नव्यवहार होत नाही. एकाच घरांत बापलेक वेगळें जेवण करतात.

मॉरिसने "गुरखा" ह्या आपल्या पुस्तकांत असें लिहिलें आहे की, खत्र्याने गुरुंग जातीच्या स्त्रीबरोबर विवाह केल्यास त्यापासून होणारी संतति बापाच्या जातीची मानतात.

ह्याच पुस्तकांत, काशीहून आलेल्या पांच भावांना काशी-गोत्र म्हणत असें ग्रंथकाराने लिहून ठेवलें आहे. गोत्र शब्दाचा उपयोग कसा केला जातो हें ह्या-वरून समजण्यासारखें आहे. येथे गोत्र शब्द स्थलवाचक आहे.

कांहीं जातींत घरांत स्वतंत्र खोलीची तजवीज केल्याशिवाय मुलाचें लग्न

करीत नाहीत. बापाला विचारलें, कां हो, मुलाचें लग्न कां करीत नाही? तर तो सांगतो की, लग्न करावयाचें आहे परंतु काय करावें, खोलीची सोय अद्यापि करतां आली नाही. ह्या खोलीचें महत्त्व फार आहे. लग्न झाल्यावर नवरानवरी ह्या खोलींत निजण्यास प्रारंभ करतात. निराळ्या खोलींत एकत्र निजणें हेंच गर्भाधान. अल्पवयस्क असल्यामुळे नवरा-नवरी संभोगक्षम नसतात. परंतु एकत्र निजण्यास लग्नापासून सुरुवात होते. चौथ्या दिवशीं सूत्रकारांनी गर्भाधानसंस्कार सांगितला आहे तो हाच संस्कार होय. नवरीच्या बापाकडून जें संसाराचें सामान येतें तें सर्व ह्या नव्या खोलींत निराळें ठेवतात. बापाच्या सामानांत तें मिसळलें जात नाही. लग्न झाल्यावर मुलगा वेगळेपणाच्या मार्गावर जातो.

कांही जातींत अशी चाल आहे की, मुलगी जन्मतांच तिचें लग्न बेल-फळाशीं लावून तें फळ नदींत टाकून देतात. अशा मुलीला पुढे जन्मांत वैधव्य येण्याची भीति नसते. मुलगी पुढे मोठी झाली म्हणजे ती इच्छेप्रमाणे एखाद्या पुरुषाबरोबर राहते. तेथे तिला कंटाळा आला की, त्याला सोडून दुसऱ्या पुरुषाकडे जाऊन राहते. जातांना ती नवऱ्याच्या उशागतीं दोन सुपाऱ्या ठेवते. त्यावरून नवरा समजतो की, बायकोला आपण आवडत नाही. विवाहमोक्षाचा हा अत्यंत सुलभ मार्ग दिसतो.

गुरुंग व मगर ह्यांच्यामध्ये काडीमोड होते. तिचा प्रकार असा—चिखलाच्या दोन गोळ्यांवर दोन बांबूच्या काठ्या ठेवतात. शेजारीं पैसे ठेवतात; त्यांत नवऱ्याचे ४० रु. व बायकोचे १६० रु. असतात. एकाने पैसे उचलले म्हणजे दुसऱ्याने आपला मार्ग सुधारावा.दुसरें लग्न करण्याची मुभा त्यास मिळाली असें समजावयाचें.

ब्राह्मणांत पुनर्विवाह रूढ नाही. बाकी सर्व जातींत पाटाची चाल आहे. तथापि ब्राह्मणाने ब्राह्मणजातीची विधवा बाळगल्यास तिच्यापासून होणारा मुलगा "जैशी ब्राह्मण" बनतो. त्याला बापाच्या मिळकतींत ६ वा हिस्सा मिळतो. जैशी ब्राह्मणाला पौरोहित्य नाही तसेंच दान घेण्याचा अधिकार नाही.

प्रयाग येथे मला असें समजलें की, तेथील पंडे ब्राह्मणांनी ठेविलेल्या रखेली-पासून झालेला मुलगा पंडेब्राह्मणांत सामील होऊं शकतो व त्यास वारसाहि मिळतो.

नेपाळांतील एका चालीचा उल्लेख करण्यासारखा आहे. ह्या चालीचा उल्लेख लँडनने आपल्या पुस्तकांत केला आहे.* ब्राह्मण कांही धार्मिक विधि

* पुस्तक २ पा.२४५.

करतो. त्याच्या योगानें दोन स्नेही सख्खे भाऊ बनतात. त्यांचें हें नातें इतकें दृढ होतें की, त्यांच्या वंशजांना आपसांत विवाहसंबंध करतां येत नाही. असा संबंध करणारांस पूर्वी देहान्तशासन होत असे. आता फक्त दंडावर भागतें.

दोन संस्कृति एकत्र आल्या की, त्यांचा मिलाफ होणें अपरिहार्य आहे.

बरेचसे नेवारी बौद्धमार्गी आहेत. अर्थात् ते द्विधर्मी समजले पाहिजेत; अंशतः हिंदु अंशतः बौद्ध.

तथापि शुद्ध वैदिकधर्मीयांचा व शुद्ध बौद्धधर्मीयांचा शरीरसंबंध वारंवार घडत असतो. ह्या संबंधाची संतति इच्छेनुसार वैदिक अथवा बौद्ध धर्मांत राहते. तिबेटांत नेपाळी लोकांची वस्ती आहे. ह्या नेपाळी लोकांना तिबेटी बायका करणें भाग पडतें. अशा बायकोपासून मुलगा झाला तर तो नेपाळी होतो; मुलगी झाली तर ती तिबेटी होते.

बौद्धधर्मीयांत सावत्रआईबरोबर व्यवहार होत असल्याचें मला एकानें सांगितलें; आणि तोहि बाप जिवंत असतां. दुसऱ्या शब्दांत असें म्हणतां येईल की, बापमुलामध्ये एक बायको असते.

नेपाळांत विधवेचें केशवपन नाही.

वेणीला आगवळाप्रमाणे तांबडा दोरा बांधणें व हातांत बांगड्या घालणें हीं सौभाग्यचिन्हें मानलीं जातात. कुंकू स्त्रियांच्या कपाळीं असतें. तें त्या कपाळाच्या वरच्या बाजूला केसांत लावतात. परंतु सौभाग्यचिन्ह ह्या दृष्टीने कुंकवाला महत्त्व देत नाहीत.

तांबड्या दोऱ्याच्या ऐवजी विधवा वेणीला काळ्या दोऱ्याचा आगवळ बांधते. हेंच तिच्या वैधव्याचें चिन्ह.

नेपाळांत गोषा नाही.

*आप्त मेल्यावर एक वर्षभर पांढरा पोषाख करावा लागतो. मासिक श्राद्ध वर्षभर दर महिन्याला करतात. मासिक श्राद्ध करणारास तेरा दिवस सुतक असतें. श्राद्ध करण्याच्या पूर्वी महिन्यांतून एकदा श्मश्रु करतात. नखेंसुद्धा तोंपर्यंत काढीत नाहीत. सुतकांत मीठ खात नाहीत. दूध दही वर्ज्य मानतात. भात,

* ह्या परिच्छेदांतील माहिती नेपाळच्या सेनापतींचे परसनल असिस्टंट (ह्यांना सुभे म्हणतात) ह्यांनी सांगितली. हे गृहस्थ माझ्याबरोबर आगगाडींत होते. त्यांचा सर्व पोषाख पांढरा होता व दाढी वाढलेली होती.

साखर, तूप, आलें हे पदार्थ चालतात.

बायको मेल्यास ४५ दिवसच पांढरा पोशाख करण्याची वहिवाट आहे.

सोयर अकरा दिवस पाळतात.

अन्यधर्माच्या लोकांना नेपाळांत प्रोत्साहन मिळत नाही. सर्व राज्यांत आज एकहि मिशनरी नाही. मुसलमानांची संख्या एक हजाराहून अधिक नाही. राज्यांत त्यांच्या पांच मशिदी आहेत. आहेत ते सर्व मुसलमान सुनी पंथाचे आहेत. हिंदूला बाटवणाऱ्या मुसलमानाला बारा वर्षांची कैद कायद्याने फरमावली आहे. हिंदु तेथे कधीच बाटत नाही. बाटवलेला हिंदु कामी जातींत जातो. कामी ही हिंदूंमधील शेवटची जात होय.

बौद्ध धर्माचा (हिंदूंना) उपदेश करण्यास मनाई आहे. आर्यधर्माचीं पुस्तकें राज्यांत येऊं देत नाहीत. हिंदुमहासभा स्थापन करूं न देण्याचीं कारणें राजकीय असलीं पाहिजेत.

नेपाळांत दत्तक घेण्याची वहिवाट आहे. दत्तक घ्यावयाचा मुलगा तीन वर्षांच्या आंतला असावा लागतो. एवढेंच नव्हे तर तो मुलगा घेणाराच्या तीन पिढ्यांच्या आंत असला पाहिजे असा आणखी नियम आहे असें मला सांगण्यांत आलें.

ब्राह्मणक्षत्रियेतरांत शाक्तमताचा प्रसार मोठा आहे.

# कालगणना

## नेपाळी पंचांग

उत्तर हिंदुस्थानांत सर्वत्र विक्रम संवत् चालतो तसा तो नेपाळांतहि चालतो. माझ्याजवळ संवत् १९९८ सालचें "नेपालदेशीय" पंचांग आहे. पंचांगावर शालिवाहन शक देऊन इंग्रजी सनहि दिलेला असतो; उ० शालिवाहन शक १८६३; इ.स. १९४१-४२. पंचांगांत इंग्रजी महिने व तारखाहि दिलेल्या आहेत; परंतु मुसलमानी तारखा किंवा वर्ष दिलेलीं नाहीत. नेपाळांत मुसलमानांची वस्ती थोडी कां होईना पण आहे.

ह्याशिवाय नेपाळी संवत् पंचांगाच्या मुखपृष्ठावर देतात. चालू नेपाळी संवत् १०६१-१०६२ आहे. ह्या संवताला धार्मिक महत्त्व नाही. संकल्पांत त्याचा

कर्णात नाहीत. नेपाळी संवताला आरंभ कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून होतो असें दिसतें. पंचांगांत कार्तिक शुद्धाच्या पानावर ने. स. १०६२ असा निर्देश केला आहे. नेपाळी कालगणना कशी सुरू झाली ह्याविषयी बऱ्याच जणांना सांगतां आलें नाही. तथापि एक प्राचीन आख्यायिका एका इंग्रजी ग्रंथांत दिली आहे ती अशीः—

भातगांवच्या राजाला त्याच्या ज्योतिष्यांनी सांगितलें की, आम्ही सांगतों त्या मुहुर्तावर विष्णुमती नदीच्या पात्रांत आम्ही सांगूं त्या ठिकाणची वाळू तूं सूर्योदयाच्या पूर्वी आणलीस तर त्या वाळूचें सोनें होईल. राजाने ज्योतिष्यांनी सांगितलेल्या दिवशीं व वेळीं नदीची वाळू आणण्यासाठी नोकर पाठविले. ह्या गोष्टीचा सुगावा खाटमांडूच्या सक नांवाच्या एका नेवारी गृहस्थाला लागला. त्याने युक्तीने वाळू घेऊन जाणाऱ्या इसमांस वाटेंत गांठून त्यांस चांगली मजुरी देऊन त्यांच्याकडून ती वाळू आपल्या घरीं आणून ठेवली. अर्थात् त्याला पुष्कळ संपत्ति प्राप्त झाली. तेव्हा त्याने नेपाळला नवीन शक दिला. नेपाळी संवत् शालिवाहन शक ८०१ ह्या वर्षी सुरू झाला. ह्यावरून तो फार प्राचीन नाही हें उघड आहे. वरील आख्यायिका पौराणिक स्वरूपाची असून विश्वसनीय दिसत नाही. राज्यक्रांतीने ह्या शकास जन्म दिला असावा.

पंचांगाचें साल संवत् १९९८ व शक १८६३ आहे: म्हणजे आरंभापासून अखेरपर्यंत एकच साल आहे. आपल्याकडील पंचांगाचें वर्ष शालिवाहनीय असतें त्यामुळे विक्रमीय संवताची संख्या एकाच वर्षांत दोन आंकड्यांनी व्यक्त करावी लागते; उ० शके १८६३ = विक्रम संवत् १९९७-९८. आपल्याकडील विक्रमवर्षांचा व नेपाळी संवताचा प्रारंभ कार्तिक शुद्ध प्रतिपदेस होतो. नेपाळी लोक विक्रमवर्ष वैशाख ते चैत्र असें धरतात.

पंचांगावर कलीचे गताब्द (५०४२) देऊन शिवाय सृष्टितो गताब्द (१९५५८८५०४२) दिलेले आहेत. ह्यामुळे जवळ जवळ दोन अब्ज वर्षांच्या प्रचंड कालगणनेचा मनावर परिणाम झाल्यावांचून राहत नाही. संकल्पांत हीच गणना आम्ही शब्दांनी करीत असतों; परंतु ती आंकड्यांत नसल्याने कोणालाच समजत नाही.

वर्षाचा पहिला महिना वैशाख; तसेंच प्रथम कृष्णपक्ष व नंतर शुक्लपक्ष. वर्षारंभीं कोणतीहि तीथ येईल; प्रतिपदाच आली पाहिजे असें नाही. अश्विनी मेषेर्कः म्हणजे मेषसंक्रांत ज्या दिवशीं होईल तो वैशाख महिन्याचा पहिला दिवस

होय. बारा राशींचे अथवा संक्रांतींचे बारा महिने. नांवें मात्र वैशाख, ज्येष्ठ, आषाढ वगैरे. रविसंक्रमणाचा काल २९ ते ३२ दिवसांचा असतो. म्हणून महिन्याचे दिवस इंग्रजी महिन्यांप्रमाणे कमी जास्ती होतात. असें असून पंधरवडे पूर्णिमान्त व अमावास्यान्त असेच आहेत. संवत् १९९८ सालच्या महिन्यांचे दिवस व प्रारंभतिथि येणेंप्रमाणे :—

| महिन्याचें नांव | प्रारंभतिथि | दिनसंख्या |
|---|---|---|
| १ वैशाख | वै. वा। २ आदित्यवार | ३१ |
| २ ज्येष्ठ | ज्ये. वा। ४ बुधवार | ३१ |
| ३ आषाढ | आ. वा। ५ शनिवार | ३२ |
| ४ श्रावण | श्रा. वा। ८ बुधवार | ३१ |
| ५ भाद्रपद | भा. वा। ९ शनिवार | ३१ |
| ६ आश्विन | आ. वा। १० मंगळवार | ३१ |
| ७ कार्तिक | का. वा। १२ शुक्रवार | ३० |
| ८ मार्गशीर्ष | मा. वा। १२ आदित्यवार | २९ |
| ९ पौष | पौ. वा। १२ सोमवार | ३० |
| १० माघ | मा. वा। ११ मंगळवार | २९ |
| ११ फाल्गुन | फा. वा। १२ गुरुवार | ३० |
| १२ चैत्र | चै. वा। १२ शनिवार | ३० |

सबंध वर्षाचे दिवस ३६५ झाले. हें सौर वर्ष झालें. सूर्यसिद्धान्तोक्त नाक्षत्र सौरवर्ष ३६५ दि० १५ घ० ३१ प० ३१ विपळें ह्या कालमानाचें आहे. हेंच नेपाळी पंचांगाचें वर्षमान होय. मास सौर आहेत हें सांगावयास नकोच. सौर म्हणजे सूर्यसंक्रांतिपरत्वें. सूर्योदयापासून मध्यरात्रीपर्यंत केव्हाहि सूर्य-संक्रमण झालें तर त्या दिवशीं सूर्योदयापासून मासारंभ मानला आहे. मध्यरात्री-नंतर संक्रमण झाल्यास मासारंभ उजाडत्या दिवसापासून धरतात.

मास सौर असले तरी महिन्याचा आरंभ व अंत तिथीवर बसविला आहे. पंधरवड्याची पहिली तीथ प्रतिपदा असून शेवटली अमावास्या व पूर्णिमा आहे. ३६५ दिवसांत ३७१ तिथि येतात. ह्या पद्धतीमुळे शेवटीं बारा दिवसांचा एक पंधरवडा वाढला आहे. ह्या वाढत्या पंधरवड्याला वैशाख कृष्ण हें नांव दिलें आहे. हा पंधरवडा शके १८६३ किंवा संवत् १९९८ ह्या वर्षांतील आहे हें

लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. अधिक चैत्र असेंहि ह्या बारा दिवसांच्या काळाला म्हणतां येईल. चैत्र शु॥ १५ हा वर्षाचा (तिथिमानाने) शेवटचा दिवस; परंतु चैत्राच्या १९ व्या दिवशीं पूर्णिमा येते. अर्थात् चैत्राचे ११ दिवस राहिले ते पुढे दिले. मीन-संक्रांत चैत्राच्या ३० व्या दिवशीं संपते. १३ एप्रिल १९४१ ते १२ एप्रिल १९४२ पर्यंत एक वर्ष झालें आहे. एप्रिल २ ते १२ सन १९४२ पर्यंतचे अकरा दिवस वैशाखांत घातले आहेत. संवत् १९९९ सालाच्या आरंभीं १३ एप्रिल; वैशाख १; सोमवार; वैशाख वद्य १३ असे योग असणार. पुढल्या महिन्याचें नांव ह्या अधिक अकरा दिवसांना दिलें आहे.

महिन्यांचीं नांवें—वैशाख; जेठ; असार; साउन; भादौ; असौन; कात्तीक; मङ्गीर; पूस; माघ; फागून; चैत्र.

आपल्या पंचांगांत विक्रमसंवत्सराचें (१९९८) नांव "विजय" असून शालिवाहनशकाचें (१८६३) "वृष" आहे. परंतु नेपाली ह्याच सालाचें नांव जय आहे. ६० बार्हस्पत्यसंवत्सरांतील २८ वा संवत्सर "जय" आहे. ह्यावरून नांवापुरतें बार्हस्पत्यमान घेतलें आहे असें दिसतें.

मीनसंक्रांतीला आरंभ ज्यांत होईल तो चैत्र महिना असें व्यासाचें एक वचन हेमाद्रीने दिलें आहे: (मीनादिस्थोरविर्येषाम् प्रारंभः प्रथमे क्षणः । चैत्रादिः स च विज्ञेयः क्रमात् द्वादशतो बुधैः) ह्या वचनानुसार नेपाळी पंचांगाची मास-योजना दिसते.

सण, उपोषणें, व्रतें आपल्या पंचांगाप्रमाणेच ठिकठिकाणीं निर्दिष्ट केलेलीं आहेत. आषाढ महिन्यांत मुंजी व लग्नमुहूर्त दिलेले आहेत.

खाली काशीप्रयागच्या पंचांगांतून वर्षारंभ चैत्र शुद्ध प्रतिपदेस दिलेला आढळतो. महिने पूर्णिमान्त असतात. नेपाळांत नेवारी लोकांमध्ये मात्र अमावस्यान्त महिना मानतात. नेवारी लोक दक्षिणेकडून गेल्याचें हें गमक समजलें जातें. प्रयागच्या पंचांगांत जलाशयारामदेवप्रतिष्ठेचा व द्विरागमन-वधूप्रवेशाचा मुहूर्त दिला आहे; चैत्र शुक्ल १० ला "यमपूजामध्यान्हे" सांगितली आहे; शिवाय "सर्व-दोषविनाशको रवियोगः" असा योग दिला आहे.

पंचांगांत सर्पदंशावर औषध सांगितलें आहे तें असें:—

गोमूत्रैर्नरमूत्रैर्वा पुराणेन घृतेन वा हरिद्रापानमात्रेण विषं हन्ति चराचरम् । (दशवर्षोत्परं सर्पिः पुराणमिति कथ्यते).

## परिशिष्ट ३ रें

# आंतरिक्षवहनमार्ग

पार्वतप्रदेशांत मालाची वाहतूक त्रासदायक व खर्चाची असते. मनुष्याच्या व जनावराच्या पाठीवरून माल इकडून तिकडे नेण्यांत येतो. सन १८६८ च्या सुमारास हॉज्सन नांवाच्या इसमाने एक युक्ति काढून ही अडचण दूर केली आहे. खांबांवर तारांचे दोर टाकून त्या दोरांवरून विजेच्या शक्तीने मालाची किंवा मनुष्यांचीसुद्धा नेआण करतां येईल अशा स्वरूपाची हॉज्सनची योजना आहे. इंग्रेजींत ह्याला रोपरोड म्हणजे रज्जुरस्ता असें म्हणतात. ह्या रस्त्याला बारा लाख रुपये खर्च आला. १९२३च्या मार्च महिन्यांत कामास सुरुवात होऊन १९२५त पुरें झालें. आता ही नेपाळ सरकारची उत्पन्नाची बाब झाली आहे. खालील वर्णनावरून ह्या आकाशमार्गाची वाचकांना थोडीशी कल्पना करितां येईल.

ह्या रस्त्याचे सात स्वतंत्र भाग पाडलेले आहेत. प्रत्येक भागाला विजेच्या शक्तीने गति मिळते. प्रत्येक भागाच्या दोन टोकांला एकेक दहा फूट व्यासाचें आडवें चक्र असतें. ह्या दोन चक्रांच्या मोवताल्रून एक जानव्यासारखी तार लावलेली असते. ही तार $\frac{1}{2}''$ जाडीची व २९ टन वजन सहन करील इतकी भक्कम असते. एका चक्राला विजेच्या शक्तीने गति मिळून तें आपल्या जोडणीच्या सरंजामांतून फिरतें. त्यामुळे चक्रावरील तारहि सरकत सरकत जाते. ह्या सरकण्याचा वेग तासीं ४॥ मैल असतो. तार सरकते ती मालासह सरकते. माल ठेवण्याच्या पात्राला अगर बारदानाला आपण पाळणा म्हणूं. असे पाळणे चापांत अगर "विंचवां"त अडकवितात. आणि विंचू तारेला लटकावलेले असतात. दोन पाळण्यांमधील अंतर २४० यार्ड असलेंच पाहिजे अशी योजना केलेली असते. हे पाळणे तारेबरोबर सरकत जातात.

तारेला खांबांचा आधार असतोच. हे खांब एकंदर १०६ आहेत. जमिनीच्या चढउताराप्रमाणे खांबांची उंची कमजास्त असते. अगदी लहान खांब १२ फूट व मोठा खांब १०० फूट उंचीचा आहे. हे खांब सारख्या अंतरावर नाहीत. जास्तींत जास्त अंतर १३०० यार्ड आहे.

ह्या तारस्त्याचे सात विभाग असून प्रत्येक विभाग स्वतंत्र म्हणजे अलग

किंवा तुटक असल्याचें वर सांगितलेंच आहे. ह्या विभागांवर लोखंडी रूळ टाकलेला आहे. विभागाच्या शेवटीं ओझ्याचा पाळणा आला कीं, तेथून तो आपोआप सुटतो, रुळावर जातो आणि परत दुसऱ्या भागाच्या तारेला अडकतो.

अशा रीतीने आरंभापासून अखेरपर्यंत ओझें जातें. भरपूर ओझें वाहून नेण्यास ८० अश्वशक्ति खर्चावी लागते.

## परिशिष्ट ४ थें

# नेपाळी भाषा

नेपाळी भाषा संस्कृतोद्भव आहे ह्यांत शंका नाहीं. तिची लिपि देवनागरी आहे. गुजराथी, हिंदी, पंजाबी, सिंधी वगैरे भाषांचे परिणाम नेपाळी भाषेवर झालेले दिसतात. त्यावरून वरील भाषांच्या मिश्रणाने नेपाळी भाषा बनलेली असावी असें म्हणतां येईल. आणि तसें असल्यास सध्याच्या नेपाळी लोकांचे पूर्वज गुजराथी, हिंदी, पंजाबी, सिंधी असण्याचा संभव आहे. कोशकारांच्या मतें ५००० नेपाळी शब्द संस्कृतोद्भव आहेत. तसेंच २००० हून अधिक शब्दांचें मराठी शब्दांशीं साम्य आहे. ळ, क्ष, ज्ञ ह्या अक्षरांनी आरंभ झालेले शब्द नेपाळी भाषेच्या कोशांत मला आढळले नाहीत. अथर्ववेदांतील कांहीं शब्द नेपाळी भाषेंत आढळतात असें कित्येकांचें म्हणणें आहे.

नेपाळी व नेवारी ह्या स्वतंत्र भाषा दिसतात. एकाच अर्थाचे ह्या दोन भाषांतील कांहीं शब्द येथे देतों:—

| नेपाळी | नेवारी |
|---|---|
| मामा | पञ्जू |
| सरूरू (सासरा) | सुसमांग |
| रगत (रक्त) | र्वी |
| सुरुग (आकाश) | आकस |
| चंदमा (चन्द्र) | लुइमह्लेदेव |
| घोडा—घोरा | सिंह |
| आग (अग्नि) | मी |

## कांही धातु

| | |
|---|---|
| १ हेर्नु– पाहणें | १५ टोकनु– चावणें |
| २ दिनु– देणें | १६ लुकाउनु– लपणें |
| ३ जानु– जाणें | १७ उम्रनु, बढ्नु } वाढणें |
| ४ बिसर्नु– विसरणें | |
| ५ देखावनु– दाखवणें | १८ बस्नु– बसणें |
| ६ देख्नु– पाहणें | १९ जान्नु– जाणणें |
| ७ उभिनु– उभें राहणें | २० बोल्नु– बोलणें |
| ८ हुनु– होणें | २१ आउनु– येणें |
| ९ भन्नु– सांगणें | २२ खस्नु– पडणें |
| १० गर्नु– करणें | २३ बिउँझनु– जागें होणें |
| ११ सुत्नु– निजणें | २४ पिउनु– पिणें |
| १२ उठनु– उठणें | २५ भाँचनु– मोडणें; मंगणें |
| १३ रहनु– राहणें | २६ किन्नु– विकत घेणें |
| १४ खानु– खाणें | २७ रुनु– रडणें |

## कांही शब्द

| | |
|---|---|
| १ लोग्ने– पति | १३ टीटो– मुलगा |
| २ स्वास्नी– पत्नी | १४ टीटी– मुलगी |
| ३ दाजु– भाऊ | १५ बाछा– गोऱ्हा |
| ४ दिदि– बहीण | १६ बाछी– कालवड |
| ५ छोरो– पुत्र | १७ बाजे– आजा |
| ६ छोरी– कन्या | १८ बज्यै– आजी |
| ७ कन्याकेटा– ब्रह्मचारी | १९ सानुबाबु– सावत्रबाप |
| ८ कन्याकेटी– अविवाहित स्त्री | २० सानीआमा– सावत्र आई |
| ९ वीर– डुकर | २१ राँडो– विधुर |
| १० पोथी[1]माउरी– मधमाशी | २२ दुलहा– ही– नवरा; नवरी |
| ११ घरपट्टी (गृहपति)– यजमान | २३ टुहुरा–री–अनाथ मुलगा–मुलगी |
| १२ घरपट्टिनी– यजमानीण | २४ ठूलो (स्थूल)– मोठा |

१ मादी.

२५ सानो– लहान
२६ र– आणि
२७ कुलाकघर– पोष्टऑफिस
२८ खयं[1]– कोठे
२९ रौं– केस
३० भोली– उद्यां
३१ कुरा– गोष्ट; हकीकत
३२ एउटा– एक
३३ यत्तिकैमा– इतक्यांत
३४ केटा–टी– मुलगा-गी

## कांही वाक्यें

१ घोडाहरु डुल्कि जान्छन् = घोडे दुड दुड चालतात.

२ जङ्गलमा धेरै किसिमका जानवरहरु छन् = जंगलांत अनेक जातींचीं जनावरें असतात.

३ हरि स्कूलमा छ; उसलाई आऊ भन = हरि शाळेंत आहे; त्याला येण्यास सांग.

४ राम र म घर गएँ = राम आणि मी घरीं गेलों.

५ किताब छापिन लागि रहे छ = पुस्तक छापत आहे.

६ तिम्रो आयु लामो होओस् = तुमचें आयुष्य लांब होवो (तुम्ही चिरायु व्हा.)

७ हेर, छुट्टीको वेला हुनाले त्यस मैदानमा कति केटाकेटीहरु जम्मा भएका छन् = पाहा, सुट्टीची वेळ असल्याने त्या मैदानांत किती मुलगे-मुली जमा झालेलीं आहेत.

८ कदाचित् टट्ठामा पनि असत्य बोल्यो भने ठुलो हानि हुन्छ = कदाचित् थट्टेने सुद्धा खोटें बोललें म्हणजे मोठी हानि होते.

९ घडाको मुख सानो हुनाले त्यसको हात बाहिर आएन = घड्याचें तोंड लहान असल्याने त्याचा हात बाहेर येईना.

१० त्यस्तो म कहिल्यै गर्ने छैन = तसें मी केव्हाहि करणार नाहीं.

हरु हा अनेकवचनी प्रत्यय नामाला लागतो; उ. वानरहरू = अनेक वानर.

तृतीयेचा प्रत्यय ले आहे; जसें "एकदिन सुशीला देवीले आफ्ना छोरा गोविंदलाई भनिन्" – एक दिवस सुशीला देवीने आपला मुलगा गोविंद ह्याला सांगितलें. ह्याच वाक्यांत **लाई** हा द्वितीया-चतुर्थीचा प्रत्यय आलेला आहे.

१ ताडून पाहा, खँय गोमांतकी कोंकणी; अर्थ कोठे.

मुखले=मुखानें, हातले=हाताने. हिंदीप्रमाणे का हा षष्ठीचा प्रत्यय; उ. यसमा धेरै कुराको लाम छ– ह्यांत अनेक (धेरै) गोष्टींचा (कुराको) लाम होतो. यसमा ह्यांत मा हा सप्तमीचा प्रत्यय आहे.

मराठींत ऊन प्रत्यय लावून धातुसाधितें होतात तशीं नेपाळी भाषेंत ईर प्रत्यय लावून होतात; उ. गरेर (करून); छोडेर (सोडून); सुनेर (ऐकून) इ०. भूतकाळाचीं रूपें: उट्यो (मनमा दया उठ्यो); मन्यो (व्याधाले मन्यो=व्याधानें म्हटलें). छ म्हणजे आहे; उ. आकाश साफ छ. ह्यांत गुजराथीची छटा मारते. मा हा सप्तमीचा प्रत्यय तर गुजराथी आहे. छचें अनेकवचन छन्. प्रथमपुरुषी एकवचन छुं; उ. कथा सुनाउँ छुं– मी कथा ऐकवतों–सांगतों. सुनाऊँ प्रयोजक; तिमीभंदा (तुझ्यापेक्षा) म (मी) कति राम्रो छु (किती सुंदर आहें).

दौडुँला हें दौड धातूचें भविष्यकाळाचें प्रथमपुरुषी एकवचनी रूप– म दौडुँला=मी धावेन. हेंच तृतीयपुरुषी एकवचनी रूप दौड्ला असें होईल: तो (त्यो) धावेल.

पन हा भाववाचकनामाचा प्रत्यय; जसें अलसीपन=आळशीपणा.

ह्यावरून ढोबळ मानाने नेपाळी भाषेचें स्वरूप लक्षांत येईल.

## परिशिष्ट ५ वें

# पेशवे

### नानासाहेबाचे अखेरचे दिवस

इ. स. १८५७ च्या युद्धांत पराभव झाल्यानंतर नानासाहेब नेपाळांत आपल्या परिवारासह गेला ह्यांत शंका नाही. नानासाहेब म्हणून अनेकांना इंग्लिशांनी फांशीं दिलें. परंतु खरा नानासाहेब फांशीं गेला नाही हें तितकेंच खरें. खरा नानासाहेब फांशीं गेला ह्या गोष्टीवर इंग्लिश सरकारचाहि विश्वास नव्हता. तेव्हा त्याविषयी जास्त चिकित्सा करण्याचें कारण नाही. श्री. राजाराम गणेश करमरकर ह्यांनी निश्चयपूर्वक मला सांगितलें की नानासाहेब फांशीं गेला नाही.

नेपाळांत गेल्यावर थोडक्याच काळांत नानासाहेब वाघ्याने मेला असें एक म्हणणें पुढे आलें आहे. सिद्धिमान नांवाच्या इसमाने जंगबहादूरला नाना-

साहेब ता. २४ सप्टेंबर १८५९ रोजीं वारल्याचें कळविलें, अशा मजकुराचें पत्र नेपाळच्या रेसिडेंटाने विलायत सरकारास ता. ८ आक्टोबर १८५९ रोजीं लिहिलें[1]. नानासाहेबाच्या मृत्यूची बातमी बायांनी सिद्धिमानला निरोपाने कळविली होती. ह्याच पत्रांत रेसिडेंटाने सदरहु बातमी संशयास्पद आहे असें सुचविलें होतें. आणि इंग्लिश सरकारलाहि ही बातमी खरी असें कधीच वाटलें नाही. त्यांची नानासाहेबाविषयी चौकशी सारखी चालूच होती. जंगबहाद्दूरच्या वर्तनाने हा संशय वाढतच गेला. एकदा त्याने नानासाहेब दक्षिणेंत गेल्याचें रेसिडेंट रॅमसे ह्याला सांगितलें तर दुसऱ्या खेपेस (नोव्हेंबर १८६१) नानासाहेब मेला नाही, प्रेत जाळलें तें दुसऱ्याचें असावें असें सांगितलें.[1] करमरकरांच्या म्हणण्यांत नानासाहेब तिबेटकडे गेले. अर्थात् देवखुरी येथे नानासाहेब मेला ह्या गोष्टीवर कोणाचाच विश्वास नाही. नानासाहेबांच्या मागचें संकट टाळण्यासाठी बायांनी मोठ्या शहाणपणाने हा व्यूह रचला असावा. सईबाईने १०००० रुपयांचें जवाहीर विकून नानासाहेबाची क्रिया कार्तिक शु १० संवत् १९१६ रोजीं केल्याचा पुकारा केला. कदाचित् क्रियेचा देखावाहि झाला असेल. क्रिया योग्य रीतीने केल्याबद्दल जंगबहाद्दूरने सिद्धिमानची तारीफ केली आहे.[1] सिद्धिमान हा बायांकडील माणूस. इंग्लिश सरकारचीं पत्रें आलीं कीं तीं जंगबहाद्दूर सिद्धिमानकडे पाठवी. सिद्धिमान म्हणतो, आता मी इंग्लिश सरकारची खात्री तरी कशी करूं ?[1] सिद्धिमानचीं पत्रें जंगबहाद्दूरला तराईतून गेलीं आहेत. नानासाहेब व बाळासाहेब तेथेच होते. बाळासाहेब ह्याच सुमारास वारले. नानासाहेब वारल्याचें बाजीरावाच्या बायकोने सिद्धिमानला सांगितलें व जंगबहाद्दूरला भेटण्याची इच्छा त्याच्याजवळ दर्शविली (स.१८५९ आक्टोबर?). तराई म्हणजे डोंगराच्या पायथ्याशीं असलेली व पुष्कळ झाडें असलेली जमीन किंवा प्रदेश. परंतु नकाशाकडे पाहतां देवखुरी गांव तराईत येईल असें वाटत नाही. खाटमांडूच्याहि वरच्या बाजूस हा गांव आहे. आणि देवखुरी येथे वाख्याने नानासाहेब वारला असा बोमाटा आहे. ह्यावरून नानासाहेब मेल्याच्या हकीकतींत राजकारण असलें पाहिजे असा संशय येणें स्वाभाविक आहे.

नानासाहेब मेला नाही ह्याला एक मोठें प्रमाण म्हणजे त्याची बायको मरेपर्यंत सवाष्णपणाचीं चिन्हें बाळगून होती. तिचा विधवा वेष नव्हता ही गोष्ट प्रत्यक्ष तिच्या बापाने पाहिल्याचें ठगी दप्तरांत नमूद आहे.[1] करमरकर तेंच सांग-

१ लँडन (नानासाहेबावरील प्रकरण).

तात. दरसाल चैत्र महिन्यांत हळदकुंकू होत असल्याचें आणखी एक प्रमाण त्यांनी पुढें आणलें आहे. नानासाहेब खरोखर मेला असता तर त्याच्या बायकोकडून वैधव्याची चिन्हें न स्वीकारण्याचें धाडस झालें नसतें; व तसें करण्यांत कांही हेतुहि नव्हता. उलट सवाशीण राहण्याने नानासाहेबांच्या जीवाला धोकाच होता. सारांश, नानासाहेब सन १८५९ सालीं नेपाळांत असतांना मेला ही गोष्ट विश्वसनीय ठरणार नाही.

नानासाहेबास जो पकडून देईल त्याला इंग्लिश सरकारने एक लाख रुपयांचें बक्षीस देण्याचें जाहीर केलें होतें. ह्या बक्षिसाच्या लालचीने नानासाहेबास आम्हीं पाहिलें म्हणून सांगणारे इसम वारंवार पुढे येत. प्रयाग येथे कुंभमेळ्यांत नानासाहेबाबरोबर आपण जेवलों असें गोरक्षणसंस्थेच्या अध्यक्षाने सांगितलें (१८८५?). ह्याच्या पूर्वी (१८६४) आसामच्या सरहद्दीवर दिवाणगिरी येथे नानासाहेब भूतानच्या सैन्यांत असून लढत आहे असें इंग्लिश फौजेच्या कानांवर आलें होतें.[1] ता. ५ मार्च १८९५ रोजीं बातमी आली की, चंद्रगिरीखाली चित्लॉंग येथे बैराग्यांच्या मेळयांत राणीला भेटण्यास नानासाहेब येणार आहे.[1] थापाथळी येथे राहत्या वाड्यांत बैराग्यांच्या मेळयांत दरसाल नानासाहेब येऊन राणीस भेटे व त्याचसाठी राणी म्हणजे नानासाहेबाची बायको बैराग्यांना शिधा व कपडे वांटी असाहि संशय घेण्यांत येत असे. अगदी शेवटला प्रकार राजकोटपासून ३० मैलांवर असलेल्या एका खेड्यांत १८९५ सालीं घडला. तेथे एक वेडा आला. झोपेंत तो नेपाळच्या गोष्टी बोले व मी पेशवा होईन असें बरळे. त्याला पोलीस अधिकाऱ्याने पकडलें. परंतु व्हॉईसरायाच्या हुकुमावरून त्यास अखेरीस सोडून देण्यांत आलें.[1] अशा रीतीने १८९५ पर्यंत तरी नानासाहेब जिवंत असल्याच्या बातम्या कानांवर येत होत्या.

राजाराम गणेश करमरकर ह्यांनी समक्ष तोंडी सांगितलेली माहिती त्यांच्याच शब्दांत येथे देतों.

"सईबाई संवत् १९५२–५३ सालीं वारली.[2] आर्याघाटावर पशुपतीजवळ तिच्या प्रेताचें दहन झालें. सईबाईच्या पश्चात् कोणी राहिलें नाही.

---

१ लँडन (नानासाहेबावरील प्रकरण).

२ निश्चित काळ फाल्गुन संवत् १९५३ पहिला पंधरवडा. ही माहिती पुजाऱ्याने दिली.

नानासाहेबाची बायको सईबाईच्या अगोदरच वारली होती. त्या वेळीं मीं लहान होतों. हल्लीं माझें वय ६३ वर्षांचें आहे. मी सईबाईकडेच राहत होतों. नानासाहेबाची बायको करमरकरांची मुलगी. कोणा करमरकरांची तें मला माहीत नाही.[1] ती मेली तेव्हा मी ७।८ वर्षांचा होतों. तिला मूलबाळ नव्हतें. मरण्याच्या वेळीं ती सुमारें ४० वर्षांची होती. सासवासुना दोघी एकत्र राहत असत. सईबाईने लक्ष्मीनारायणाचें मंदीर बांधलें. तिच्या राहण्याची जागा थापाथळी.

राणीगंज येथे हनुमानमंदीर आहे. तें सईबाईने बांधलें. तेथे तिचे कारकून होते. राणीगंज येथे सईबाईने जमीन विकत घेतली होती. माझी मुंज सईबाईकडे झाली. स.१८५७ सालीं नानासाहेबांबरोबर सईबाई येथे आली. तिला येथे ठेवून नानासाहेब इतरत्र गेले. ते पुनः ह्या बाजूला आले नाहीत.

नानासाहेबांची बायको सवाशीण अशी मेली. नेपाळ सरकारपासून सईबाईने गांवें विकत घेतलीं होतीं. रामभाऊ नांवाचा इसम सईबाईचा कारभारी होता. त्याच्या पूर्वी टोपी आडनांवाचा मनुष्य कारभारी होता. तो पुढे निघून गेला. तात्या टोपी इकडे आलेला नाही. नानासाहेबाच्या एक दोन कबीला सईबाई-बरोबर होत्या.[2] त्या कधी मेल्या माहीत नाही. सईबाईने एक मुलगा दत्तक घेण्याच्या हेतूने आणला होता. त्यानेच तिची उत्तरक्रिया केली असावी. तो तिचा भाचा असेल. सईबाई उंच, गोरी, सडपातळ अशी होती. ती सोवळी झालेली होती. पेशव्यांची गादी सईबाईबरोबर होती. भगवा झेंडा मीं पाहिला नाही. नेपाळहद्दींत नानासाहेब आल्यावर त्यांच्या राहण्याची व्यवस्था नेपाळ सरकारने केली. लक्ष्मी-नारायणाचे पुजारी लक्ष्मणराव नांवाचे कोकणस्थ ब्राह्मण होते. ते येथेच सई-बाईच्या नंतर पुष्कळ वर्षांनी मेले. त्यांच्यामागून नेपाळी पुजारी नेमला गेला. नानासाहेबाची बायको गोरी, ठेंगणी व कांहीशी स्थूल अशी होती.

नानासाहेब पंचवीस वर्षांपूर्वीपर्यंत जिवंत होता. तो चीन देशांत जाऊन राहिला होता. येथून तिबेटांत गेला व तेथून चीनमध्ये. तेथे तो नेपाळ सरकारच्या सूचनेवरूनच गेला. गादी होती ती नारायणराव पेशव्याची होती. ती तिसऱ्या

१ रामचंद्र सखाराम करमरकर ह्यांची मुलगी काशीबाई (कृष्णाबाई) असें लँडन म्हणतो.

२ नानासाहेबांबरोबर तात्या टोपीचा धाकटा भाऊ, बाबा गोडबोले, जन्नूसिंग व परशराम जगमल हे नोकर नेपाळांत येतांना होते. शिवाय दोन बायका होत्या असें लँडन लिहितो. ह्या बायका नोकरवजा असाव्यात.

मजल्यावर ठेवलेली असे. तेथे जाण्यास कोणास परवानगी नव्हती. तेथे रात्रीं पाणी व फराळाचे पदार्थ दररोज ठेवीत; दिवाहि तेवत ठेवीत.

सुनेला ४०० रुपये व सासूला ८०० रुपये दरमहा नेपाळ सरकारांतून मिळत. हें वेतन देत तेव्हा नेपाळ सरकारजवळ पेशव्यांचें कांहीएक धन नव्हतें.

सईबाई सकाळीं ५ वाजतां उठून पूजाअर्चा करी. ह्यांत तिचे दोन तास जात. पूजेच्या वेळीं गवई गात असे. नंतर विश्रांति घेऊन १०॥ वाजतां जेवणें होत. दुपारीं पुराण होई. ती रात्रीं फक्त दूध पीत असे. सईबाईच्या परिवारांत ५-६ बायका, ५-६ पुरुष व ४-५ स्वयंपाकिणी होत्या. सईबाई वारली तेव्हा ५५-६० वर्षांची होती."

मीं नेपाळ सोडल्यावर पुन: कांहीं प्रश्न विचारले. त्या माझ्या पत्राचें उत्तर आलें त्यांतील मजकूर—

नेपाळ ता. ९।४।४१

कृ. सा. वि. वि. चैत्र शु॥ १२ बुधवार

आपलीं दोन पत्रें मिळालीं. पहिल्या पत्रांत भीमाबाई कोण असें विचारलें आहे[1]. भीमाबाई ही मराठीन होती. ब्राह्मणाची बाई नव्हे. प्रेमनाथ हे माझे परिचयाचे आहेत. ह्यांच्यापेक्षा सुद्धा त्यांचे वडील बंधु वैकुंठपंडित यांचें पेशवीण-बाईकडे जाणें येणें फार होतें. परंतु त्यांनासुद्धा ही गोष्ट माहीत नव्हती. वैकुंठ-पंडित हे ज्या वेळेस सईबाई वारली त्या वेळेस मध्यस्थ होते; म्हणजे पेशवीणबाई-कडील गोष्टी सरकारांत कळवावयाच्या व तेथे जो निकाल, हुकूम होईल तो यांना कळवावयाचा हें काम त्यांचेकडे होतें. प्रेमनाथ हे श्राद्धाला जेवणास जात होते ही गोष्ट खरी. परंतु नेपाळी ब्राह्मण आपले येथे जेवत नाहीत. कारण भात खात नाहीत. पक्की रसोई खातात; म्हणजे पुऱ्या-लाडू वगैरे खातात. तेव्हा श्राद्धाशीं व जेव-णाशीं त्यांचा कांहीं संबंध नाही. व त्यांचेजवळ तर्पणाची यादी पण मिळणें शक्य नाहीं. भीमाबाई मराठीन असून तिने एक नेपाळी मुलगा बाळगला होता. व ती सईबाईनंतर बरींच वर्षें जिवंत होती. पुढे ती वारली. नानासाहेबांना तीन बायका होत्या. परंतु मला दोन बायकांचें कांहीं माहीत नाही. नानासाहेबांची बायको सवाष्ण होती याला एक पुरावा असा आहे की, चैत्रांत त्यांचेकडे हळदकुंकू होत

[1] भीमाबाईचें व प्रेमनाथाचें नांव मला राजगुरु हेमराज ह्यांच्याकडून समजलें.

नानासाहेबाची बायको सईबाईच्या अगोदरच वारली होती. त्या वेळीं मी लहान होतों. हल्लीं माझें वय ६३ वर्षांचें आहे. मी सईबाईकडेच राहत होतों. नानासाहेबाची बायको करमरकरांची मुलगी. कोणा करमरकरांची तें मला माहीत नाही.[१] ती मेली तेव्हा मी ७।८ वर्षांचा होतों. तिला मूलबाळ नव्हतें. मरण्याच्या वेळीं ती सुमारें ४० वर्षांची होती. सासवासुना दोघी एकत्र राहत असत. सईबाईनें लक्ष्मीनारायणाचें मंदीर बांधलें. तिच्या राहण्याची जागा थापाथळी.

राणीगंज येथे हनुमानमंदीर आहे. तें सईबाईनें बांधलें. तेथे तिचे कारकून होते. राणीगंज येथे सईबाईनें जमीन विकत घेतली होती. माझी मुंज सईबाईकडे झाली. स.१८५७ सालीं नानासाहेबांबरोबर सईबाई येथे आली. तिला येथे ठेवून नानासाहेब इतरत्र गेले. ते पुनः ह्या बाजूला आले नाहीत.

नानासाहेबांची बायको सवाशीण अशी मेली. नेपाळ सरकारपासून सईबाईनें गांवें विकत घेतलीं होतीं. रामभाऊ नांवाचा इसम सईबाईचा कारभारी होता. त्याच्या पूर्वी टोपी आडनांवाचा मनुष्य कारभारी होता. तो पुढे निघून गेला. तात्या टोपी इकडे आलेला नाही. नानासाहेबाच्या एक दोन कबीला सईबाई-बरोबर होत्या.[२] त्या कधी मेल्या माहीत नाही. सईबाईनें एक मुलगा दत्तक घेण्याच्या हेतूनें आणला होता. त्यानेच तिची उत्तरक्रिया केली असावी. तो तिचा भाचा असेल. सईबाई उंच, गोरी, सडपातळ अशी होती. ती सोवळी झालेली होती. पेशव्यांची गादी सईबाईबरोबर होती. भगवा झेंडा मीं पाहिला नाही. नेपाळहद्दींत नानासाहेब आल्यावर त्यांच्या राहण्याची व्यवस्था नेपाळ सरकारनें केली. लक्ष्मी-नारायणाचे पुजारी लक्ष्मणराव नांवाचे कोकणस्थ ब्राह्मण होते. ते येथेच सई-बाईच्या नंतर पुष्कळ वर्षांनी मेले. त्यांच्यामागून नेपाळी पुजारी नेमला गेला. नानासाहेबाची बायको गोरी, ठेंगणी व कांहीशी स्थूल अशी होती.

नानासाहेब पंचवीस वर्षांपूर्वीपर्यंत जिवंत होता. तो चीन देशांत जाऊन राहिला होता. येथून तिबेटांत गेला व तेथून चीनमध्ये. तेथे तो नेपाळ सरकारच्या सूचनेवरूनच गेला. गादी होती ती नारायणराव पेशव्याची होती. ती तिसऱ्या

१ रामचंद्र सखाराम करमरकर ह्यांची मुलगी काशीबाई (कृष्णाबाई) असें लँडन म्हणतो.

२ नानासाहेबांबरोबर तात्या टोपीचा धाकटा भाऊ, बाबा गोडबोले, जन्नूसिंग व परशराम जगमल हे नोकर नेपाळांत येतांना होते. शिवाय दोन बायका होत्या असें लँडन लिहितो. ह्या बायका नोकरवजा असाव्यात.

मजल्यावर ठेवलेली असे. तेथे जाण्यास कोणास परवानगी नव्हती. तेथे रात्रीं पाणी व फराळाचे पदार्थ दररोज ठेवीत; दिवाहि तेवत ठेवीत.

सुनेला ४०० रुपये व सासूला ८०० रुपये दरमहा नेपाळ सरकारांतून मिळत. हें वेतन देत तेव्हा नेपाळ सरकारजवळ पेशव्यांचें कांहीएक धन नव्हतें.

सईबाई सकाळीं ५ वाजतां उठून पूजाअर्चा करी. ह्यांत तिचे दोन तास जात. पूजेच्या वेळीं गवई गात असे. नंतर विश्रांति घेऊन १०॥ वाजतां जेवणें होत. दुपारीं पुराण होई. ती रात्रीं फक्त दूध पीत असे. सईबाईच्या परिवारांत ५-६ बायका, ५-६ पुरुष व ४-५ स्वयंपाकिणी होत्या. सईबाई वारली तेव्हा ५५-६० वर्षांची होती."

मीं नेपाळ सोडल्यावर पुन: कांही प्रश्न विचारले. त्या माझ्या पत्राचें उत्तर आलें त्यांतील मजकूर—

नेपाळ ता. ९।४।४१

क्रु. सा. वि. वि. चैत्र शु १२ बुधवार

आपलीं दोन पत्रें मिळालीं. पहिल्या पत्रांत भीमाबाई कोण असें विचारलें आहे[1]. भीमाबाई ही मराठीन होती. ब्राह्मणाची बाई नव्हे. प्रेमनाथ हे माझे परिचयाचे आहेत. ह्यांच्यापेक्षा सुद्धा त्यांचे वडील बंधु वैकुंठपंडित यांचें पेशवीण-बाईकडे जाणें येणें फार होतें. परंतु त्यांनासुद्धा ही गोष्ट माहीत नव्हती. वैकुंठ-पंडित हे ज्या वेळेस सईबाई वारली त्या वेळेस मध्यस्थ होते; म्हणजे पेशवीणबाई-कडील गोष्टी सरकारांत कळवावयाच्या व तेथे जो निकाल, हुकूम होईल तो यांना कळवावयाचा हें काम त्यांचेकडे होतें. प्रेमनाथ हे श्राद्धाला जेवणास जात होते ही गोष्ट खरी. परंतु नेपाळी ब्राह्मण आपले येथे जेवत नाहीत. कारण भात खात नाहीत. पक्की रसोई खातात; म्हणजे पुऱ्या-लाडू वगैरे खातात. तेव्हा श्राद्धाशीं व जेव-णाशीं त्यांचा कांही संबंध नाही. व त्यांचेजवळ तर्पणाची यादी पण मिळणें शक्य नाही. भीमाबाई मराठीन असून तिने एक नेपाळी मुलगा बाळगला होता. व ती सईबाईनंतर बरींच वर्षें जिवंत होती. पुढे ती वारली. नानासाहेबांना तीन बायका होत्या. परंतु मला दोन बायकांचें कांही माहीत नाही. नानासाहेबांची बायको सवाष्ण होती याला एक पुरावा असा आहे की, चैत्रांत त्यांचेकडे हळदकुंकू होत

१ भीमाबाईचें व प्रेमनाथाचें नांव मला राजगुरु हेमराज ह्यांच्याकडून समजलें.

असे हें मला पूर्णपणें आठवत आहे. कांहीं दिवस उपाध्येपण करणारे शंकरभट वाकणकर नांवाचे कऱ्हाडे ब्राह्मण होते. हल्लीं त्यांचें येथे कोणी नाही. ... मी सं. १९५२ त नेपाळ सोडून गेलों. कांहीं दिवस काशींत राहून ग्वाल्हेरीस गेलों. तेथे ४।५ वर्षें राहून पुनः नेपाळास आलों.

नानासाहेब पेशव्यांनी नेपाळांत एक तोफ बरोबर आणली होती ती मात्र म्यूझिअममध्ये आहे.

काशींत नानासा़ा थत्ते राहतात; त्यांची चुलती सारजाबाई थत्ते या पेशवीण-बाईकडे पुष्कळ दिवस राहिल्या होत्या. वैकुंठपंडित जिवंत नाहीत. प्रेमनाथ येथे नाहीत. त्यांच्याशीं पेशवीणबाईबद्दल पुष्कळ गोष्टी झाल्या आहेत....त्या वेळचीं म्हातारीं व माहितगार अशीं माणसें माझे माहितींतलीं कोणी येथे नाहीत असें शोधाअंतीं कळलें."

पेशव्यांचा मोत्याचा गणपति, नीळाचा महादेव व नंदी अशा तीन देवांच्या मूर्ति पशुपतिदेवस्थानच्या खजिन्यांत आहेत असें बारकाईने शोध केला असतां समजलें. ह्या मूर्ति कोणाला दाखवीत नाहीत. मोत्याचा गणपति म्हणचे मोत्या-वर कोरलेला गणपति.

## लँडनने केलेल्या चुका

१ नानासाहेबाच्या गादीची व रुपेरी खुर्चीची पूजा नोकर करीत.

करमरकर ही माहिती सांगत नाहीत. नारायणरावाच्या गादीला लँडन नानासाहेबांची गादी समजतो व दीप लावणें हा पूजेचा प्रकार मानतो.

२ नानासाहेबाच्या बायकोचें नांव काशीबाई होतें.

काशीबाई हें बाळासाहेबाच्या बायकोचें नांव होतें.

३ काशीबाई खाटमांडू येथे ५० वर्षें राहिली.

सन १८५८ पासून ५० वर्षें म्हणजे स. १९०८ येतो. ह्या सालीं कोणतीच बाई जिवंत नव्हती. काशीबाई व कृष्णाबाई (नानासाहेबाची बायको) ह्या सईबाईच्या पूर्वी म्हणजे इ. स. १८९५ च्या अगोदर वारल्या होत्या. नानासाहेबाची बायको कृष्णाबाई मरणसमयीं चाळीस वर्षांची होती[१]. लँडनच्या माहितीप्रमाणे ती नेपाळांत आली तेव्हा

१ करमरकरांची माहिती.

तेरा वर्षांची होती. ह्यावरून कृष्णाबाई नेपाळांत सुमारें २७ वर्षें होती असें दिसतें. ५० वर्षें नेपाळांत कोणतीच खाशी बाई नव्हती. सईबाई सर्वांच्या मागून मेली ती सुद्धा ३७ वर्षांपेक्षा अधिक काल नेपाळांत नव्हती.

४ नानासाहेबाच्या बायकोने नारायणाचें देऊळ बांधलें.

लक्ष्मीनारायणाचें देऊळ सईबाईने बांधलें.

५ बाजीरावाने दोन मुलगे दत्तक घेतले. त्यांपैकी एक लवकरच मेला व त्याच्या जागीं बाळासाहेब आला.

बाजीरावाने नानासाहेब, दादासाहेब व बाळासाहेब असे तीन मुलगे एकदम दत्तक घेतले होते.

लँडन नानासाहेबाच्या बायकोचें नांव काशीबाई समजतो. तिचें दुसरें नांव कृष्णाबाई असें तो देतो. काशीबाईचा व कृष्णाबाईचा त्याने घोटाळा केलेला आहे. काशीबाईला काकूबाई म्हणत असेंहि त्याने नमूद केलें आहे. सुंद्राबाई हें काशीबाईचें पहिलें नांव असल्याचेंहि तो कळवितो.


आणखीहि चुकीची माहिती लँडनने दिली आहे.

देवळाकडे तो वळलेलाहि दिसत नाही.

## लँडनने केलेली बदनामी


काशीबाई जंगबहादूरची पुष्कळ वर्षें रक्षा असल्याचें अप्रमाण विधान लँडनने आपल्या पुस्तकांत एका टीपेंत केलें आहे. लँडन नानासाहेबाच्या बायकोचें नांव काशीबाई समजतो. लँडनने हें विधान नुसतें निराधार नाही तर द्वेषमूलक केलें आहे. लँडन नानासाहेबाच्या नांवाने दांतओठ खातो. नानासाहेब मूर्तिमंत सैतान होता ह्याच दृष्टीने सर्व सुशिक्षित जग त्याच्याकडे पाहत होतें असें लिहून द्वेषरूपी गरळ तो ओकत आहे. त्या वेळच्या प्रत्येक इंग्रजाचा द्वेषाग्नि असाच भडकलेला असला पाहिजे. ह्याचें कारण काय तर सुरक्षितपणाचें वचन देऊनहि नानासाहेबाने इंग्लिश बायकामुलांची कत्तल केली. हा आरोप सर्वस्वीं खोटा आहे असें आता पुराव्यानिशीं दाखवितां येतें. तथापि तो प्रश्न येथे प्रस्तुत नाही. नानासाहेबाच्या बायकोचा व जंगबहादूरचा अनैतिक संबंध लँडनने जोडला आहे त्याला कितपत आधार आहे हें ठरवावयाचें आहे.

नानासाहेबाला इंग्लिश सरकारच्या स्वाधीन न करण्यांत नेपाळ सरकारचें म्हणजे जंगबहादूरचें अंग होतें ह्यांत शंका नाही. करमरकर म्हणतात, नानासाहेब नेपाळ सरकारला शरण आला म्हणजे आश्रय मागूं लागला तेव्हा नेपाळ सरकारने त्याला सांगितलें की, इंग्लिशांची व आमची दोस्ती असल्यामुळे तुम्ही आमच्या राज्यांत राहणें इष्ट नाही; तुमच्या बायकामुलांचा आम्ही सांभाळ करूं. नानासाहेबाने तें मान्य केलें आणि जंगबहादूरच्याच संमतीने अथवा सूचनेवरून त्याने तिबेटची हद्द ओलांडली. धूर्त इंग्लिशांना हा संशय होताच. ते वारंवार नानासाहेबाविषयी नेपाळ सरकारकडे चौकशी करीत. त्याला नेहमी उडवाउडवीचीं उत्तरें मिळत. खात्री पटविण्यासाठी निरनिराळीं गमकें कल्पिण्यांत येत. वैतागून उत्तरें देण्यांत येत. असेंच एक उत्तर लालसिंग नांवाच्या माणसाने दिलें आहे. तो म्हणतो नानासाहेब मेला नसता तर जंगबहादूराने त्याच्या बायका व जडजवाहिर कसें घेतलें असतें! लँडनसाहेबाच्या विधानाला हाच काय तो आधार असावा. नानासाहेबाची बायको कशी होती हें आपणांस आता ठरवावयाचें नाही. तिने पातिव्रत्य संभाळलें असेल किंवा नसेल. लँडनसाहेबाच्या आरोपाला कांही आधार आहे कीं काय हा मुद्याचा प्रश्न आहे. लालसिंगाच्या म्हणण्याचा हेतु ध्यानांत घेतला तर त्याचें म्हणणें अक्षरशः घेतां कामा नये हें कोणालाहि कबूल करावें लागेल. दुसरा पुरावा लँडनने दिला नाही. त्याच्याच म्हणण्याप्रमाणे नेपाळांत आली तेव्हा नानासाहेबाची बायको तेरा वर्षांची होती. अर्थात् ५।७ वर्षें तरी ती जंगबहादूरच्या डोळ्यांत भरण्याइतक्या वयाची नव्हती. शिवाय वाड्यांत सईबाई सासू होती; दुसऱ्याहि पुष्कळ बायका होत्या. करमरकरांच्या सांगण्यावरून असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही की सईबाई फार दक्ष स्त्री होती. तिच्यासंबंधाने कोणीं शंकाहि काढली नाही. वाड्यांत रात्रीं कोणीहि पुरुष वस्तीला राहतां कामा नये अशी तिची ताकीद होती. पुरुषआप्तांना व नोकरांना रात्रीं निजण्यास स्वतंत्र घर होतें. अशा स्थितींत काशीबाईला जंगबहादुराने रखेली म्हणून ठेविली होती हें लँडनचें म्हणणें निरर्गल व निर्लज्जपणाचें आहे ह्यांत संशय नाही. लँडनला काशीबाई व कृष्णाबाई ह्यांतला फरक समजलाच नाही. काशीबाई बाळासाहेबाची बायको. पण लँडनच म्हणतो की, ती विधवा म्हणजे केशवपन केलेली होती. कदाचित् काशीबाई नांवाची एखादी दासी असेल. जंगबहादुराने राणीच्या पांच दासी घेऊन तिला नेपाळी पांच म्हाताऱ्या बायका दिल्या ही गोष्ट लँडननेंच




## करमरकर यांनी वर्णिल्याप्रमाणे वाड्याचा नकाशा

१ स्वयंपाकघर (हल्ली मंदिर). २ जेवणानंतर बसण्याची बैठी जागा. ३ सास्वासुनांची बसावयाची पडवी, तळमजल्यावर. त्यावर दोन मजले. पहिला राहण्यानिजण्याचा व दुसरा कोठीचा. ४ पाहुणे व नेपाळचे राजेरजवाडे भेटावयास येत त्यांच्यासाठी माडीवर दिवाणखाना. ५ स्नानगृह—त्यांत पाण्याचे दोन हौद. ६ देवघर. ७ माडीवर पानसुपारी तयार करण्याची जागा. खालून रस्ता. ८ गवई गाण्यासाठी बसण्याची जागा. ९ कुणबिणींच्या खोल्या. १० पुरुषांसाठी स्वतंत्र घर. ११ शौचकूप. १२ गोशाळा. १३ विहीर. १४ देवडी.




**विद्यमान मन्दिर व भोंवतालचें आवार यांची स्थिती दर्शविणारा नकाशा**

१ मंदिर १८×३८ फूट. २ हौद किंवा पुष्करिणी. ३ मारुतीचें देऊळ. ४ गरुड. ५ शिलालेख. ६ देवडीवजा लहान इमारत. ७ विहीर.

नमूद केली आहे. सईबाईच्या वाड्यांत आपले हेर असावे म्हणून जंगबहादूरची ही क्लृप्ति असावी !

## लक्ष्मीनारायणाचें मंदिर

मंदिराच्या आवारांत शिरतांच पुण्याच्या देवळांतच आपण आलों आहों असा एकदम भास होतो व हें पेशव्यांचेंच देऊळ असलें पाहिजे ह्याविषयीं शंका उरत नाही. मंदिरासमोर फरशी, मध्ये तुळशीवृंदावन, दुतर्फा फुलझाडांचे ताटवे, देवळाची बांधणी, तो सभामंडप, सभामंडपांत टांगलेलीं हंड्या झुंबरें इ० गोष्टी अवलोकतांच ही नेपाळी संस्कृति नसून अस्सल महाराष्ट्रसंस्कृति आहे अशा निश्चयाने प्रवासी अचानकपणें 'आनंदपुलकित तनु' हा भाव अनुभवितो. असो. लक्ष्मीच्या व नारायणाच्या पायांपाशीं गरुडाच्या मूर्ति असून समोर तुळशी-वृंदावनाच्या कोनाड्यांतहि गरुडाची स्थापना केलेली आहे. देवळांतील एका गरु-डाचे पंख स्पष्ट दिसतात. लक्ष्मीनारायणाच्या मूर्ति पांढऱ्या दगडाच्या असून त्या जयपुराहून आणल्याचें करमरकर सांगतात. सिंहासनाच्या कोनाड्यांत आम्हांस दोन देव्हारे ठेवलेले दिसले. सईबाई व कृष्णाबाई ह्या सासवासुनांच्या देवांचे हे देव्हारे असें करमरकरांनी सांगितलें. देव्हारे जड होते. रुप्याचे असावे. वर गंज चढून काळवटलेले होते. आवारांत एक पुष्करणी आहे. देवळाची लांबी २८ फूट व रुंदी १८ फूट आहे. वाड्याच्या चौकाचा भाग व स्वयंपाकघराखालची जागा ह्यांवर मंदिर बांधलें असें करमरकर म्हणतात. देऊळ बांधल्यावर तीन वर्षांच्या आंत सईबाई मरण पावली.

### देव व दागिने

१ हिऱ्यावर कोरलेली देवी
२ सोन्याचा गणपति चांदीच्या सिंहासनावर —२२ तोळ्यांचा
३ देवीची मूर्ति (सोन्याची असावी) हिरेजडित. ह्या मूर्तीच्या एका हातांत हिऱ्यावर बसवलेली अति लहान सोन्याची देवीची मूर्ति

१ सोन्याचा मुकुट— ५९ तोळ्यांचा
२ गोट जोड २— प्रत्येकीं ५ तोळे
३ पाटल्या नग २— एकूण ६ तोळे
४ मोतीं व माणकें ह्यांच्या पेट्या ९

५ मंगळसूत्र सोन्याचें

६ सोन्याचा ताईत— १ पदक ४ हिरे

७ ३० हिऱ्यांची माळ. मध्ये मोठ्या हिऱ्याचें पदक

१ चांदीची पंचपात्री व पळी

२ चांदीची झारी

३ चांदीचें छत्र १३७ तोळे ५ मासे वजनाचें

ह्या सर्व जिनसा पुजाऱ्याच्या घरीं असतात. त्यांची यादी सरकारी शिक्याची संवत् १९८२ ची केलेली आहे. ह्या यादीची एक प्रत पुजाऱ्याला देऊन दुसरी प्रत सरकारने आपल्या दप्तरांत ठेविली आहे. सं. १९८२ नंतर नवीन यादी झाली नाही. देव व दागिने फार जुने आहेत.

### लक्ष्मीनारायणाचे नोकर

| नांव | काम | पगार (दरमहा) रु. पैसे | |
|---|---|---|---|
| १ नंदिकेश्वर पराजुली | पुजारी | ६ – ९१ | नेपाळी ब्राह्मण |
| २ रामेश्वर पराजुली | ,, | ६ – ४१ | नेपाळी ब्राह्मण |
| ३ | झाडझूड करणारा | ३ – ० | |
| ४ | वाजविणारा | १ – ५० | |

माघ शु १३ ला मूर्तीची स्थापना झाली. म्हणून दरवर्षी ह्या तिथीला उत्सव करतात. १० रु. खर्चाची मंजुरी आहे. ह्याशिवाय रामनवमी व जन्माष्टमी ह्या उत्सवांनिमित्त अनुक्रमें ६ आ. २ पैसे व २१ आणे सरकारांतून पुजाऱ्यास मिळतात. नित्य पूजेकरिता ५ रु. ४२ पैशांची दरमहा नेमणूक आहे..

## करमरकरांची माहिती

राजाराम गणेश करमरकर ह्यांचे आजे माधव कृष्ण. कृष्णाजी हे विष्णु बल्लाळ ह्यांचे चिरंजीव. करमरकरांचे पणजोबा हे समशेरबहादुराच्या वंशजाचे दिवाण होते. त्यामुळे त्यांचें वास्तव्य बांद्याला असे. माधवरावांच्या मुलांना कांही काळ अज्ञातवासांत काढावा लागला. पुढे काशीस विजयनगरच्या राजाच्या वाड्यांत ते नोकर म्हणून राहिले. राजाराम गणेश ह्यांचे चुलते नेपाळांत आले. तेथे त्यांस पशुपतीची



५. (वर) लक्ष्मीनारायणाच्या मूर्ती. ६ (खाली) लक्ष्मीनायणाचें मंदिर.





हिमालयांतील वाहनें— ७ (वर) कंडी. ८ (खाली) दंडी.



पूजा मिळाली. राजाराम गणेश ह्यांचा जन्म नेपाळांत झाला. त्यामुळे त्यांना चुलत्याची पूजा चालवतां येईना. सध्या ते गोकर्णाचे पुजारी आहेत.

राजाराम गणेश हे मितभाषणी, खोल स्वभावाचे व जबाबदारी ओळखून बोलणारे आहेत. त्यांची स्मरणशक्ति किंचितहि विकलित झालेली नाही.

## लँडनने उल्लेखलेलें पेशव्यांचें जवाहीर

१ माणकें, मोतीं व रत्नें ह्यांचा एक हार. ह्यास 'नवलाख' म्हणत. हा हार पेशव्यांकडून जंगबहादूरकडे गेला. त्याच्याकडून राणा उदीपसिंगाकडे. त्याच्याकडून वीरशमशेरकडे. वीरशमशेर स. १९०१ सालीं मयत झाला. त्याच्या बायकोने देवशमशेर हा मुख्य प्रधान असतांना त्याला विकला. देवशमशेर ह्याच्यावर नेपाळ सोडण्याची पाळी आली तेव्हा त्याने तो दरभंग्याच्या महाराजांना विकला. तो हार अजूनपर्यंत ह्या महाराजांच्या ताब्यांत आहे.

ह्या हाराचे जंगबहादुराने ९३००० रु. नानासाहेबास देऊं केले. परंतु काशीबाईच्या सांगण्यावरून दोन गांव त्याने रोख रुपयांच्या ऐवजीं दिले. ९३००० रु. ही दोन गांवाची किंमत नव्हती. कारण दरसाल बायांनीं ४५०० रु. जंगबहादूरला द्यावयाचा करार होता. लँडन म्हणतो इतकें देऊनहि बायांना ६।७ हजार रुपये गांवांपासून मिळत.

२ तीन इंच लांबीचा एक पाचेचा खडा अद्यापि मुख्य प्रधानाच्या मस्तकावरील मुकुटांत चमकत आहे.

३ एक हार ४८ मोत्यांचा. त्याला २४ पाचेचे खडे व ३४ हिरे आहेत. हा हार पेशव्यांकडून मुख्य प्रधानांकडे गेलेला आहे.

रॅमसेच्या मतें नानासाहेबाचें ६०००० रु. किमतीचें जडजवाहीर जंगबहादूरने ३६००० रुपयांस विकत घेतलें.

# शिलालेख

श्री

(लक्ष्मीनारायणाची मूर्ति)

सूर्यमूर्ति सूर्यमूर्ति

श्रीलक्ष्मीनारायण श्री ५ सर्कार

सहस्रचंद्रप्रतिमो दयालुर्लक्ष्मीमुखालोकनलोलनेत्रः ॥
दशावतारैः परितः परीतो नृकेसरी मंगलमातनोतु ॥१॥
नत्वा गणेशं जगदम्बिकां च श्रीसूर्यनारायणवेदमूर्तिम् ॥
श्रीगुह्यकालीरमणं महेशं भक्तार्तिहृद्दाशरथिं रमेशम् ॥२॥
यस्मिन्सुदेशे द्विजबाहुजातवैश्यांत्यजातानग्रिजवर्णधर्म्यान् ॥
दृष्ट्वा सुरेशोपि सुधर्मभूमौ हैमीं सुवृष्टिमकरोत्कलौ वै ॥३॥
प्रचण्डदोर्दंडजिताखिलाधिपः श्रुतौ सत्यवतीसुतोपमः ॥
निरस्तभृत्यर्तिधनो नृपेश्वरोऽभवत्यसौ कर्ण इवापरोयः ॥४॥
बालाजीविश्वनाथाख्यो रसासुरपतिः स्वयम् ॥
पूनासतारे ह्यनिशं कारयामास चासनम् ॥५॥
स्वबाहुबलवीर्येण राजराजाधिपो भवत् ॥
ततस्तु राजवर्येण पेश्वा संपादनीकृता ॥६॥
यस्य प्रयाणे स्विभवाजिनांपदैः समुत्थितं व्योम्नि परागसंचयं ॥
गत्वा जलं वर्षति यत्तपात्यये घनीभवत्रुनसतद्यसैत्यितः ॥७॥
पांचालडिल्लीनगरादिमुख्यान् जित्वा सही दिग्विजयाय भूपः ॥
कृत्स्नां भुवं जेतुमयं चरत् वै शक्रानलेंद्रूर्कयमांसजन्मा ॥८॥
जगति तद्यशसाधवलीकृते हिमरुचिर्गगनं गजनायकः ॥
अभजदिंद्रसखो दधिमम्बु तत्किमपि कैतवमाप्य शिवं शिवा ॥९॥
तस्य राज्ञो धर्मपत्न्यां पुत्रौ द्वौ संबभूवतुः ॥
ज्येष्ठो बाजीरावसंज्ञश्रीमणाजामपानुजः ॥१०॥
बाजीरावस्य पुत्रो भूद्रघुनाथो महायशाः ॥
अपरो बाजीरावाख्यो धार्मिकाणां सदाग्रणीः ॥११॥
पुनाराज्ये यो भून्नृपतिलकसंसेवितपदः ॥

स बाजीरावोयं हरिपदरतो भूसुरवरः ॥
दिगन्ते विख्यातोऽर्जुन इव महीपालवशकृत् ॥
सदानन्दो चन्द्रानलधनदशक्रार्कसदृशः ॥१२॥
स्वमन्त्रिणिराज्यधुरां संन्यस्य नृपसत्तमः ॥
ब्रह्मावर्ते महाक्षेत्रे नारायणपदे रतः ॥१३॥
ब्राह्मणान् वेदसंपन्नान्दीनान्धकृपणांस्तथा ॥
दानं ददद्विजवरो महाराजो दिवंगतः ॥१४॥
बाजीरावजाया पतिपदसरसीजातकिंजल्कघूलिः ॥
स्वादून्मत्ता शिवांघ्र्यर्चनपटुनिरता पुण्यभूमावुदीच्याः ।
वाग्मत्याह्युत्तरेऽतीव रुचिरभवने मुक्तिकामा विशुद्धा ।।
सैबाईनामधेया नृप...लका वासभूमिं चकार ॥१५॥
वाग्मत्या रुद्रमत्याश्च संगमेतीव पुण्यदे ॥
थापाथलीति विख्याते क्षेत्रेऽस्मिन्नृपतिप्रिये ॥१६॥
दिक्षा इति पदं दत्वा रामरावाख्यशर्मणे ॥
प्रसन्ना भून्महाराज्ञी गृहभारं ददौ किल ॥१७॥
ब्रह्मावर्ते समुद्भूतो गुणाढ्यः सुन्दराकृतिः ॥
द्विजवर्यो महातेजा दानधर्मेषु तत्परः ॥१८॥
तस्मै आज्ञां ददौ राज्ञी रचने मन्दिरस्य च ॥
तदाज्ञां शिरसा धृत्वा रमेशस्य मन्दिरम् ॥१९॥
सोद्यानशिल्परचितं वैकुंठमिव चापरम् ॥
चित्रयित्वा पंचरंगै रमेशस्य प्रीतये ॥२०॥
मध्यदेशात्समानीय पतिव्रतपरायणा ॥
श्वेतोपलकृतां मूर्तिं रमया सहिता हरेः॥२१॥
सुवर्णमणिसंयुक्तैर्भूषणैर्भूषिता सदा ॥
तत्रैव स्थापयामास धर्मज्ञा साधुवत्सला ॥२२॥
गोरक्षदेशाधिपतिर्गुह्यकाल्याभिरक्षितं ॥
बहुरत्नानि संगृह्य मौल्यं कृत्वा प्रयत्नतः ॥२३॥
ग्रामानष्टौ ददौ तस्यै महाराजो महायशाः ॥
गोविन्दपुरकं चैव सिर्सियाख्यं ततः परम् ॥२४॥

धनगद्धा पोषयाख्यौ द्वौ ग्रामौ च ततः परम् ॥
सिमवारि च वरवा ग्रामौ च तदनंतरम् ॥२५॥
मदनपुराकट्टिराख्या वैरिया कट्टिका तथा ॥
क्रमेण गणनां कृत्वा चाष्टौ ग्रामा भवन्ति ह ॥२६॥
प्रसन्ना भून्महाराज्ञी कुलानन्दस्य सेवया ॥
किंचिन्भूमिं ददौ तस्मै मुद्रयित्वा तु कागदम् ॥२७॥
स्थापने दिवसे चैव रमेशस्य प्रीतये ॥
ब्राह्मणेभ्यः सेवकेभ्य किंचिद्भूमिं ददौ तदा ॥२८॥
एतान्त्यक्त्वा महाराज्ञी शेषान् ग्रामान् समर्पयत् ॥
नेपाले स्वस्य द्रव्येण यत्क्रीतं क्षेत्रसंज्ञकम् ॥२९॥
चतुर्दशरोपानिकं तत्सर्वं हरिप्रीतये ॥
तस्मिन्दिने महाराज्ञी सामात्या गणसंयुता ॥३०॥
संकल्पं कारयामास रघुनाथस्य प्रीतये ॥
पतिव्रतास्वग्रगण्या ह्यनसूयेव सर्वदा ॥३१॥
श्रीविक्रमार्कनववेदग्रहैक ह्यब्दे
माघे सिते मनसिजस्य तिथौ विधोर्हि ॥
एकोनविंशगतसौरिदिनेषु योगे
निष्कंभके निखिलखेचरसानुकूले ॥३२॥

## अथ दक्षिणी स्वदेशभाषा

श्रीमन्त बाजीरावाच्या राणीने केली स्थापना खासी ॥
नारायणलक्ष्मीची शोभे द्वारावतीच कीं जैसी ॥ १ ॥

## अथ गिरिराजभाषा

स्वस्तिश्री विक्रमार्क सम्वत् १९४९ श्री शाके सम्वत् १८१४ सौरमानेन माघमासस्य गतदिनेषु १९ सोमवारे माघमासे शुक्लपक्षे त्रयोदश्यां तिथौ पुनर्वसु-नक्षत्रे निष्कंमयोगे श्रीसूर्योदयात् गतघटी ७ पलेषु ५७ तदा मीनलग्ने धनुर्नवां शके एवं शुभमुहूर्ते ॥ यस्ता शुभदिनमा ॥ स्वस्ति श्रीमन्महाराजशाहुछत्रपतिहर्ष-निधान पेश्वासोहेबबहादुर बाजीरावरघुनाथपन्तप्रधानका श्रीमहाराणी सई-बाईसहिब आपना राज्य पुना सतारा ब्रह्मावर्तक्षेत्र देखी आई नेपालमा विराजमान



९ नेपाळी (नेवारी) कन्या हातमागावर विणीत आहे.



१० भूतिया स्त्री फीत विणीत आहे.



११ पहाडी धनगर.



१२ नेपाळी मच्छीमार व त्याचीं साधनें



१३ बदरी-केदार यात्रेतील सोबती, श्री. कापरेकर
व श्री. वासुदेवराव चापेकर.



१४ गंडकी तीरावरील माघी पौर्णिमेचें धर्मकृत्य.



१५ माघोत्सवांतील मिरवणूक— राधाकृष्ण व त्यांचे द्वारपाल.

भै बक्सनु भयाकाले आफ्नु राज गर्नु भयाका वाग्मतीरुद्रमतीका संगम वाग्मती-तीर थापाथली कुरिया स्थानमा आफ्नु घरका दक्षिणफुलबारीमा १ का मन्दिर बनाई स्थापना गरी अघी २ मा जवाहिरात चढांउदा २ वाट सर्व कर अकर सर्वांगमाफको लालमोहर गरी खरीदी बिर्ता बक्शाको जिलै पर्सा प्रगन्ना नौरांगिया तर्फ जगत्पुरमध्ये मौजे गोविन्द्पुर १ मौजे धनगढवा १ मौजे सिर्सिया १ मौजे पोषरिया १ मौजे सिमर्वारि १ मौजे वारवा १ मौजे मदनपुरकट्टी १ मौजे वैरियाकट्टी १ स्मेतमध्येश बिर्ता मौजे ८ मध्ये अघी हमिवाट सनदभै बिर्ता र १ स्थापनाको कुण्डमंडप अधिवासनमा ब्राह्मण ब्राह्मणिके संकल्प गरी दान दियाको र अघिदेखी सेवाचाकरीमा रुजु रही मन्दिर बनाउंदा पनि मर्मिहिनत् गर्न्या हामरा काम्दार नोकरानके हामीवाट बिर्ता बक्शोका जगा बाहेक बांकि जग्गा र नेपालका किनवा बिर्ता पाटनको जिह्ला थैमाषेहा रोपानि १॥ को पुन्डोल रोपनि ३ काटमांडौ जिह्ला हांडिगांव यकडोल रोपनि १॥। भातगांऊं बसिबु रोपनि ।॥= जमाखेत रोपनि १४= आफु बशाका घरबारी स्मेत काशी बस्न्या पुरोहित भाउ दीक्षित कर्वे १ राम भट्ट करंदीकर १ नाना वझे सर्दार १ जयराम-शास्त्री जोशी १ भिकू दिक्षित ओक १ हरिशास्त्री जोशी १ हरिभट्ट अभ्यंकर १ लक्ष्मण भट्ट १ जमा ब्राह्मण जना ९ साक्षीबसि पुरोहित गणेश दीक्षित कर्वे ले संकल्प गराई अघि जग्गामा स्थापना भै रह्याका देव देवता आफुले अघि देखी मानि आयाका देवदेवता र पछी स्थापना हुन्या देवदेवताका पुजा र सदावर्तहरू काम काम गैन्हलाई गुठिराखि बक्सौं हाम्रा जिया छन ज्याल सो जग्गा हाम्रा तैना-तमां राखी हाम्रा जियात् को धनवाट जो जो चलि आयाको हामिवाट चलांउला हाम्रा सेष पछी लाई र हाम्रा जिया छंदैमा पनि गुठीयार खडागरी गुठियार जिम्मा लगाउनाले जो जो गर्नु पर्न्या दानपत्रमा तपसिल खोली ज्या ज्या गर्नु भन्या हुन्छ सो बमोजिम चलाउंना निमित्त माथि लेखियाको जग्गा गैन्ह १ प्रभृति देवदेताका पुजाके र कामकामको धर्म चलाउना निमित्त श्री परमेश्वरप्रीति गरी चन्हाआ यो परमेश्वर प्रीति गरी चन्हायाको जग्गा जमीन देवधर्म हिन्दुधर्म दिनरात्रि दुनिआहरू रह्या सम्म कसैले न हर्नु हरन गर्न्यो भन्या पञ्च महापातक गोवध मातृगमनादि महापातक लागन्याछ भन्या बेहेराको संकल्पपत्रको सिलापत्र गरी बक्सौ ॥

स्वदत्तां परदत्तां वा यो हरेच्च वसुंधराम् ॥
षष्ठिवर्षसहस्राणि विष्ठायां जायते क्रिमिः ॥१॥

चन्द्रार्कमेदिनी साक्षी शुभम् भूयात् शुभम् शुभम् ॥
भूयो भूयो भाविनो भूमिपालान् नत्वा नत्वा याचतेऽयं सुराशी ॥
सामान्योयं धर्मसेतुर्नृपाणां काले काले पालनीयो भवद्भिः ॥१॥

## टीपा

श्लोक १— लोल=आसक्त.

२— गुह्यकालीचा पति शंकर.

३— अंत्यजात=शूद्र; अग्निज=सुवर्ण. द्विजबाहुजातवैश्यांत्यजातान्निजधर्मधर्म्यान् असें वाचलें तर अर्थ सुलभ होतो.

४— भृत्यांच्या समृद्धीकरिता ज्याने धनाचा विनियोग केला असा नृपेश्वर हा निरस्तभृत्यर्तिधनः ह्याचा अर्थ.

७— संचय शब्द नपुंसकलिंगी वापरला आहे. शेवटला चरण दुर्बोध आहे. कदाचित् घनीभवत्युन्नमदद्यशैत्यतः असें असेल काय? सगळ्या श्लोकाचा अर्थ असा— तो स्वारी करण्यास निघतेवेळीं चांगले हत्ती व घोडे ह्यांच्या पायांनी उठविलेले जे धुळीचे लोट आकाशांत जाऊन उंच होत्साते पण त्याच वेळीं शैत्यसंपर्कानें घनरूप बनतात तेच उन्हाळा संपल्यावर पाण्याचा वर्षाव करितात.

ह्याच्याशीं कल्पनासादृश्यासाठीं नैषधीयचरित सर्ग १ श्लोक ८ ताडून पाहण्यासारखा आहे :—

यदस्य यात्रासु बलोद्धतं रजः स्फुरत्प्रतापानलधूममञ्जिम् ।
तदेव गत्वा पतितं सुधाम्बुधौ दधाति पङ्कीभवदङ्कतां विधौ ॥८॥

तसेंच रघुवंश सर्ग ४ श्लो. २९ पाहा :—

रजोभिः स्यन्दनोद्धूतैर्गजैश्च घनसंनिभैः ।
भुवस्तलमिवव्योम कुर्वन्व्योमेव भूतलम् ॥२९॥

८— शक्रानलेंद्वर्कयमांशजन्मा = शक्रादिदेवांच्या अंशांनी ज्याचा जन्म झाला आहे.

९— इन्द्रसखो ऱ्या ऐवजी इन्द्रमथो वाचावें. त्याच्या यशाने जग शुभ्र झालें असतां चन्द्र आकाशांत, ऐरावत इन्द्राकडे, गंगा (किमपि-अम्बु) समुद्राकडे व कांहीं तरी हिकमत करून पार्वती शिवाकडे

१२४६१

गेली (एकेकाने आपलें आश्रयस्थान गांठलें) ह्याच्याशीं भोजप्रबन्धां-तील श्लोक ताडून पाहण्यासारखा आहे. तो श्लोक—

महाराज श्रीमान् जगति यशसा ते धवलिते ।
पयःपारावारं परमपुरुषोऽयं मृगयते ।
कपर्दी कैलासं करिवरमभौमं कुलिशभृत् ।
कलानाथं राहुः कमलभवनो हंसमधुना ॥

१०— चिमणाप्पा महानुजः असें वाचणें सार्थ होईल.

११— अपरो = दुसरा; शेवटचा.

१५— उन्मत्ता = आनंदी; तृप्त. किंजल्कधूलिस्वादून्मत्ता असें वाचलें तर 'स्वादु'चा अर्थ मध करावा.

२२— भूषिता– भूषितां पाहिजे.

२३— रक्षितम्– रक्षितः पाहिजे.

३२— मनसिजस्य तिथौ = त्रयोदशी. त्रयोदशी तिथीचा स्वामी मदन.

कित्येक श्लोकांत अक्षरें कमी दिसतात.

शिलालेखाच्या संस्कृत भागावरून आपणांस निश्चितपणें गोष्टी कळतात त्याः—

*१ सईबाईने संवत् १९४९ माघ शु १३ रोजीं लक्ष्मीनारायणाची देवळांत स्थापना केली.

२ ब्रम्हावर्ती जन्मलेल्या रामराव नांवाच्या ब्राम्हण माणसावर सईबाईने देऊळ बांधण्याचें काम सोपविलें होतें. रामराव सईबाईचा कारभारी असावा असें गृहभार ह्या शब्दावरून वाटतें.

३ देवाच्या मूर्ति पांढऱ्या दगडाच्या असून त्या मध्यदेशांतून आणविल्या. ( करमरकर म्हणतात जयपुराहून. )

४ देवांच्या अंगावर सोन्यामाणकांचे अलंकार होते.

५ सईबाईने नेपाळ सरकारापासून आठ गांव खरेदी केले व खरेदीच्या किमतीचें जवाहीर सईबाईने नेपाळ सरकारास दिलें.

---

* वाग्मती व रुद्रमती ह्या दोन नद्यांच्या संगमावर वाग्मतीच्या उत्तरतीरावर नेपाळच्या राज्याला प्रिय अशा थापाथली नांवाच्या प्रसिद्ध ग्रामीं सईबाई सुंदर वाडा बांधून त्यांत राहत असे.

६ गोविंदपूर; सिर्सिया; धनगढवा; पोषरिया; सिमर्वारि; वरवा; मदनपुर-कट्टी; वैरियाकट्टी; हे ते आठ गांव होत.

७ ( ह्या गांवांतील ) कांही जमीन सईबाईने रामरावास, ब्राम्हणांस व इतर नोकरचाकरांस दिली; व बाकीचे गांव देवास दिले.

शिलालेखाच्या नेपाळी भाषेंत लिहिलेल्या भागावरून आपणांस अधिक गोष्टी समजतात त्या—

मूर्तिस्थापना शक १८१४ मध्ये झाली. त्या दिवशीं सोमवार असून पुनर्वसु नक्षत्र होतें. सकाळीं सूर्योदयापासून ७ घटका व ५७ पळांनी मीनलग्नावर व धनुर्नवांशांत देवप्रतिष्ठा करण्यांत आली.

गणेश दीक्षित कर्वे ह्यांनी संकल्प सांगितला. देवस्थापनेला भाऊ दीक्षित कर्वे, रामभट्ट करंदीकर, नाना वझे सरदार*, जयरामशास्त्री जोशी, नारायणभट्ट जोशी, भिकू दीक्षित ओक, हरिशास्त्री जोशी, हरिभट अभ्यंकर व लक्ष्मणभट असे नऊ पुरोहित होते.

राहत्या वाड्याच्या दक्षिणेस फुलबाग होती तेथे मंदिर बांधलें.

जागेचे व गांवांचे सहीशिक्क्याचे कागद सरकारकडून झाले आहेत.

गांव व जमिनी ह्यांवर सर्व कर माफ आहेत.

८ स्वतःच्या द्रव्याने नेपाळांत सईबाईने १४ रोपणी जमीन विकत घेतली व ती सर्व देवाकडे दिली.

९ सईबाईला नेपाळांत महाराणी ह्या नांवाने संबोधीत असत. ( लोकांनीहि मला असेंच सांगितलें. )

१० बाजीराव फार धार्मिक होता.

सध्या देवाकडे गांव नाहीत असें समजतें. असें असल्यास ते परत देवाला मिळतील अशी चळवळ महाराष्ट्राने करणें अवश्य नाही काय ?

शिलालेखांतील कांही नेपाळी शब्दांचे अर्थ—

| | |
|---|---|
| आई = येऊन | अघी = पूर्वी |
| र = आणि; व | चढाउंदा = अर्पण केलें असतां |
| बक्सनु = देणें; द्यावें | बाट = ने; कडून |

* काशीस जातींतील प्रमुखाला सरदार म्हणण्याची रीत आहे.

बिर्ता = इनामत जमीन
बक्शाको = दिलेली
स्मेत = सह
मध्येश = मध्यदेश—पहाड व समभूमि ह्यांमधील देश = तराईचा प्रदेश
हामी = आम्ही
हामीवाट = आमच्याकडून
अघी देखी = पूर्वीपासून
मर्मिहिनत् = मेहनत
किनवा = विकत घेतलेली
कयडोल = जागेचें नांव
बशाका = असलेला; राहिलेला
काशीबस्न्या = काशींत राहणारा
गुठी = धर्मादाय देवस्थान जमीन
चऱ्हाञा = अर्पण केली
सम्म = पर्यंत
हर्नु = हरण करणें
अघि = प्रथम
करअकर = सर्व प्रकारचे कर
गुठीयार = गुठी जमीन लावणारा
गैऱ्ह = वगैरे
बाहेक = शिवाय; खेरीज
ज्याल = पर्यंत
जिया = आयुष्य
बेहोरा = रीत; वहिवाट; तपशील
कुंड = विहीर

---

टीप—रोपणी म्हणजे १५ हात लांबीरुंदीचें चौरस क्षेत्र.


टीप— १ हा आंकडा परमेश्वराचा व २ आंकडा राजाचा द्योतक असावा.

# गंगोत्री जमनोत्री

हो ना म्हणतां म्हणतां अखेरीस श्रीमंत बाळासाहेब पंत ह्यांच्या परिवारांत गंगोत्रीजम्नोत्रीच्या यात्रेला निघण्याचा निश्चय कायम झाला व १ मे इ. सन १९४१ रोजीं वैशाख शुद्ध ५ गुरुवार या दिवशीं पूर्वयोजनेप्रमाणे पंजाब मेलनें आम्ही निघालों. मुंबईपासून हरिद्वारपर्यंत आमचा स्वतंत्र डबा असल्यामुळे आगगाडीच्या प्रवासाची एक मोठी गैरसोय दूर झाली. कारण प्रवासाकरिता मुद्दाम बनवलेल्या अशा डब्यांना स्नानाच्या खोल्या व संडास यांची सोय चांगली केलेली असते. शिवाय स्वतंत्र डब्यांत परकी उतारूंच्या ये-जाची बाधा होण्याचा संभव नसल्यामुळे डब्याचें नेहमीचें धर्मशाळेचें स्वरूप जाऊन त्याच्या ऐवजी आमच्या डब्याला मालकीच्या घराचें स्वरूप प्राप्त झालें होतें. तसेंच बहुतेक सर्व मंडळी पूर्वपरिचयाची असल्यामुळे मुंबईपासून हरिद्वारपर्यंतचा सुमारें ४० तासांचा प्रवास अत्यंत सुखावह झाला. बायकापुरुष, नोकरचाकर मिळून आम्ही ४५ माणसें— कोणी यात्रेचें पुण्य मिळावें या श्रद्धेने, कोणी हिमालयांतील सृष्टिसौंदर्य लुटावयास मिळणार ह्या आशाळू वखवखीने, कोणी प्रवासाच्या हौसेने तर कोणी केवळ यात्रा केल्याचें सदर भरून काढण्याच्या ईषणेने, असा हा रंगीबेरंगी भावनांचा मेळा यात्रेच्या वाटेला लागला. आमच्या ह्या जमावांत रावसाहेब बाबासाहेब, देशपांडे होते हें सांगितल्यानंतर आमच्यावर मुखदुर्बळतेचा आरोप करण्याचें धाडस कोणी करणार नाही. हरिद्वार येथे श्रीमंत बाळासाहेब व श्रीमंत सौ. राणीसाहेब त्याचप्रमाणे न्यायरत्न व दर्शनेश्वर विनोद ही मागून निघालेली मंडळी आमच्यांत सामील झाली.

ता. ३ रोजीं हरिद्वारला पोचलों. त्या दिवशीं व दुसऱ्या दिवशीं हरिद्वार येथे आमचा मुक्काम झाला. पुढील तयारी करण्याच्या दृष्टीने एवढा मुक्काम अवश्य होता. प्रवासाचीं सर्व सूत्रें श्रीमंत बाळासाहेबांच्या म्हणजे परंपरेने त्यांच्या अधिकाऱ्यांच्या हातीं असल्यामुळे इतरांस जुळवाजुळवीची दगदग करावी लागली नाही.

श्रीमंतांच्या छावणींतील पदांकितांची स्वामिभक्ति नजरेंत भरण्याइतकी होती तितकीच त्यांची सहचरनिष्ठा असती तर शर्करायुक्त दुग्धांत वेलदोड्याची पूड टाकण्याइतकें झालें असतें. पण स्वामिनिष्ठेला स्वार्थाचें अधिष्ठान असतें तसें


जमनोत्री
हनुमानचट्टी
यमुना नदी
जम्नाचट्टी
गंगाणी
सिलक्यारी
सिंघोट
उत्तरकाशी
मणेरी
भटवाडी
गंगणानी
सुकी
हरसिल
भैरवघाट
धराली
गंगोत्री
धरासू
मलदाणा
टेहरी
डेहराडून
नरेंद्रनगर
ऋषिकेश
गंगा नदी
हरिद्वार
गंगोत्री जमनोत्री.
यात्रामार्ग
नदी
लोहमार्ग

लोकनिष्ठेला नसतें. निरपेक्षावगुंठित माणुसकीवांचून बिचाऱ्या लोकनिष्ठेला दुसरा कशाचा आधार असणार ? तथापि सुज्ञांच्या संगतींत काल घालविण्याची श्रीमंतांची उत्कट मनीषा, श्रीमंत सौ० राणीसाहेबांचा कष्टाळू, प्रेमळ व निर्व्याज स्वभाव, त्याचप्रमाणे दुसऱ्याची अडीअडचण जाणून घेण्याची सौ. वहिनीमहाराजांची (ह्या कोल्हापूरचे पंडित दादामहाराज यांच्या पत्नी) तत्परता, हाकेला ओ देण्याची त्यांची तयारी व मनमिळाऊ स्वभाव ह्यामुळे सर्व प्रकारची न्यूनता भरून आली. आमच्यापैकी वृद्धतरुणांतील विरोधहि कोणाच्या नजरेंतून सुटण्यासारखा नव्हता.

एकीकडे वृद्धांची आत्मदक्षता, त्यांची वार्धक्यसुलभ असहिष्णुता तर दुसरीकडे तरुणांचा दिलदारपणा, त्यांची बेफिकीरी वृत्ति, त्यांचा तारुण्योचित रंगेलपणा पाहून कोणाच्या विचारांना चालना मिळणार नाही ?


ह्याशिवाय, वृद्धांत न मोडणारे व तरुणांशीं न जुळणारे असे तृतीयप्रवृत्तीचे एक गृहस्थ म्हणजे सोलापूरचे लेले वकील होत. ब्रम्हदेवाची सृष्टि तद्रूपतेने कागदावर वठविण्याचें असामान्य कौशल्य ह्यांच्या अंगीं स्वभावतःच आहे. चित्रें काढण्याचा त्यांचा छंद इतका जबरदस्त आहे की, ते बहुधा "चित्रण्येवात्मना तुष्टः" ह्या स्थितींत सदा असत. पेन्सिल त्यांची सहचरी. आम्हां सर्व स्त्री-पुरुषांना त्यांनी आपल्या कागदी कारागृहांत अडकवून ठेविलें आहे. शब्दांची उधळपट्टी करणारे प्रायः बहुतेक; उलट शब्दचुंबक ज्यांना संबोधितां येईल असे हे एकटेच. चोवीस तासांत लेल्यांच्या तोंडून निघणारे शब्द मोजण्याचा हिय्या कोणीं केला असता तर त्याच्यावर आपल्या हाताचीं पुरीं दहा बोटें मोडण्याचा प्रसंग खात्रीने आला नसता.

ह्यानंतर मूर्तिमंत विनोदालाहि आपल्या उचित, समर्पक व शिष्ट विनोदाने मागे सारणारे औंधचे सरकारी डॉक्टर रा. केळकर ह्यांच्या नांवाचा उल्लेख करणें अपरिहार्य आहे. ह्या डॉक्टरांचा असंख्य लोकांना उपयोग झाला. अत्यंत प्रसन्न अंतःकरणाने उपचार करण्यास ते सदा तत्पर असत. त्यांनी आपली पेटी उघडली, की औषधलोलुपांचा घोळका त्यांच्याभोवती जमे. येथेच त्यांच्या गुणांची परि-गणना संपली नाही. त्यांची स्मरणशक्ति अचंबा वाटण्यासारखी आहे. दोन वर्षां-पूर्वी श्रीमंतांबरोबर केलेल्या केदार व बदरीनारायणाच्या यात्रेंत पाहिलेल्या चट्यां-चीं एकापुढे एक अशीं नांवें भराभर बिनचूक म्हणून दाखवून त्यांनी आम्हांस आपली निधडी स्मरणशक्ति पटवून दिली. ह्यानंतर कात्रेशास्त्र्यांचा परिचय

आमच्या वाचकांस करून देणें अवश्य आहे. वर्तमानपत्री गुऱ्याच्या बाहेर विद्वत्ता असणें अशक्य असा एक लौकिक भ्रम आहे. परंतु कात्रेशास्त्र्यांच्या संगतींत कांहीं काल गेल्यावर ह्या भ्रमाचा निरास होण्यास विलंब लागत नाही. वैदिक ग्रंथांचा अभ्यास, नवीन विचार ग्रहण करण्याची धमक, कवित्वशक्ति, मोठेपणा मिरवण्याची अनातुरता इत्यादि गुणांनी शास्त्रीबोवांचा थोरपणा व्यक्त होण्यासारखा होता. तथापि ते शुक्रासारखे चमकणारे नव्हते. त्यांच्यांत गुरूचें गांभीर्य दिसे. कोल्हापूरचे डॉ. श्रीखंडे यांची आपत्तींतहि न डगमगणारी गंभीर वृत्ति पाहून हिमालयाची सुद्धा मान नमती झाल्यास नवल नाही.

निरनिराळा स्वभाव प्रसंगीं किती उपयुक्त ठरतो ह्याचा अनुभव आम्हांस ह्या प्रवासांत आला. बुद्धिभिन्नतेप्रमाणे स्वभावभिन्नता सुद्धा समाजाला उपयोगी आहे हें मनाला पटण्याची संधि सहप्रवासामुळे लाभली हें एक आमच्या यात्रेचें अनपेक्षित फळ समजलें पाहिजे. आमच्यामध्ये इतिहासज्ञ होते तसे तत्त्वज्ञहि होते; कवि होते तसे विनोदीहि होते; संस्कृतज्ञ व सनातनी होते तसेच श्रद्धाहीनहि होते; वक्ते होते तसे मौनेहि होते; शहाणे होते तसे मूर्खहि होते; चित्रकार होते तसे हस्तासनज्ञहि होते. सारांश, हा चित्रविचित्र जमाव मनुष्यस्वभावाचा अभ्यास करणाराला नमुनेदार विषय झाला होता.

हरिद्वाराहून आमचा तळ वैशाख शुद्ध ९ स सोमवारीं सकाळीं हालला. मार्गांत हृषीकेश येथे टेहरीला जाणाऱ्या नवीन लॉऱ्या करावयाच्या असल्यामुळे व बोजेवाल्यांची नोंद व्हावयाची असल्याकारणाने तीन तास मुक्काम करणें भाग पडलें. ह्या मिळालेल्या अवधींत बाजारांतून भाजीपुरी आणून अल्पोपाहार करण्याची संधि वायां दवडली नाही. आमच्या मोटारगाड्या १२। वाजतां चालू झाल्या. एका वेळेला एकाच बाजूने गाडी यावयाची असा नियम असल्यामुळे वाटेंत नरेंद्रनगर येथे एक तास आम्हांस थांबावें लागलें. हें शहर टेहरीच्या विद्यमान महाराजांनी नवीन वसविलें आहे. अर्थात् शहराची रचना अर्वाचीन पद्धतीस अनुसरून केलेली आहे हें सांगावयास नको. महाराजांचा मुक्काम नवीन राजधानींतच असतो. श्रीमंत बाळासाहेब यांच्या सांगण्यावरून स्नानसंध्यादेवतार्चन इत्यादि धार्मिक कृत्यांत प्रत्यहीं २।४ घंटांचा काल घालविण्याइतकी धर्मश्रद्धा टेहरीच्या महाराजांची असल्याचें समजलें. ते देवीभक्त आहेत. असो. नरेंद्रनगर आम्हीं २॥ वाजल्यानंतर सोडलें. टेहरीस पोचण्यास आम्हांस संध्याकाळचे ७




१६ हरिद्वार गंगाघाट.



१७ हरिद्वार गंगेशेजारी.



१८ (वर) जमनोत्री पहाड. १९ (खाली) टेहरीजवळून गंगा.



वाजले. हृषीकेश ते टेहरीपर्यंत हा ५२ मैलांचा नवीन मोटाररस्ता टेहरीच्या महाराजांनी केला असल्यामुळे आमचें ५२ मैल चालणें वांचलें, व प्रवासकाल निदान चार दिवसांनी कमी झाला. याचें श्रेय टेहरीच्या महाराजांना दिलें पाहिजे. रस्ता अद्यापि कच्चा; शिवाय वळणें आणि चढ हीं दृष्टीला भेडसावीत असल्यामुळे ह्या प्रवासांत निर्धास्तपणाचें सुख लाभलें नाही. श्रीमंत बाळासाहेब हे टेहरीच्या महाराजांनी पाठविलेल्या मोटारींतून बसून निघाले ते टेहरीस तिसरे प्रहरीं जाऊन पोचले. त्यांचा सोमवार सुटावयाचा असल्यामुळे आम्ही पोचतांच त्यांच्या पंक्तीला आम्हांस बसावें लागलें. स्नान न करितां जेवण्याची सुरवात आम्हीं टेहरीला केली म्हणावयाची ! हरिद्वाराहून सकाळींच निघावयाचें असल्यामुळे धोतरें वाळणार नाहीत या भीतीने बऱ्याच जणांचें स्नान झालें नव्हतें. लंगोट नेसून स्नान करण्याची सवय असणाऱ्यांनी मात्र स्नान उरकून घेतलें होतें. उभ्या दिवसांत अस्नात राहावयाचे प्रसंग पुढे अनेक आले. ह्याला फक्त बाळासाहेब व श्रीमंत सौ. राणीसाहेब ह्यांचा अपवाद होता. उभयतांचीं स्नानें रात्रीं २ वाजतां होत असत. त्यांच्या स्नानांत एक दिवसहि खळ पडला नाही. मला स्नानाच्या पूर्वी जेवण्याची सवय नसल्यामुळे मी पुढे जेवण्याचें टाळून फराळावरच उरकून घेई. टेहरीच्या महाराजांकडून श्रीमंतांच्या परिवारांत सापडल्यामुळे आमची भोजनाची व्यवस्था सरदारी थाटाची होईल अशी ज्यांची अपेक्षा होती त्यांची मात्र पूर्ण निराशा झाली. टेहरीस आमचा मुक्काम एका देवळांत होता व इतर ठिकाणांप्रमाणे आम्हांला साधेल त्याप्रमाणे आपली व्यवस्था करून घ्यावी लागली.

टेहरी संस्थानचें टेहरी हें राजधानीचें शहर आहे. त्यामुळे राज्यकारभाराच्या आधुनिक अंगोपांगांनी तें परिपूर्ण आहे. हायकोर्ट, कॉलेज, इंग्रजी हायस्कूल वगैरे संस्थांमुळे आपण ब्रिटिश हिंदुस्थानांतील एका शहरांत आहों कीं काय असा भास होतो. हायकोर्टाला प्रधान न्यायालय असें म्हणतात. ह्याचे एक न्यायाधीश घनश्यामदास यांच्या भेटीस मी गेलों होतों. हे मूळ गुजराथी गृहस्थ असून आता संयुक्तप्रांतांतले रहिवासी झाले आहेत. त्यांनी त्या प्रांतांत जिल्हान्यायाधीशाचें काम करून पेन्शन घेतल्यानंतर टेहरी सरकारने हायकोर्ट जज्ज म्हणून त्यांची नेमणूक केली आहे. संभाषणांत संस्थानांतील दोन कायद्यांचा त्यांनी उल्लेख केला. त्या कायद्यांची माहिती निराळी दिली आहे.

टेहरी हा सुमारें ४००० लोकवस्तीचा गांव आहे.

टेहरीस बदरीनाथ, केदारनाथ, सीताराम, सीतलादेवी, दुर्गादेवी, राधाकृष्ण, हनुमान, गणपति इत्यादि देवांचीं देवळें असून राजराजेश्री देवीचें देऊळ जुन्या राजवाड्यांत आहे. कॉलेजची स्थापना नुकतीच झाल्यामुळे फक्त ९ विद्यार्थी तेथे सध्या शिकत आहेत. अलाहाबाद विद्यापीठाला कॉलेज संलग्न करून घेतलें आहे.

टेहरी ते गंगोत्री १०० मैल व टेहरी ते जम्नोत्री ७४ मैल आहे. टेहरी येथे मंगळवारीं संध्याकाळीं चांगला पाऊस पडला.

वैशाख शु॥ एकादशी बुधवारीं आम्हीं टेहरीचा निरोप घेतला. येथून पायीं प्रवासास आरंभ होतो. टेहरीहून १२ मैलांवर असलेल्या भेलढाणा गांवीं आम्हांस मुक्कामास जावयाचें होतें. आम्ही टेहरीहून ५॥। वाजतां निघालों ते १२॥ ला आपल्या मुक्कामावर आलों.* एकादशीचें उपोषण, वाटेंत दूध नाही, चढण मोठी, ह्यामुळे पहिल्या दिवसाची चाल चालणाऱ्यांस चांगलीच जाणवली. बोजेवाले चारानंतर आले तेव्हा सर्वांना फराळाला मिळालें. धर्मशाळा लहान, यात्रेकरूंची अतोनात गर्दी, ह्यामुळे बऱ्याच लोकांस उघड्यामध्ये जमिनीवर निजावें लागलें. एकादशी असूनहि सोमवाराप्रमाणे मला ह्या दिवशींहि स्नान करतां आलें नाही.

बुधवारच्या उपोषणामुळे दुसऱ्या दिवशीं जेवून जाण्याचें आम्हीं कांही मंडळींनी ठरविलें. त्याचा एक फायदा असा झाला कीं, मला गुरुवारीं स्नान करून उपोषण सोडतां आलें. भेलढाण्यास नदी आहे खरी पण ती १५० फूट खोल व उतरण्याचा रस्ता अत्यंत दुर्घट. पण अशा ठिकाणीं सुद्धा हौसेने जाऊन यथेच्छ जलविहार करणारे शोकी आमच्यामध्ये कोल्हापूरचे डॉ. श्रीखंडे व त्यांचे मावसबंधु कात्रेशास्त्री हे दोघेच होते. थंडीची परवा न करतां कोठेहि नदींत डुंबत बसण्याचा त्यांचा सोस कवीला स्फूर्ति देणारा होता. असो. सकाळीं स्नान व जेवणें आटोपून आम्ही गुरुवारीं ९॥। ला भेलढाण्याहून निघून धरासूला संध्याकाळीं ७॥। ला जाऊन पोंचलों. अंतर १५ मैल होतें. शुक्रवारीं धरासूला आमचा मुक्काम होता. ह्या दिवशीं नरसिंहजयंती व थोरल्या बाजीरावाची पुण्यतिथि असल्यामुळे हे दोन्ही प्रसंग आम्हीं पुण्याच्या टिळकमंदिरांत बोलत आहों अशा दिमाखाने मोठमोठीं समर्पक भाषणें करून यथोचित पार पाडिले. आमच्या श्रोतृवर्गांत सहप्रवासी असलेल्या गुजराथी स्त्रियाहि सामील झाल्या होत्या. बाबासाहेब देशपांडे ह्यांच्या भाषणाने पाझरणार नाही असें कोणाचें पाषाणी हृदय असणार ?

* येथे व यापुढे दिलेली वेळ ही माझ्या स्वतःच्या प्रवासाची आहे.

बाजीरावानें मस्तानी ठेविली होती व तो दारू पीत होता एवढ्यावरून बाजीराव व्यसनी होता हें ठरत नाहीं असा माझ्या प्रतिपादण्याचा झोक होता.

चतुर्दशीच्या दिवशीं सकाळीं ५। वाजतां धरासूच्या धर्मशाळेंतून बाहेर पडलों. सिलक्यारी येथे येण्यास आम्हांस दुपारीं १। वाजला. अंतर १३ मैलच होतें पण पहिल्या ४ मैलांची फार मोठी चढण चढून जावें लागलें. १३ मैलांपैकी ९ मैल मी पायीं चालत गेलों. सिलक्यारी हा गांव पांच हजार फूट उंचीवर आहे.

सिलक्यारीहून आम्हांस गंगाणीस जावयाचें होतें. ह्या ९ मैलांच्या प्रवासानें आमचे ६ तास घेतले. सिलक्यारीहून उजाडत ६ वाजतां निघून १२ वाजतां गंगाणी गांठली. येथूनच बर्फाचे डोंगर दिसूं लागले. पहिले ३ मैल सारखी चढण होती. हा प्रवासहि माझा पायींच झाला. गंगाणीहून जम्नाचट्टी ७ मैल आहे.

वद्य प्रतिपदा, सोमवार: सूर्योदयापूर्वींच ५॥। वाजतां निघून १० वाजतां मुक्कामावर गेलों व दुसऱ्या दिवशीं तेथून सकाळीं ६ वाजतां निघून हनुमानचट्टीवर १२ वाजतां आलों आणि बुधवारीं १२ वाजतां आम्हांला जम्नोत्रीचें दर्शन घडलें. हनुमानचट्टीहून आम्ही ५॥ वाजतां निघालों होतों. चालावयास लागल्यापासून बरोबर ८ दिवसांनी ह्या पुण्यभूमीचें दर्शन घडलें. जम्नोत्रीस जातांना सर्वांचीच गाळण उडाली; प्रचंड धुकें, बर्फाचा पाऊस, हवेंतील गारठा, कमरेचा कांटा मोडणारी चढण, आणि श्वासोच्छ्वासाचा कोंडमारा, अशा संकटांतून आम्हीं जम्नोत्री गांठली. येथे ऊन पाण्याचें टांकें असल्यामुळे स्नानाची सोय उत्तम झाली. उतरण्याच्या जागेचा संकोच असल्यामुळे रात्रभर पाय आंखडून घेऊन निजावें लागलें होतें. जम्नोत्री हा शब्द यमुनोत्तरी असा मूळचा आहे असें म्हणतात. यमुनेचा आपण उगम गांठला म्हणजे तिच्या उत्तरेस गेलों असें होतें.

जम्नोत्रीला आणखी एखादा दिवस राहण्याचें एकाच्याहि मतांत येण्यासारखी स्थिति नव्हती; म्हणून दुसऱ्याच दिवशीं सकाळीं आम्ही परत फिरलों.

गुरुवारीं सकाळीं जम्नोत्री सोडली. वाटेंत दोन मुक्काम करून आल्यामार्गानेच गंगाणीस शनिवारीं सकाळीं १० वाजतां येऊन पोचलों. गंगाणीची उंची ४२०० फूट आहे. गंगाणीची धर्मशाळा नदीकांठींच होती तथापि गार पाण्याच्या धास्तीनें उत्तरकाशी व धरासू ह्यांशिवाय इतरत्र मला कोठेच नदीचें स्नान घडलें नाहीं. गंगाणीस येतांना व जातांना आम्हांस प्रेतसंस्कार पाहावयास मिळाले. त्याचें स्वतंत्र वर्णन पुढे केलें आहे. ह्याच धर्मशाळेंत दोनहि प्रसंगीं

आम्हांला व्याख्यानांची हौस फेडून घेतां आली. आमच्यांतील प्रमुख वक्ते म्हणजे विनोद व बाबासाहेब; विनोदांच्या व्युत्पत्तिशास्त्रांतील कसरतीने मनाचें रंजन होई व तत्त्वज्ञानांतील कोडीं उकलण्याने बुद्धीला खाद्य मिळे. नारायणराव आठवल्यांची गुरुनिष्ठा निस्सीम आहे. पुण्यास भाऊशास्त्री वझ्यांचीं अलंकारिक व आकर्षक प्रवचनें ते पारमार्थिकतेने श्रवण करतात इतकेंच नव्हे तर त्यांनी तीं प्रवचनें शब्दशः लिहून काढलीं आहेत. नारायणरावांनी कांही प्रवचनें आम्हांस वाचून दाखविलीं. अशा रीतीने शास्त्रीबुवांच्या वाक्प्रबंधांचा आम्हांस अचानक लाभ घडला. डॉ. श्रीखंडे कालिदासाचा हिमालयाचा परिचय आपल्या भाषांतरित कवितांच्या द्वारें आम्हांस करून देत.

गंगाणी रविवारीं (वैशाख वद्य अष्टमी) ५।। वाजतां आम्हीं सोडली. आणि सिंघोट ९।। मैलांपेक्षा जास्त नव्हतें तरीसुद्धा तेथे जाण्यास आम्हांस बरोबर ७ तास लागले. ह्याचें कारण पहिले ५ मैल प्रचंड चढ होता. मी पहिले ३ मैल व शेवटले ३ मैल चाललों. वाटेंतील वनश्री फारच सुंदर व रम्य असल्यामुळे चालण्याचे श्रम भासले नाहीत. सोमवारीं सकाळीं ५ तासांत ९ मैल अंतर तोडून उत्तरकाशीस १० वाजतां येऊन पोचलों. येथे आम्हास बिर्लांची प्रशस्त धर्मशाळा उतरण्यास मिळाली होती. येथे एकदा व भटवाडीस एकदा मिळून दोनदा टेहरी सोडल्यापासून गंगोत्री-जम्नोत्रीच्या प्रवासांत नदीवर स्नानसंध्या-ब्रह्मयज्ञ-ऋषितर्पण-पितृतर्पण वगैरे आह्निक माझ्या हातून यथासांग झालें. उत्तरकाशींत साधूंचे मठ आहेत. भावे आडनांवाच्या एका चित्पावन ब्राह्मणाने ह्या क्षेत्रांत कायमचा वास केला आहे. निरुपाधिकपणें कालक्रमणा करणाराला उत्तरकाशी क्षेत्र हें अत्यंत लोभनीय आहे ह्यांत शंका नाही.

वैशाख वद्य १० मंगळवार या दिवशीं मणेरीचा मुक्काम गांठण्याकरिता उत्तरकाशीहून आम्ही सकाळीं ५।। वाजतां निघालों. रस्ता जरी चांगला सपाटीचा होता तरी हा ९ मैलांचा प्रवास १० वाजण्यापूर्वी संपवितां आला नाही. आरंभापासून अखेरपर्यंत पावसाने आम्हांस छेडलें होतें.

मणेरीपासून भटवाडीचा ९ मैलांचा रस्ता सपाटीचा असूनहि बुधवारीं सकाळीं ५। पासून ९ वाजेपर्यंत आम्ही प्रवासमार्गांत होतों. येथे उतरण्यास जागा चांगली मिळाली व ती नदीजवळच असल्यामुळे स्नानाची सोयहि उत्तम झाली.

भटवाडी व गंगोत्री ह्यांच्या दरम्यान गंगणानी व हरसील असे दोनच

मुक्काम व्हावयाचे होते.

मटवाडीहून गंगणानी ९॥ मैल; सुकी ९ मैल; सुकीहून हरसील ६ मैल; हरसीलहून गंगोत्री १६ मैल. ही ४०॥ मैलांची रखड आम्ही ३ दिवसांत पुरी केली. गुरुवारीं सकाळीं भटवाडी सोडली आणि शनिवारीं सायंकाळीं ६। वाजतां आम्हांस गंगोत्रीचें दर्शन घडलें. भटवाडीहून गंगणानीचा ९॥ मैलांचा रस्ता बऱ्याच अंशाने चांगला होता. शेवटीं शेवटीं रस्ता खराब लागला. वनशोभा मात्र अप्रतिम होती. गंगणानीस आम्ही ११। वाजतां पोचलों व तेथेच त्या दिवशीं मुक्काम केला. शुक्रवारीं सकाळीं ४॥। वाजतां गंगणानी सोडली. वाटेंत सुकी येथे ९॥। वाजतां पोचल्यानंतर मंडळींनी थोडा फराळ केला. फराळ आटपून ११॥। वाजतां पुनः मार्ग धरला ते ४ वाजतां हरसील येथे येऊन पोचलों. तेथून आम्ही दुसऱ्या दिवशीं ५॥ वाजतां निघालों आणि वर सांगितल्याप्रमाणे गंगोत्री ६। वाजतां गांठली. वाटेंत भैरवघाटीला ११। पासून ३ वाजेपर्यंत विश्रांति घेतली. भैरवघाटीचा भयंकर चढाव मोठमोठ्या ईश्वरवानांचीहि हिम्मत खचविणारा आहे.

हरसील येथे ज्या बंगल्यांत आम्ही उतरलों होतों तो एका जर्मन माणसाने बांधला होता. विशेष हें कीं, बंगला बांधण्यास लाकडाशिवाय दुसऱ्या कोणत्याहि पदार्थाचा उपयोग केलेला नाही. बंगला फारच विस्तीर्ण असून भोव-तालीं सफरचंदाची बाग आहे. येथे राहून हा जर्मन साहेब कस्तुरीहरणांची शिकार करी. कस्तुरी जर्मनींत पाठवून लाखो रुपये त्याने मिळविल्याचें सांग-तात. हें उघडकीस आल्यावर त्याचा हा धंदा बसून साहेबाने आपल्या देशाची वाट धरली. सध्या बंगला टेहरी सरकारच्या ताब्यांत आहे. ह्यावरून आम्हांला बोध घेण्यासारखा नाही काय ? आमच्यांत अनाकानी व खुळचटपणा नांदत आहे तोपर्यंत कोणीहि कोठूनहि आम्हांस नागवणार हें उघड आहे.

वैशाख वद्य १४ रविवारीं गंगोत्री येथे मुक्काम करून विश्रांति घेतली. हेतु सफल झाल्याने सर्वांनाच आनंद झाला. केदारनारायणापेक्षा गंगोत्री-जम्नोत्री-ची यात्रा कठीण ह्यांत शंका नाही. रस्ते अरुंद, पहाड पडलेले, चढउतार प्राण कासावीस करणारे, विश्रांतिस्थलांची विरलता आणि खाद्य पदार्थांची दुर्मिळता ह्या कारणांनी गंगोत्री-जम्नोत्रीच्या प्रवासांत पोशाकी प्रवाशाच्या दुबळ्या मनाला दचका बसतो हें खरें; परंतु माझ्या मतें प्रवास कितीहि क्लेशकारक व याता-यातीचा असला तरी तो धोक्याचा नाही. आगगाडींत बसणारा अपघातांत साप-

डतो, आगबोटीने प्रवास करणारावर जलसमाधीचा प्रसंग येतो, त्याप्रमाणे पहाड तुडविणाऱ्यावर क्वचित् गदा येण्याचा संभव नाही असें नाही. हिमालयाचे डोंगर ठिसूळ; वाऱ्याबरोबर वरून दगड कोसळून डोकें केव्हा फुटेल ह्याचा नेम नाही; कोठे कोठे एकच पाऊल ठेवितां येईल अशा जागेवरून चालण्याचा प्रसंग येतो; जरा अनवधान झालें तर झुकांडी कोठे जाईल तें सांगवत नाही; आणि खाली खोल दरी असली तर प्राण बचावेल ही आशाच करावयास नको. परंतु एवढ्याने प्रवासाला निघणाऱ्यांची ना-उमेद होण्याचें कारण नाही. प्रत्येक तरुणाने ही यात्रा अवश्य करावी. त्या योगाने त्याचें शारीरिक, मानसिक व बौद्धिक कल्याणच होईल असें माझें निश्चित मत आहे. जम्नोत्रीपेक्षा गंगोत्री अधिक रम्य आहे. गंगोत्रीपासून गंगेचा उगम १८ मैल दूर गोमुखाजवळ आहे. आम्ही तेथपर्यंत गेलों नाही. खुद्द गंगोत्री येथे व खाली कित्येक मैल गंगेचें पात्र बरेंच रुंद असलेलें आढळलें. केदारकडील दगडाळ डोंगर निर्वृक्ष असल्याने रुक्ष भासतात, पण ह्या बाजूचे डोंगर त्याच जातीचे असूनहि वृक्षाच्छादित आढळले. त्यामुळे सृष्टिसौंदर्याने डोळ्यांचें पारणें फिटे. डोळ्यांखेरीज बाकी सर्व अवयवांना कुरकूर करण्यास जागा होती: थंडीने नाक वाहत असे; चालण्याने पाय थकून जात; नदीच्या घनघोर नादसातत्याने कानठळ्या बसत; क्षुधेने पोट व्याकूळ होई. देवदारू, चीड इत्यादि प्रचंड वृक्षांनी गच्च भरलेल्या पर्वतावलींचीं गगनचुंबित व हिमाच्छादित शिखरें पाहून डोळ्यांना मात्र आनंदाचें भरतें येई.

गंगोत्रीला मुक्काम झाल्यामुळे चक्रीव्याख्यानांचा समारंभ उरकून घेतां आला. ह्यानंतर पुढे भाषणें झालीं नाहीत व होतील अशी अपेक्षाहि नव्हती; म्हणून आमच्या ह्या व्याख्यानमालेचा त्या दिवशीं समारोपाचा दिवस होता असें म्हणण्यास हरकत नाही. नेहमीप्रमाणे श्रीमंत बाळासाहेब, विनोद व बाबासाहेब ह्यांचीं भाषणें झालीं. मीहि दोन शब्द बोललों. डॉ. श्रीखंडे ह्यांचें कविता-वाचन झालें. कात्रेशास्त्र्यांनी श्रीमंत बाळासाहेबांना उद्देशून केलेलें प्रशस्तिपर संस्कृत काव्य वाचून दाखविलें. श्रीमंत बहुधा व्यायामावर बोलत. इतिहासभूषण बाबासाहेबांचा इतिहास हा विषय ठरलेलाच असे. मला ऐकलेलीं भाषणें स्मरणाने कधीच सांगतां येत नाहीत. ह्या माझ्या अंगच्या दोषामुळे इतरांच्या भाषणांचा गोषवारा देणें अशक्य झालें आहे. परंतु ह्या दिवसाचें माझें भाषण मात्र सारांशरूपाने मी येथे देतों.

लोक सुखी कसे होतील हा माझ्या भाषणांतील मुख्य विषय होता. नेपाळचे व टेहरीचे प्रजाजन ह्यांचें चित्र माझ्या डोळ्यांसमोर होतें. युरोपमध्ये चाललेल्या युद्धाच्या कामीं ह्या देशच्या राजांना सढळ हाताने आर्थिक मदत करितां येते; विलायतेच्या वाऱ्या करण्यासहि ह्यांच्या खजिन्यांत भरपूर पैका असतो; परंतु बोजेवाल्यांकडे व दंडीवाल्यांकडे बघितलें म्हणजे मूर्तिमंत दारिद्र्य दृष्टीपुढे उभें राहतें. लोकांना पौष्टिक राहो पण पुरेसेंहि अन्न खाण्यास मिळत नाही; अंग आच्छादून घेण्यास वस्त्रप्रावरण नाही; आणि पायांत घालावयास पादत्राण नाही, अशा स्थितींत लोक काळ कंठीत असतात. अशा लोकांकरिता आपण राज्यासनावर आहों ह्याची जाणीवहि राजे लोकांना नसते. हा विचार मनांत आला की, विद्यमान शासनयंत्रें नुसतीं निरुपयोगीच नव्हे तर घातक आहेत असें कोणालाहि वाटल्याशिवाय राहणार नाही. लोकांच्या कल्याणाकरिता शासनसंस्थांची आवश्यकता आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. परंतु ह्या संस्था लोकनिर्मित अथवा लोकतंत्र असल्याशिवाय लोकांना सुख लाभणें अशक्य आहे. राजेलोक मनुष्यप्राण्याला अंकित करून सत्ताधीश होतात. हें सर्व ते आपल्या इच्छेने व आपल्या मतलबाकरिता करीत असतात. आम्ही तुमच्या सत्तेखाली येतों असें लोक त्यांना सांगावयास गेले नाहीत. अर्थात् राज्य करण्यांत राजे लोक स्वतःचा अर्थ साधतात; लोकांचा अर्थ साधणें हा त्यांच्या राज्यस्थापनेचा उद्देश नसतो. म्हणून अशा राजांकडून लोककल्याणाची अपेक्षा करणें हास्यास्पद आहे. आजपर्यंत जगाच्या इतिहासांत अनेक राजे प्रजाहितदक्ष होऊन गेले हें खरें. परंतु हा दयाळूपणा त्यांच्याच फायद्याचा होता हें विसरून चालणार नाही. स्वभावभेदाने क्रूर, दुष्ट, जुलमी राजे असतात त्याप्रमाणे कांही राजे न्यायी, प्रेमळ व सहृदय असूं शकतील. परंतु राजा कसा आहे हा प्रश्न असल्या चर्चेत अप्रस्तुत आहे. तुम्ही राजे कां झालां? तुम्हांला राजपद कोणीं दिलें? ह्या लोकांच्या प्रश्नांस राजांजवळ काय उत्तर असणार? आज हजारो वर्षांचा अनुभव लोकांनी घेतलेला आहे. परतंत्र राज्यशासनाने लोक सुखी झाल्याचें आढळत नाही. ह्यासाठी राज्यशासनव्यवस्था लोकांनी निर्माण केलेली अशीच असली पाहिजे व ती नेहमी लोकतंत्रच राहिली पाहिजे.

अनियंत्रितराजसत्तेखाली लोक दुःखी होतात त्याचप्रमाणे देवाच्या नांवाने भोळ्याभाबड्या लोकांना चकवून धर्मसंस्थापक आपला अम्मल प्रस्थापित करितात. अशा ह्या धर्माच्या नांवाखाली आज कित्येक वर्षे जनता छळली जात

आहे. लोकांना मार्गावर ठेवण्यास राज्यशासनाप्रमाणे धर्मशासनहि अपरिहार्य आहे. ज्या कित्येक गोष्टी राज्यशासनाच्या कक्षेत येऊं शकत नाहीत त्या धर्मशासनाच्या अमलाखाली आल्या पाहिजेत. परंतु हें शासनसुद्धा लोकाधीन असणें अगत्याचें आहे. आमच्या धर्मांत आहे एवढ्याच खुळचट समजुतीने कोणतेंहि निंद्य कृत्य करण्यास मनुष्य धडाडीने व प्रतिष्ठितपणें प्रवृत्त होतो.

वर सांगितलेल्या दोन शासनांखेरीज लोककल्याणार्थ समाजशासनाची आवश्यकता असते. हें शासन अजूनहि बऱ्याच अंशाने लोकांच्या स्वाधीन आहे. बहिष्काराच्या रूपाने तें दृग्गोचर होतें. सारांश, समाजाच्या सुव्यवस्थेला अवश्य असणाऱ्या ह्या तीन शासनसंस्था– राज्यशासन, धर्मशासन व समाजशासन– लोकतंत्र असणें जरूर आहे. हें जेव्हा घडून येईल तेव्हाच "सर्वे सुखिनः सन्तु" ही आशा सफल होईल.

गंगामाईच्या जन्मस्थलाचें अखेरचें दर्शन घेऊन आम्ही वैशाख अमावास्येस सोमवारीं सकाळीं तेथून उलटलों. उदकाची निर्मलता, प्रवाहकर्माचें अविरतत्व व पर्वतप्राय प्रस्तरांचें चूर्ण करण्याचें सामर्थ्य एवंगुणविशिष्ट अशी गंगा सर्व यात्रेकरूंना एकच संदेश देणार. गंगेने मला बजाविलें:—

धवलमति त्वां व्हावें रमवावें चित्त नित्य व्यवसायीं ।
फोडावें दुष्टमतां कीं मी चुरतें नगोपलां जेंवीं ॥


गंगेचा हा संदेश घेऊन गेल्या मार्गाने आम्ही परतलों तों टेहरीस सकाळीं ८ वाजतां येऊन पोचलों. परत येतांना वाटेंत हरसील, गंगाणी, भटवाडी, उत्तरकाशी, धरासू, मलढाणा असे सहा मुक्काम करावे लागले.

एकंदर २५ दिवसांत हा आम्हीं सुमारें ३२५ मैलांचा प्रवास केला. धरासूजम्नोत्रीसारख्या ठिकाणचे मुक्काम विचारांत घेतले तर दररोज आम्ही १५ मैलांची मजल करीत असूं असें म्हणतां येईल. ह्या २५ दिवसांत १० पेक्षा अधिक स्नानें माझीं झालीं नाहींत. हिमालय ही कर्मभूमि नाही म्हणतात ती ह्याचकरिता !


टेहरीस येतांच बदलापुरास मी घरींच आलों असें मला वाटलें. मोटार व आगगाडी ह्यांनी जोडलेल्या ह्या दोन स्थळांचा दूरभाव नष्ट झाल्यास नवल नाही. टेहरीहून रविवारीं १० वाजतां मोटारीने निघालों ते सायंकाळीं ७ वाजतां हरिद्वारला आलों व तेथेच रात्रीची गाडी गांठली. हरिद्वार येथे हिमालयाचें शेवटचें



२० भटवाडी-चट्टीजवळ.



२१ गंगोत्रीच्या वाटेवर हरसीलाच्या अलिकडे.



२२ उत्तरकाशी मंदिर.



२३ पहाडांतील अवघड रस्ता.

दर्शन घेतलें. हिमालयाजवळहि आम्हांस देण्यास संदेश नव्हता असें नाही; परंतु तो कात्रेशास्त्री ह्यांच्या शब्दांतच देणें बरें.

'मनोमत्सदृशं कृत्वा सुखं संसर सद्मनि'
इति सन्दिशति प्रेम्णा नगराजो हिमालयः ।

आमचें मन हिमालयासारखें मोठें झाल्यास खरोखरच यात्रेची पायपिटी कारणीं लागणार आहे; पण—

## परिशिष्ट १ लें

# टेहरी संस्थान

टेहरी संस्थानच्या चीफ सेक्रेटरींना पत्र लिहून मीं कांही माहिती मागितली होती. त्याप्रमाणे त्यांनी माहिती पुरवली. त्यावरून असें दिसतें की, संस्थानचें क्षेत्र ४८०० चौ. मैल असून लोकसंख्या इ. स. १९४१ च्या शीरगणतीप्रमाणे ५३६९९८ आहे. संस्थानांत म्हणजे ४८०० चौरस मैल क्षेत्रांत २७६४ गांवें आहेत व लागवड जमीन २२०८०८ एकर आहे. माणशीं अर्धा एकरसुद्धा जमीन पडत नाही. तसेंच दर गांवाची लोकसंख्या दोनशेंच्या आंत पडते. भात, गहूं, बटाटे, मंडुवा आणि झंगोरा हीं मुख्य पिकें होत. पाऊस कित्येक ठिकाणीं (आंतील डोंगराळ भागांत) ३५ इंचांपर्यंतच पडतो तर बाहेरील डोंगरांच्या रांगांवर १०० इंचहि पडतो. पाऊस कमी पडल्यास दुष्काळाची आपत्तिहि ओढवते.

जमीनमहसूल, जंगल, अबकारी, व्यापार व न्यायखातें ह्या उत्पन्नाच्या बाबी असल्याचें चीफ सेक्रेटरीसाहेब लिहितात. ह्यांत न्यायखातें ही उत्पन्नाची बाब केली जावी ह्याचें आश्चर्य वाटतें. कोणतेंहि सुधारलेलें सरकार न्यायखातें हें राज्याच्या उत्पन्नांत भर घालण्याचें साधन समजत नाही. संस्थानचें एकंदर उत्पन्न १८ लाख रुपये असावें. म्हणजे दर माणसापासून सरकार ३॥ रु. कर घेतें. हा कर माफक दिसतो. तथापि माणशीं उत्पन्न किती पडतें ह्याची माहिती नसल्याने माफकपणाबद्दल खात्री देतां येत नाही. जंगलांत देवदार, कैल, चीर, अक्रोड, फर, बॉक्सवुड, साल, बाबू, कोकट वगैरे निरनिराळ्या तऱ्हेचीं विपुल झाडें आहेत.

संस्थानांत हिंवताप व दुसरे दोषी ताप ह्यांचा फैलाव बराच आहे.

जंगलाचा हा परिणाम असणार. महामारीचा उपद्रव क्वचित् होतो. देवीची सांथ येतेच. जन्माचें हजारीं प्रमाण २४.९० असून मृत्यूचें प्रमाण १८.८६ आहे. शेतीवांचून दुसरा धंदा नाही.

प्राथमिक शिक्षण सक्तीचें आहे. अशा शिक्षणाच्या ८७ सरकारी शाळा असून १३१ खासगी शाळा सरकारच्या मदतीने चालणाऱ्या आहेत. एकूण संख्या २१८. शिवाय १ कन्यापाठशाळा, ५ व्हर्न्याक्युलर मिडल स्कूल्स, १ संस्कृत पाठशाळा, १ कॉलेज, आणि २ लोकर कातण्याची व शिवण्याची कला शिकविणाऱ्या शाळा.

## टेहरी

टेहरीचे राजे अग्निवंशांतील पवार क्षत्रिय आहेत. अबू पर्वतावर झालेल्या यज्ञांत त्यांची उत्पत्ति झाली अशी पौराणिक कथा आहे. नरेन्द्रशहा ह्या विद्यमान राजेसाहेबांची बिरुदावली येणेंप्रमाणे :– स्वस्ति श्रीबद्रीशचर्यापरायण गढवाल-राज्य महीमहीन्द्र धर्मवैभवधर्मरक्षकमहाशिरोमणी राजा नरेन्द्रशा.


गेल्या महायुद्धांत पांच लाखांचे युद्धकर्जाचे रोखे संस्थानने घेतले होते. शिवाय, २०।२५ हजारांची देणगी दिली ती निराळी.

संस्थानांत सरकारी शक विक्रम संवत् आहे. कोर्टाच्या ठरावावर मिति, महिना व संवत् लिहिलेला मीं पाहिला आहे. कोर्टाचे ठराव हिंदींत लिहितात. पंचायतींकडे किरकोळ खटले सोपविले आहेत.


संस्थानला दिवाण नाही हें विशेष आहे. सन १९१८–१९ च्या अहवालावरून सैन्यावर दोन लाखांवर खर्च होत असावा असें दिसतें.

हिमालयांत मेंढरें फार व थंड हवेमुळे लोकरी वस्त्राची उत्तरहिमालयीन लोकांस अवश्यकता असते. मेंढरांची लोकर काढून तिचें सूत करणें व ह्या सुताचें अगर वळलेल्या लोकरीचें कापड करणें हीं सर्व कामें तिकडचे लोक स्वतः करतात. रस्त्याने चालतां चालतां ते लोकरीचें सूत चक्कीवर काढीत असतात. तेथील मेंढरांना निसर्गाने लोकरहि भरपूर दिली आहे. रस्त्यांत भेटलेल्या व हाताने सूत काढीत असलेल्या एका माणसाने खालील माहिती दिली आहे.


एक भेटी (मेंढी) तीन शेर लोकर एका वर्षांत मालकाला देऊं शकते. हें जास्तींत जास्त प्रमाण होय. एका माणसाने सांगितलें की त्याच्या १५० मेंढरां-



२४ शिवमंदिर धराली.



२५ देवद्रार झाडें हरसीलजवळ.



२६ गंगोत्री.



२७ हिमालयांत वनश्री.

पासून त्याला ३ मण लोकर सहज मिळते. १ मण म्हणजे ४० शेर. ५ शेर लोकरींत एका माणसाचे कपडे होतात. हे कपडे म्हणजे पायजमा, कोट, खमीस व टोपी. लोकरीचें सूत बनविण्यास शेराला ८ आण्यांपासून १॥ रुपयापर्यंत मजुरी द्यावी लागते. वर सांगितलेले कपडे तयार करण्यास ४ दिवस लागतात.

## परिशिष्ट २ रें
## कृष्णाश्रमस्वामी

गंगोत्री येथे गंगेच्या उत्तरतीरावर कृष्णाश्रम नांवाच्या एका स्वामींचा अथवा मुनीचा मठ आहे. मुनी ब्राह्मण आहेत असें सांगतात. वय सुमारें ५० वर्षांचें असावें. मुनी बोलत नाहीत. २५ वर्षें हें मौनव्रत त्यांनी चालविलें आहे. दिगंबर वृत्तीने असतात. लंगोटीहि नव्हती. कृष्णाश्रमांनी एक तत्प्रांतस्थ मुलगी बाळगली आहे. हल्ली ती २५ वर्षें उमरीची दिसते. ती अविवाहित असून पुरुषासारखा पोषाख करते. मस्तकावर जटा होत्या. कृष्णाश्रम गंगोत्रीला आले त्यास २५ वर्षें झालीं. वाचलेले व मनन केलेले दिसले. पाठांतर बरेंच आहे. उपनिषदादि वेदान्त ग्रंथ ह्यांनी पाहिले आहेत ह्यांत शंका नाहीं. शरीर व आत्मा भिन्न आहेत ह्याचा प्रत्यक्ष अनुभव स्वामी घेत आहेत असें आमच्या प्रश्नास उत्तर मिळालें. योग व मनन ह्यांच्या योगानें हा अनुभव मिळतो. चित्ताच्या एकाग्रतेस योगसाधन अवश्य आहे असें स्वामींचें मत आहे. प्रश्नांचीं उत्तरें स्वामी लिहून दाखवितात. त्यांच्या वतीने बरींचशीं उत्तरें मुलगी देते. तिच्या उत्तरांत चूक असल्यास कृष्णाश्रम ती सुधारतात. वेदांतविषयांत मुलीचीहि गति पुष्कळ झालेली दिसली. संस्कृत वचनें व श्लोक भराभर म्हणून दाखवी. गुरू-वांचून बोध होणार नाहीं असें कृष्णाश्रमांचें निश्चित मत दिसलें. अधिकारानुसार प्रत्येकाने प्रयत्न करावा हा त्यांचा अखेरचा उपदेश व्यवहारचातुर्याचा निदर्शक आहे. मुलीला नांव विचारतां तिने भगवत्स्वरूप सांगितलें; परंतु स्वामींना तें पसंत पडलें नाहीं. त्यांनी लगेच सच्चिदानंद म्हणून दुरुस्ती केली. टेहरीच्या महाराजांनी स्वामींना झोपडी बांधून दिली आहे. मुलीची झोपडी शेजारीं निराळी आहे. स्वामी कृष्णवर्ण आहेत. जें मिळेल तें खातात. त्यांच्या जेवणाची व्यवस्था मुलगी करते. ही मुलगी पहाडांतलीच पण खालच्या जातीची आहे असें कळलें.

### उत्तरकाशी[1]

येथे गंगा उत्तरवाहिनी झाल्याकारणाने ह्या गांवाचें क्षेत्र बनलें आहे. अर्थात् येथे पंडे आहेत. मुख्य देऊळ विश्वनाथाचें. देवाचा पुजारी महंत वसंतपुरी गोसावी हा आहे. साळुंकी मोठी आहे. देवासमोर त्रिशूळ आहे. ह्याशिवाय इ. स. १९०१ सालीं जयपूरच्या महाराजांनी बांधलेलें एकादशरुद्राचें देऊळ प्रेक्षणीय आहे. एकादशरुद्र म्हणजे ११ पिंड्या. पुजारी ब्राह्मण आहे. ह्याखेरीज परशुराम, दत्तात्रेय, अन्नपूर्णा, कालभैरव, गोपेश्वर महादेव, कोटेश्वर महादेव, महाकाली, केदारेश्वर, नागेश्वर, रुद्रेश्वर ह्या देवांचीं मंदिरें असून शंकराचार्य, तंत्रोटकाचार्य, जडभरत ह्यांचींहि मंदिरें आहेत. गंगेचें देऊळ असणारच. परशुरामाचा पुजारी गौड ब्राह्मण असून केदारेश्वराची पूजा एका महंताकडे आहे.

## परिशिष्ट ३ रें

# लोकस्थिति

### कांही विशिष्ट चाली

एका मुलीचें लग्न एका मुलाशीं ठरलें असून मुहूर्त मिळत नसल्यास अथवा अन्य कारणाने त्याच्याबरोबर लग्न लावण्यास व्यत्यय आल्यास त्या मुलीचें लग्न निश्चित केलेल्या वराच्या भावाशीं लावतात. परंतु त्या भावाला वधूवर नवरेपणाचा हक्क प्राप्त होत नाही : ज्याच्याशीं लग्न ठरलें होतें त्याचीच ती बायको व्यवहारतः व कायद्याने समजली जाते.

खस ब्राह्मण व खस रजपूत ह्या लोकांत ही चाल आढळते.[2]

### बायकांची अदलाबदल

भावांच्या बायका परस्परांत भाऊ बदलून घेतात; मात्र ह्या कृत्याला

१ उत्तरकाशीस कोर्ट व दवाखाना आहे. कोर्टाची इमारत नानासाहेब वंडवाल्याने बांधल्याचें सांगतात. ह्या गांवाची लोकसंख्या सुमारें १००० आहे. येथे म्युन्सिपालिटी असून अध्यक्ष सरकारी डाक्टर असतो.

येथे तहशीलदार असतो. विद्यमान तहशीलदार ममराजसिंग हे एलएल. बी आहेत. कुरुक्षेत्रांतील करनाळ गांवचे हे मूळ रहिवाशी.

२ नरेन्द्र हिंदु लॉ नांवाचें संस्थानी कायद्याचें पुस्तक हिंदी भाषेंत आहे. सारांश इंग्रेजींतहि दिला आहे, त्यांतून पुढे दिलेल्या कांही चाली घेतल्या आहेत.

बायकांची संमति अवश्यक असते. शूद्रांत व मामुली जातींत धाकट्या भावाची बायको मोठ्या दीराची पत्नी म्हणून जाते.[१]

## कठालाविवाह

एखादा पुरूष मेला तर त्याची बायको सर्व मिळकतीसह दुसऱ्या पुरुषाला देतात. ती त्याची कायदेशीर बायको होते. ह्याला कठालाविवाह म्हणतात. असें झालें म्हणजे मयताच्या वारसांना त्या मिळकतीवर हक्क सांगतां येत नाही.

## कन्याविक्रय

मुली विकत घेण्याची चाल गढवालप्रांतीं अद्यापि आहे. मुलगी विकत घेतल्यावर तिचें लग्न स्वतःशीं, मुलाशीं किंवा दुसऱ्या कोणा नातेवाइकाबरोबर लावून देतात.

## पांडवी विवाह

टेहरी संस्थानांत जंवसार नांवाचा एक विभाग आहे. तेथे सर्व भावांमध्ये एक बायको करण्याची पद्धति अद्यापि चालू आहे. लग्न वडील भावाबरोबर होतें. पतींच्या वडीलकीच्या क्रमाने पत्नी आपल्या पतींची रात्रीं भेट घेते. पहिलें मूल वडील भावाचें, दुसरें त्याच्या खालच्याचें अशी मुलांची वांटणी होते. एक भाऊ मयत झाला असतां स्त्रीला वैधव्य येण्याचें कारण नाही हें सांगावयास नकोच. भावांमध्ये वांटप झाल्यास बायको कोणाच्या तरी एकाच्या वांटणीला जाते. ही चाल ब्राह्मणांसुद्धा सर्व जातींत आहे.

## काडीमोड

स्त्रीचा काडीमोडीचा हक्क सर्व जातींत मान्य झालेला आहे. ब्राह्मण जातहि ह्याला अपवाद नाही ही गोष्ट विशेष आहे. काडीमोडीला टेहरी संस्थानांत छूट हा शब्द आहे. छूट मिळालेल्या स्त्रीला पुनर्विवाह करतां येतो.

## पुनर्विवाह

ब्राह्मणांत पुनर्विवाह रूढ असल्याचें मला टेहरीचे हायकोर्ट जज्ज घनःश्यामदास ह्यांच्याकडून समजलें. ब्राह्मण ही गोष्ट सांगण्यास नाखूष असतात.

## धार्मिक अवनति

धर्मदृष्ट्या सर्वांची अवनति झाल्याचें दिसलें. आमचा आत्माराम नांवाचा

१ They share the same bed असें अिंग्रजींत आहे.

ब्राह्मण बोजेवाला २२ वर्षांच्या उमरीचा होता. ५ वर्षांपूर्वी म्हणजे सुमारे १७ व्या वर्षी त्याची मुंज झाली. त्याला गोत्र विचारलें असतां माहीत नाहीं म्हणाला.

दुसरा बोजेवाला क्षत्रिय होता. तो ३५ वर्षांचा असून सुद्धा त्याची मुंज झाली नव्हती. तथापि त्याचें लग्न झालेलें असून त्यास मुलेंहि आहेत. मात्र ह्या प्रकारामुळे क्षत्रियांत त्याला खालची जात प्राप्त झाली आहे.

त्याचप्रमाणे आम्हांला फुलचंद शर्मा नांवाचा एक पोलीस अधिकारी भेटला. आपण ब्राम्हण म्हणून त्यानें सांगितलें. त्याचें वय ३० वर्षांचें होतें. अद्यापि त्याची मुंज झाली नव्हती. गोत्रहि त्याला माहीत नाही. माझा बाप मांस खात असे, मी मात्र खात नाहीं असें म्हणाला. त्याच्या माहितीप्रमाणे ब्राम्हणांस मांस खाण्याचा निषेध नाही.

## एका क्षत्रियाचें मत

एका क्षत्रियाने सांगितलें की, ऋग्वेद व सामवेद ब्राम्हणांचे; यजुर्वेद क्षत्रियांचा व अथर्ववेद रजपुतांचा. त्याच्यामतें रजपूत क्षत्रिय नसावेत.

## नीचशूद्र

अस्पृश्यांना नीचशूद्र म्हणतात. गंगेंत स्नान करण्याची ह्यांना मनाई आहे. ह्यांची वस्ती साधारणतः गांवाबाहेर असते. नीचशूद्र डोक्यावरून स्नान करीत नाहीत असें म्हणतात. ह्यांचा देवळांत प्रवेश होत नाही. कांही जाती कपडे शिवण्याचा धंदा करतात. ह्यांच्यांत अनेक पोटजाती आहेत. नीचशूद्रांना डोम ही सामान्य संज्ञा आहे. २८ पोटजातींचीं नांवें येणेंप्रमाणे— १ डूमनाई २ डूमकुम्हार ३ धोबी ४ कोळी ५ दर्जी ६ लोहार ७ बेडा (बादी) ८ रुडिया ९ अठपहरिया १० डूमसुनार ११ पहरी १२ डूमजोगी १३ डूमभाट १४ धुनार १५ बढई १६ छिप्पी १७ धोणी १८ बाजगी १९ ढाकी २० तेली २१ तमोटा २२ वखरिया २३ कोल्टा २४ ढलोटी २५ डूमनाथ २६ हलियाडूम २७ चमार व २८ मोची.

कोर्टांत साक्ष देण्याच्या पूर्वी शपथ घ्यावी लागते त्या वेळीं नृसिंहदेवाची मूर्ति नीचशूद्रांच्या हातीं देऊन त्या देवाची शपथ घ्यावयास लावतात. ही मूर्ति कोर्टांत ठेवलेली असते. बीट जातीचे साक्षीदार हातांत गंगा घेऊन शपथ घेतात.

खसिया जात क्षत्रियांच्या वर्णसंकरापासून बनली आहे. आता ह्या जातीचे

लोक शूद्रांत मोडतात. उच्चशूद्रांना बीट म्हणतात. बीट शूद्रांच्या पोटजाती येणेंप्रमाणे :—

१ खसिया २ कनैत ३ सुनार ४ कलाल ५ बिटनाई ६ बिटकुम्हार ७ मल्डा (गोसावी संन्याश्यांपैकी जात. हे शिवाचे पुजारी असून शेती करतात.) ८ बोहरा (शेती करणारे) ९ नायक (शेतीचा धंदा); ह्यांच्या मुली नायकिणींचा धंदा करतात (इनकी लडकियां पेशेवर होती है). आपल्याकडे नायकीण शब्द फक्त आहे. त्याचा पुल्लिंगी शब्द नायक हा आपणांस ह्या जातीच्या नांवांत आढळतो. नायकीण ही नायकाची बायको नव्हे; मुलगी आहे. १० झीवर— (ही जात मूळची गढवाली नाही परंतु ह्या लोकांचा संबंध गढवालच्या कांही कुटुंबांशीं झाला आहे. ह्यांचा धंदा नोकरीचा आहे.)

## नागपूजा

टेहरी संस्थानांत नागपूजा प्रचलित आहे. क्षत्रिय नागाची पूजा करतात. गांवांत नागाचें देऊळ असतेंच पण शिवाय घरच्या देवांतहि रुप्याची नागाची मूर्ति असते. देवळांतील नाग दगडाचा असतो. नागावरून नागूण हें नांव एका गांवाला पडलेलें आहे. ह्या गांवांतील नागाच्या मूर्तीला सात फडे आहेत. पुजारी ब्राम्हण आहे.[1] श्रावणांत प्रत्येक बुधवारीं व गुरुवारीं नागाची पूजा असते.

## अनुकरणीय कायदे

टेहरी संस्थानांत दोन उपयुक्त कायदे अमलांत असल्याचें तेथील हायकोर्ट जज्जांकडून समजलें. संवत् १९८८ सालीं ६० वर्षांवरील पुरुषाने विधवेशीं किंवा १६ वर्षांवरील कुमारिकेबरोबरच लग्न लावलें पाहिजे असा कायदा झाला. उल्लंघन करणारास २०० रु. दंड अथवा १ महिन्याची साधी कैद अशी शिक्षा कायद्याने सांगितली आहे.

दुसरा कायदा संवत् १९९५ सालीं झाला आहे. ह्या कायद्यामुळे कोणत्याहि ऋणकोला हप्तेबंदीची फिर्याद करतां येते. मला अमुक कर्ज आहे व माझी मिळकत अमुक आहे, सर्व कर्ज मला एकदम फेडणें शक्य नाही करतां मला हप्ते ठरवून कर्ज फेडण्याचा हुकूम व्हावा असें वादीला फिर्यादींत मागणें करावें लागतें. ह्या दाव्याला सर्व धनको प्रतिवादी असतात.

१ शूद्रांच्या नरसोबाची पूजाहि ब्राम्हणाकडून केली जाते असें सांगण्यांत आलें.

यंदाच केलेल्या कायद्याच्या योगाने नवरा व्याधिष्ट असल्यास बायकोला छूट (काडीमोड) मागतां येतो.

## कांही क्षत्रियजाती

१ रमोला २ कपोला ३ सजवाण ठाकूर ४ रणोत ५ दुसाद ६ बिस्ट ७ राऊत ८ राणा ९ कुमई १० रौतेला ११ बुटोला.

(परस्परविवाह्य. एकाच जातींत विवाह नाही.)

जातींचीं नांवें म्हणजे आडनांवें दिसतात.

बोजेवाले बहुधा नेपाळी असून दंडीवाले गढवाली असतात. ह्यांच्यापैकी कांहींचीं नांवें येथे देतों.

१ लालबहादूर (बडा).

२ मानसिंग दयाळसिंग— क्षत्रिय (रजपूत)— गोत्र माहीत नाही.

३ दयाळसिंग रामसिंग ,, ,,

४ बजन दलपती ,, (जात नेगी) कौंडिण्य

५ चंदनसिंग दलपती ,, (जात राऊत) ,,

मुलें— १ खुशालसिंग २ उखाकुमारी

६ चंदनसिंग बलभद्रसिंग— क्षत्रिय

७ बिससूर कैरा— जात रथोडी ब्राह्मण— गोत्र भारद्वाज

८ पारेसुर तुळशीराम— सीमॉल ब्राह्मण— गोत्र सोम

९ दशरथ तुळशीराम— ब्राह्मण; जात मिसीर; गोत्र भारद्वाज

१० हरिराम बाळकराम — ब्राह्मण; गोत्र भारद्वाज


११ बोलचंद बालाचंद— क्षत्रिय.


## प्रेतयात्रा

मनुष्य मृत झाला म्हणजे त्याच्या घरांतील माणूस थाळी वाजवतो. त्यामुळे सर्व गांवाला त्याचप्रमाणे शेजारच्या गांवालाहि कोणी तरी मयत झाला असल्याची सूचना मिळते. गांवांतील प्रत्येक मोठया माणसाने प्रेतयात्रेला गेलें पाहिजे असा सामान्य संप्रदाय आहे. निकडीचें काम असल्यास अर्ध्या वाटेवरून परत जातील परंतु आल्याशिवाय राहणार नाहीत. घरांतून निघतांना मयताचा नातेवाईक हातांत लाकूड घेऊन जातो. पुढे तें लाकूड चितेवर ठेवतात. मयताच्या मुलाने प्रेतापुढे



२८. (वर) चिडचीं झाडें  २९ (खाली) गंगेचे दंड.





२० सिंघोटी डोंगरावरून.



२१ श्री गंगोत्री मंदिर.

विस्तवाचें मडकें घेऊन चालण्याची वहिवाट आहे. शिबिकेंत प्रेत बसलेल्या स्थितींत ठेवतात. शिबिकावाहक दोन इसम असतात. प्रत्येक नातेवाईक आळीपाळीने खांदा देत असतो. मयताचे सर्व नवेजुने कपडे शिबिकेला बांधून आणतात. प्रेताला नवा पोषाख केलेला असतो. नदीवर प्रेताला स्नान घालतात तेव्हा सर्व आप्त प्रेतापुढे एक पैशापासून पांच रुपयांपर्यंत ठेवतात. हें द्रव्य ब्राह्मणास मिळतें.

शिबिका खुर्चीच्या आकाराची असते. तिला हात असतात व ती खाली दर्भांनी विणलेली असते. ही खुर्ची देवदारु वृक्षाच्या लाकडाची असावी लागते. प्रेत वस्त्रांनी शृंगारून वाजत गाजत आणतात. वाजविणारे नीचशूद्र (अस्पृश्य) जातींचे असतात. प्रेतावर जरीचीं मौल्यवान नवीन वस्त्रें घालतात. प्रेताच्या कपाळीं गंधाचा टिळा लावलेला असतो. मीं पाहिलेल्या प्रेताला विजार नेसवलेली होती. नदीच्या पात्रांत प्रेताला अग्नि दिला. घरून शिजवून आणलेल्या भाताचे पिंड मयताच्या आप्तांनी प्रेतावर दिले.


मनुष्य मेल्यावर घर सारवून घेतात. इकडल्याप्रमाणे मरणाच्या जागीं दिवा लावून ठेवण्याची वहिवाट नाही. प्रेतवाहक व इतर रात्रीं स्नान करून जेवतात.

---

# केदार-बदरीनारायण

नेहमीच्या रिवाजाप्रमाणे हायकोर्टाच्या कामासाठी औंधला गेलों असतां 'आम्ही केदार-बदरीनारायणाच्या यात्रेस जाण्याचा विचार केला आहे, तुम्हीं आमच्याबरोबर यावें' अशी गोष्ट श्रीमंत बाळासाहेब पंत यांनी काढली. त्यावेळीं मीं त्यांना कांहींच उत्तर दिलें नाहीं. तथापि यात्रेचे विचार मात्र मनांत सारखे घोळत राहिले. आपल्याला महायात्रा घडावी ही एका बाजूला मनाची आतुरता तर दुसऱ्या बाजूला ह्या महायात्रेचें पुण्य आपल्या पदरीं कसें पडणार ही भ्याड शंका. हिमालयाची यात्रा म्हणजे प्राणावरचें संकट हा प्रवाद. गंगेच्या पात्रांत प्रवाहरूपानें वाहणारें बर्फ; उभ्या चढावाचे पहाड आक्रांत करण्याचें दिव्य; तसेंच अंगाला बोचणारा हवेंतील गारठा ह्या कारणांनी आपण मध्येच आजारी पडलों तर अपुऱ्या यात्रेचा मनाला लागून राहणारा चटका आणि याहि-पेक्षा मोठी आपत्ति म्हणजे आपल्यापासून दुसऱ्यांस होणारा उपद्रव अशा या पेचांत सांपडून मनाचा निर्धार कांही केल्या होईना. श्रीमंतांबरोबर जाण्याचें ठर-विलें तरी आपली मंडळी आपल्याबरोबर असल्याविना जाणें बरें नाही एवढी गोष्ट मात्र मनांत निश्चित होती. यामुळे द्विवार यात्रा करून आलेले माझे यात्रोन्मुख बंधू चि. वासुदेवराव यांना आणि यात्रेकरूंना घेऊन जाण्याच्या सरावाने बनलेले यात्राविशारद व संवगड्यांचें हरएक काम करण्यास उत्सुकतेने सदैव तत्पर अस-णारे सालस कापरेकर यांना बरोबर घ्यावें, आणि असा योग जुळला तरच यात्रेला निघण्याचा विचार करावा असें मनानें घेतलें. सुदैवाने ह्या दोन्ही गोष्ठी साध्य झाल्या; आणि मग स्वतःच्या प्रकृतीबद्दलच काय ती शंका राहिली. परंतु ह्या शंकेपेक्षा हा यात्रेचा योग घालवूं नये ही उत्कट वासना बलवत्तर ठरून अखेरीस वैशाख वद्य दशमी शके १८६१ (१४ मे १९३९) ह्या दिवशीं आम्ही संध्याकाळीं पंजाब मेलने प्रस्थान केलें. माझ्या प्रकृतीबद्दल मी अत्यंत साशंक असल्यामुळे आपल्या आजाराने श्रीमंतांना अडचणींत पाडूं नये ह्या एकमेव उद्देशाने त्यांना न कळवितांच मी स्वतंत्रपणें यात्रेस निघालों.

प्रवासाचा पहिल्या दिवसाचा अनुभव फारसा प्रोत्साहक नव्हता. गाडीमध्ये झोप न आल्यामुळे झालेलें जागरण व डब्यांत १०८° च्या उष्णतेंत अंगाची लाही


बदरीकेदार
जमनोत्री
गंगोत्री
गंगा नदी
जमुना नदी
टेहरी
केदारनाथ
गौरीकुंड
रामपुर
नारायणकोटी
गुप्तकाशी
मेल
उखीमठ
ननियाकुंड
मंडल
मेरी
चंद्रपुरी
अगस्तिमुनि
छतोली
गोपेश्वर
बदरीनाथ
हनुमानचट्टी
पांडुकेश्वर
कुमारचट्टी
गुलाबकोटी
गरुडगंगा
सियासैण
मैठाणचट्टी
कर्णप्रयाग
चटवापिपल
रुद्रप्रयाग
गुलाबराय
सुकर्ता
श्रीनगर
भट्टीसेरा
बिल्वकेदार
राणीबाग
देवप्रयाग
नरेंद्रनगर
ऋषिकेश
लक्ष्मणझूला
हरिद्वार
ग ढ वा ल
यात्रामार्ग
नदी
लोहमार्ग

होत असतांना झालेला प्रवास अशा स्थितींत दिल्ली स्टेशनवर आम्ही उतरलों. १६ तारखेस दिवसभर आमचा मुक्काम दिल्लीस झाल्यामुळे असेंब्ली हॉल, सेक्रेटरीएट, व्हाइसरॉयाचा बंगला, कॅनॉट स्ट्रीट, बुद्धविहार, बिर्लांनी बांधलेलें लक्ष्मीनारायणाचें देवालय वगैरे प्रेक्षणीय स्थळें आम्हांस बघतां आलीं.

रात्रीं दिल्ली सोडून सकाळीं हरिद्वारला येऊन पोचलों. गेली रात्र मला जागरणांतच काढावी लागली. बुधवारीं दुपारींच हरिद्वारहून निघून ४॥ च्या सुमारास ऋषिकेश येथें येऊन मुक्काम केला. दुसरे दिवशीं सकाळीं लक्ष्मणझुला व स्वर्गाश्रम हीं पाहून आलों. लक्ष्मणाचें देऊळ झुल्याच्या अलीकडेच आहे. शत्रुघ्नाचें देऊळ मुनीकारेति येथे आहे.

लक्ष्मण-शत्रुघ्नाचीं देवळें क्वचितच आढळतात. देवळांवर देखरेख करण्याकरिता प्रत्येक प्रांतिक सरकारचें स्वतंत्र खातें निर्माण केल्यास उपयुक्त होईल असें वाटतें. स्वतंत्र मोटार करून ऋषिकेशहून आम्ही देवप्रयागला गुरुवारीं संध्याकाळीं ७ वाजतां येऊन पोचलों. मोटारचें भाडें ३० रु. पडलें. ह्या गाड्यांची वाहतूक टेहरी संस्थानच्याच नियंत्रणाखाली असून भाडेंहि संस्थानकडूनच ठरविलेलें आहे. माणशीं १॥ रु. कर मोटारवाल्यास संस्थानला द्यावा लागतो. ऋषिकेशाहून देवप्रयागला जाण्यास आम्हांस चार तास लागले. देवप्रयाग हा मोठा गांव आहे. दंडी व कुली ठरविण्याकरिता देवप्रयागास एक दिवस मुक्काम करावा लागला. हिमालयांतील वाऱ्यापावसाचा अनुभव आम्हांस प्रथम येथेच मिळाला. तिसऱ्या प्रहरापासून भयंकर वादळ सुरू झालें. वारा सोसाट्याचा वाहत होता. विजा सारख्या चमकत होत्या. आणि जिकडे तिकडे धूळ उडत होती. अननुभवी माणसाला हा सर्व देखावा भयानक वाटल्यास आश्चर्य नाही परंतु कोणाचें यत्किंचितहि नुकसान झालेलें आढळलें नाही. गांवांतील सरावलेले लोक या वादळांतहि नदीवरील हलत्या पुलावरून ये जा करीत होते. हरिद्वार येथे चित्रकार रा. ब. अत्रे आम्हांस भेटून आमच्या कंपूंत सामील झाले. त्यांच्या कॅमेऱ्याचा आम्हांस चांगलाच उपयोग झाला.

देवप्रयागपासून पायीं प्रवासाला प्रारंभ झाला[1]. माझ्याकरिता केदार-बदरीनारायणला जाऊन येण्याच्या बोलीने ११६ रुपयांस दंडी ठरविण्यांत आली. ह्यानंतर आम्हीं खाली दिलेल्या चट्टयांवर दुपारीं भोजनाकरिता व रात्रीं निजण्याकरिता मुक्काम केले.

१ आता श्रीनगरपर्यंत मोटार जाते.

| वार व तारीख | चट्टी | निघालों | पोचलों | चट्टी | अंतर मैल |
|---|---|---|---|---|---|
| × शनिवार २०।५ | देवप्रयाग | स. ४।।। | स. ७।।। | राणीबाग[१] | ८।। |
| | राणीबाग | दु. ३।।। | सं. ७।।। | बिल्वकेदार[२] | ७।। |
| × रविवार २१।५ | बिल्वकेदार | स. ६ | स. ७। | श्रीनगर[३] | ३ |
| | श्रीनगर | दु. ४ | सं. ६ | सुकर्ता(शुकाश्रम[४]) | ५ |
| × सोमवार २२।५ | सुकर्ता | स. ४ | स. ६ | मट्टीसार | ४ |
| | मट्टीसार | स. ६ | स.१०।। | पांचभाईकाधार[५] | ६ |
| | भाईकाधार | दु. ३।। | दु. ४। | गुलाबराय | ३ |
| | गुलाबराय | सं. ४।।। | सं. ५।। | रुद्रप्रयाग[६] | २।। |
| मंगळवार २३।५ | रुद्रप्रयाग | स. ४।। | स. ६।। | छातोली | ४।। |
| | छातोली | स. ६।। | स. १०। | अगस्तिमुनी | |
| | अगस्तिमुनि | दु. ४। | सं. ६ | चंद्रपुरी[७] | ४ |
| बुधवार २४।५ | चंद्रपुरी | स. ४।।। | स. ६ | भेरी | ३।। |
| | भेरी | स. ६ | स.१० | गुप्तकाशी | |
| | गुप्तकाशी | दु. ३।। | सं. ५।। | नारायणकोट (व्योम) | |
| गुरुवार २५।५ | नारायणकोट | स. ४।।। | स. ९।। | रामपूर[८] | |
| | रामपूर | दु. ३।। | सं. ६ | गौरीकुंड[९] | ६ |
| शुक्रवार २६।५ | गौरीकुंड | स. ५ | स. १०।। | केदार[११] | ७ |
| शनिवार २७।५ | केदार | स. ६।। | स. ९। | गौरीकुंड | |
| | गौरीकुंड | दु. ३।। | सं. ५।। | रामपूर | |
| रविवार २८।५ | रामपूर | स. ५ | स. १० | भेत | |
| | भेत | दु. ३।। | सं. ५।। | उखीमठ[१२] | |
| सोमवार २९।५ | उखीमठ | स. ५।। | स. ११।। | बणीयाकुंड[१३] | ११ |
| मंगळवार ३०।५ | बणीयाकुंड | स. ५ | स. १० | मंडल[१४] | |
| | मंडल | दु. ३। | सं. ६।। | गोपेश्वर[१५] | |
| बुधवार ३१।५ | गोपेश्वर | स. ४।।। | स. ९ | सियासैण | ९ |
| | सियासैण | दु. ३। | सं. ६ | गरुडगंगा[१६] | ७ |
| गुरुवार १।६ | गरुडगंगा | स. ४।।। | स. ९।।। | कुमारचट्टी[१७] | ८ |
| | कुमारचट्टी | दु. ३। | सं. ६ | जोशीमठ[१८] | |

| वार व तारीख | चट्टी | निघालों | पोचलों | चट्टी | अंतर मैल |
|---|---|---|---|---|---|
| शुक्रवार २।६ | जोशीमठ | स. ४॥ | स. ९ | पांडुकेश्वर[१९] | ८ |
| शुक्रवार २।६ | पांडुकेश्वर | दु. ३॥ | सं. ६॥ | हनुमान | |
| शनिवार ३।६ | हनुमान | स. ५॥। | स. ८॥ | बद्री[२०] | |
| रविवार ४।६ | बद्री | स. ६ | स. १०॥। | पांडुकेश्वर | |
| | पांडुकेश्वर | दु. ३। | सं. ५॥ | बलदौडा | |
| × सोमवार ५।६ | बलदौडा | स. ५। | स. १०॥ | कुमारचट्टी | |
| | कुमारचट्टी | दु. २॥ | दु. ३॥ | गुलाबकोटी[२१] | |
| मंगळवार ६।६ | गुलाबकोटी | स. ४॥ | स. ७॥। | गरुडगंगा | |
| | गरुडगंगा | दु. ३ | दु. ४॥ | सियासैण | |
| × बुधवार ७।६ | सियासैण | स. ४। | स. ९॥। | मैठाणचट्टी[२२] | |
| | मैठाणचट्टी | दु. २॥ | दु. ५ | सोनलाचट्टी[२३] | |
| × गुरुवार ८।६ | सोनलाचट्टी | स. ५ | स. १० | कर्णप्रयाग | |
| | कर्णप्रयाग | दु. ३ | सं. ५ | चटवापिपल[२४] | |
| शुक्रवार ९।६ | चटवापिपल | स. ५ | दु. १२॥ | रुद्रप्रयाग | |
| शनिवार १०।६ | रुद्रप्रयाग | स. ५ | स. १०। | भट्टीसेर | |
| | भट्टीसेर | दु. ३॥ | सं. ५ | सुकर्ता | |
| रविवार ११।६ | सुकर्ता | स. ४॥। | स. १०॥ | रामपूर | |
| | रामपूर | दु. ४। | सं. ५। | राणीबाग | |
| सोमवार १२।६ | राणीबाग | स. ४। | स. ७। | देवप्रयाग | |
| मंगळवार १३।६ | देवप्रयाग | स. ६॥ | स. १०॥ | हरिद्वार | |

× ह्या दिवशीं पाऊस पडला.

१. राणीबागेहून बिल्वकेदारला जातांना मार्गांत पावसानें अडविल्यामुळे एका शेतकऱ्याच्या काळोख असलेल्या लहानशा गोठ्यांत दंडीवाल्यांसह आम्हीं आठजण एक तास बसून काढला. मधून मधून हातांतील बॅटरीचा प्रकाशासाठीं उपयोग करीत होतों.

२. आम्हीं पावसाला कशीबशी झुकांडी दिली परंतु ओझ्याच्या भाराखालीं नमलेले बिचारे बोजेवाले पावसाला कसे चकविणार? ते आमच्या मुक्कामावर वेळेवर येऊं शकले नाहींत. त्यामुळें बिल्वकेदार येथें सर्व रात्र अंथरुणपांघरुणा-

वांचून काढावी लागली. कुली सकाळीं ६ वाजतां आले. त्यामुळे बोजे न सोडतां आम्ही पुढे निघालों. बिल्वकेदारहून दिसणाऱ्या एका डोंगरावर चंद्रवदनी नांवाच्या देवीचें मंदीर आहे. तसेंच समोरच्या नीलकंठनामक डोंगरावर अर्जुनानें तपश्चर्या केली म्हणतात.

३. श्रीनगर अलकनंदा नदीवर तिच्या डाव्या तीरावर समुद्रसपाटीपासून सुमारें दीड हजार फूट उंचीवर वसलेलें आहे. ही पूर्वी गढवाली चंद्रवंशी राजांची राजधानी होती. येथील इमारती मजल्याच्या असून बाजार मोठा आहे. देशी विलायती बऱ्याच वस्तु येथे मिळूं शकतात. येथे अनेक देवांचीं देवळें आहेत.

४. येथपासून हवामान बदललें. थंडी भासूं लागली.

५. ही चट्टीची जागा उंचावर असल्यामुळे अत्यंत रमणीय आहे. येथे पाणी मुबलक नाही पण पुरेसें आहे. चट्टीचा मालक मयाराम गंगाराम हा मोठा हुशार व मनमिळाऊ स्वभावाचा दिसला. येथे आम्हांस एका पहाडी स्त्रीचा नाच पाहावयास मिळाला. ही डोंब जातीची असूनसुद्धा गौरवर्णाची होती. तिचा नवरा ढोलकें वाजवीत होता व गाणें म्हणत होता. बायको नाचत होती. ह्या बाईचा नाच पुष्कळांना प्रेक्षणीय वाटला. हिचें नांव छटांगी. वाटेंत आम्हांस रेवती–रमण नांवाचे जयपुरी गृहस्थ भेटले. हे आपल्या बायको-बहिणीसह चारी धामें करावयास निघाले होते. बरोबर अंगावरचें एक लहान मूल होतें. एक मारवाडी ब्राह्मण स्वयंपाकाकरिता बरोबर घेतला होता. त्यांचे वडील सूर्यनारायण. हे जयपूर कॉलेजांत संस्कृतचे प्रोफेसर आहेत. हे यजुर्वेदी माध्यंदिन कौशिक गोत्री ब्राह्मण. अंगावरचें लहान मूल संभाळून त्यांनी चारी धामें पायीं प्रवास करून केलीं. कांही काळ ते व आम्ही वाटसोबती होतों.

६. अलकनंदा व मंदाकिनी ह्यांच्या संगमावर. येथून केदारचा रस्ता फुटतो. मंदाकिनीच्या कडेनें रस्ता असून येथून केदार ४८ मैल आहे. रस्ता थोडासा अरुंद आहे.

७. चुनेगची माडीचीं घरें असून दुकानेंहि बरीं दिसलीं. सभोंवतालच्या शेतांतून तंबाखू काढण्याचें काम चाललें होतें.

८. गांव वस्तीचा दिसला. आम्हांस उतरण्यास बंगलीवजा घर मिळालें होतें. येथे पंड्याच्या वह्या असल्यामुळे पूर्वी पुण्याचे चापेकर येथे येऊन गेल्याचें समजलें. येथे विश्वेश्वराचें देऊळ बवग्यासारखें आहे. मात्र देवळांत अस्वच्छता

आढळली. पुराणामध्ये गुप्त वाराणसी ह्या नांवानें हें स्थळ प्रसिद्ध आहे. येथे एका देवळांत पांच पांडवांच्या मूर्ति बघण्यांत आल्या.

९. फाट्यापासून रामपूरपर्यंत दाट झाडीचें जंगल असून रस्ता अरुंद आहे; चढहि मोठा लागला.

१०. येथे येतांना ३॥ मैलांचा चढ लागला. ह्याहि रस्ता अरुंदच आहे. येथे ऊन पाण्याचें कुंड आहे.

११. गौरीकुंडाहून केदारपर्यंत ७ मैलांची सर्व चढण आहे. वाटेंत तीन ठिकाणीं बर्फाच्या दगडांवरून चालावें लागतें. केदार हें एक रूक्ष खेडें आहे. बर्फाच्छादित शिखरांच्या डोंगरांशिवाय येथे कांही पाहण्यासारखें नाही. झाडेंझुडपेंहि उगवत नाहीत. येथील थंडीमुळे खोकल्या-पडश्याने मला बराच त्रास दिला. परंतु नक्स्वामिका गोळ्या घेतल्याने पुष्कळ बरें वाटलें. केशर व कस्तुरी घातलेलें दूध थंडीचा विकार मोडण्यास चांगलें उपयोगी पडतें असा अनुभव आला. उपोषणामुळे पोटांत कांही अन्न गेलें नव्हतें; तरी सुद्धा केवळ थंड हवेने पोटांत वात धरतो असें अनुभवास आलें.

१२. श्रीकृष्णाचा मुलगा अनिरुद्ध ह्याच्याबरोबर बाणासुराची मुलगी उषा हिचें येथे लग्न झालें. त्यावरून या गांवास उषा– उखा– उखीमठ असें नांव पडलें. येथे उषा व अनिरुद्ध त्याचप्रमाणे मांधाता ह्यांच्या मूर्ति एका पडवींत उपेक्षितावस्थेंत असलेल्या दिसल्या. उषेपेक्षा ओंकारनाथ नामक शिवलिंगाचें येथे विशेष प्रस्थ असलेलें दिसलें. देऊळ मोठें दगडी असून देवाची पूजाअर्चाहि मोठ्या थाटाने होत असते. येथे सरकारी दवाखाना असल्यामुळे मीं डॉक्टरची ओळख करून घेऊन तेथे रात्रीं निजण्याची सोय करून घेतली. डॉक्टर शिखधर्माचे असून एकटेच असल्यामुळे त्यांनी आपल्या राहत्या घरांत मला निजावयास जागा दिली. डांस व माशा ह्यांचा उपद्रव टाळण्याकरिता जाळीचे दरवाजे व खिडक्या असलेल्या एका स्वतंत्र खोलींत पलंगावर स्वच्छ चादर घातलेल्या गादीवर मला आज निजावयास मिळालें. डॉक्टरने स्वतः मला ग्लिसरीनचा एनिमा दिला. नंतर झोपेचें औषध घेऊन मी निजलों. त्यामुळे उत्तम झोंप लागली.

१३. सर्व रस्ता वृक्षाच्छादित चढणीचा. चढण अितकी मोटी होती की, मी दंडींतून ११॥ वाजतां येऊन पोचलों; परंतु चालणारी मंडळी २॥ च्या अगोदर येऊन पोंचली नाही.

१४. येथे उतरण्यास उत्तम धर्मशाळा मिळाली. दोन डोंगरांमध्ये सपाटीवर एका वाहत्या ओढ्याकांठीं उतरण्याची सोय असल्यामुळे सर्व देखावा अत्यंत रमणीय होता. चट्टीवाल्याने कोबीची भाजी लावली होती. त्यामुळे आम्हांस ताजी भाजी मिळूं शकली.

१५. हा गांव डोंगरमाथ्यावर वसला आहे. गोपेश्वर नांवाचें महादेवाचें मोठें देवालय आहे. देवळाचें पटांगण फरशीचें असून विस्तीर्ण आहे. रावळाने देवळांत आमची सोय केल्यामुळे आमचा तेथील मुक्काम बराच सुखाचा झाला. द्वादशीच्या धवलचंद्रप्रकाशांत फरशीवर बसून दुग्धपान करतांना कोजागरीचें स्मरण झालें. येथें सपाटी मोठी असल्यामुळे शेती बरीच आहे. वैतरणी नांवाचें येथे एक कुंड असून त्यांतील पाणी उत्तम आहे. देवळांत एक अष्टधातूचा त्रिशूळ दिसला. ह्याच ठिकाणीं महादेवाच्या कोपाने कामदेव भस्म होऊन पडल्याची कथा पुराणान्तरीं आहे.

१६. येथे सायंकाळीं कुंडावर बंगाली प्रवासी स्त्रिया संध्यावंदन व जप करीत असलेल्या आढळल्या.

१७. गरुडगंगेहून ह्या चट्टीवर येतांना वाटेंत कडा तुटला असल्यामुळे एक मैलभर रस्ता अतिशय धोक्याचा वाटतो. 'धोका आहे' अशी सरकारी पाटी लावलेली आहे. पण नुसती पाटी संरक्षण काय करणार?

१८. जोशीमठ हा बाजारपेठेचा गांव असून येथे बारा महिने पोस्ट ऑफिस असतें. पोस्टाचें उत्पन्न दरमहा सवाशें रुपयांचें असल्याचें समजलें. पद्मदत्त जीवानंद ह्या नांवाचे ब्राह्मण गृहस्थ पोस्टमास्तर होते. जोशी हें त्यांच्या जातीचें नांव. आपण द्राविडी ब्राह्मण असल्याचें त्यांनी सांगितलें. हे यजुर्वेदी माध्यंदिन-शाखेचे असून त्यांचें गोत्र भारद्वाज होतें. ह्यावरून ते उत्तरहिंदुस्थानांतीलच असावे असें वाटतें. ह्यांनी जरी यजुर्वेदी असल्याचें मला सांगितलें तरी 'आमची संहिता कोणती तें मला माहीत नाहीं' व प्रवर विचारतां तेंहि माहीत नसल्याचें सांगितलें. ह्यांची संध्या म्हणजे नुसता गायत्री मंत्र. त्यामुळे संध्येंत वेदाचा अगर गोत्राचा उच्चार होत नाहीं. जोशीमठाचा आणि बदरीकेदारचा रावळ एकच. जोशीमठापासून अर्ध्या मैलावर ज्योतिर्मठ नांवाचें स्थान आहे. देऊळ शंकराचें आहे. स्मार्त व वैष्णव हा भेद कोणी मानीत नसल्याचें येथे समजलें. वैष्णव ही एक ब्राह्मणाची जात आहे असें म्हणतात. मूळचे रजपूत असन सांप्रत ब्राह्मणांत




३२ मार्गावर.



३३ पहाड आणि पटार.



३४ (वर) श्री केदारनाथ मंदिर.    ३५ (खाली) हिमाच्छादित गिरिशिखर.



समाविष्ट झालेल्या कांही जाती आहेत. अशांपैकीच वैष्णवजातीचे लोक होत असा आरोप आहे. आद्यशंकराचार्यांनी येथे मठस्थापना केल्याची आख्यायिका आहे. बदरीनाथाला बर्फ पडतें तेव्हा तेथील रावळ येथे येऊन राहतो. येथे नरसिंहाचें मंदिर प्रसिद्ध आहे. त्याशिवाय वासुदेव व दुर्गादेवी ह्यांचींहि देवळें आहेत. हा गांव साडेपांच हजार फूट उंचीवर आहे.

१९. पांडूराजाने येथे जप केल्यामुळे ह्याला पांडुकेश्वर नांव पडलें. देवळांत विष्णूची मूर्ति असून शेजारींच वासुदेवाची मूर्ति आहे. देवळांत ताम्रपट असलेले आम्हांस दाखविण्यांत आले; परंतु लिपि ओळखतां न आल्यामुळे त्यांतील आशय समजला नाही.

२०. येथे ज्येष्ठ वा।। २ ही माझ्या वडिलांची श्राद्धतिथि असल्यामुळे बदरीनारायणाला श्राद्ध करण्याचा अनायासें योग आला.

२१. गांवाचें नांव गुलाबकोटी. रामप्रसाद गंगाराम नांवाच्या वैष्णव ब्राह्मणाच्या चट्टींत आम्ही उतरलों. ह्याचें गोत्र अच्युत; यजुर्वेदी म्हणून सांगितलें. पण त्याला शाखा सांगतां येईना. सायंकाळीं आम्ही गुलाबकोटी पाहण्यास गेलों. गांवांत लक्ष्मीनारायण, शंकर ह्या देवांचीं देवळें आहेत. एका मंदिरांत शिलालेख आढळला. अंधारामुळे स्पष्ट वाचतां आला नाही तथापि नेपाळच्या राजाने हें देऊळ बांधून दिलें असा कांही मजकूर त्यांत असावा असें वाटतें. येथें ब्राह्मणांचीच वस्ती असलेली दिसली. गांव म्हणजे एक चाळीसारखी सलग इमारत, आणि चाळींत खोल्या असतात त्याप्रमाणे ह्या इमारतींत प्रत्येकाचें एक स्वतंत्र घर, खाली गोठा, वर ओटी आणि ओटीच्या पलीकडे राहण्याच्या खोल्या. विटांचा उपयोग कोठेच केलेला नव्हता. भिंती दगडाच्या असून घरावर दगडाचे पातळ पत्रे होते. चाळींतील खोल्यांना खिडक्यांची उणीव असते तोच प्रकार येथे आढळला. घराचे खांब मात्र सुरूचे नक्षीदार होते.

२२. आम्ही उतरलों होतों त्या चट्टीची मालकीण नंदादेवी नांवाची ब्राह्मण स्त्री होती. हिचा नवरा होता पण तो आजारी असल्याने गांवांतील घरांत असे. ही सवाशीण होती. परंतु हिच्या कपाळाला कुंकू नव्हतें. तिला विचारलें असतां शेतांत काम करीत असतांना गेलें म्हणाली. तिच्या गळ्यांत सरीसारखी चांदीची हंसळी होती. कुणबी स्त्रियांच्या हातांतील वाळ्यांप्रमाणे तिच्या हातांत पोची होती. बांगड्या हातांत नव्हत्या. नाकाच्या डाव्या पाळींत मात्र एक भलें मोठें सोन्याचें

वळें होतें; त्यालाच ती नथ म्हणे. नवऱ्याचें नांव आम्ही घेत नाहीं असें म्हणाली. ती आपल्या नवऱ्याची दुसरी बायको असून तिच्यासाठीं ७०० रु. द्यावे लागले होते. पहिल्या बायकोला १००० रु. पडले होते असें ह्या देवीनें आम्हांस सांगितलें. हिचा बाप पुरोहित जातीचा असून नवरा सरोला जातीचा होता. ह्या दोन्ही जातींमध्ये रोटीव्यवहार होत नाहीं. सरोला जात श्रेष्ठ असल्यामुळे हा अनुलोमविवाह समजला पाहिजे. अर्थात् ह्या बायकोच्या हातचें शिजविलेलें अन्न तिच्या नवऱ्यास चालत नाही. नंदीदेवी आपल्या नवऱ्याला पति व दिराला देवर म्हणते.

२३. कर्णप्रयागाहून येत असतां वाटेंत पावसाने गांठल्यामुळे डोंगराच्या गुहेंत रा. ब. अत्रे व मी तिसरे प्रहरीं ४ ते ५ पर्यंत पाऊस कमी होण्याची वाट पाहात बसून राहिलों. ह्या चट्टीवर एक पाठशाळा आहे. शाळेला सुट्टी असल्यामुळे अभ्यास पाहावयास सांपडला नाही. परंतु पाठशाळेचे मालक पं. शालिग्राम वैष्णव ह्यांची भेट झाली. 'शांतिसदन' हें ह्या मकाणाचें नांव. शालिग्रामांनी एक हजार रुपयांचा ट्रस्ट करून आपल्या एकुलत्या एक मृतमुलाच्या नांवाने संस्कृत पाठशाळा चालविली आहे. हे गृहस्थ पूर्वी तहसीलदार होते. ह्यांना इंग्रजी विशेष येत नाही. ह्यांनी 'उत्तरखंडरहस्य' हें पुस्तक लिहिलें आहे. हें पुस्तक तसेंच त्यांच्या दिवंगत मुलाचें चरित्र अशीं दोन पुस्तकें त्यांनी मला दिलीं. ह्यांच्यापासून बरीच माहिती मला मिळाली.

२४. ह्या चट्टीवर येतांना वाटेंत नंदप्रयाग लागलें. येथे पोस्ट ऑफिस असल्यामुळे पाठीमागून चालत येणाऱ्यांची वाट पाहत पोस्टांतच मास्तरजवळ बोलत बसलों. ह्या गृहस्थांकडूनहि मला बरीच माहिती मिळाली. पोस्टांत टेलिफोनची सोय होती. चार वाजतां मी पोस्टांत असल्यामुळे टेलिफोनवरून चमोलीच्या पोस्टांत नक्की किती वाजले तें विचारलें. त्यावरून माझें घड्याळ १५ मिनिटें पुढे असल्याचें समजलें.

## परिशिष्ट १ लें

# देवस्थानें

### बदरीनारायण

बदरीनाथपुरी हें गांवाचें नांव. नरनारायण-पर्वतांच्यामध्ये अलकनंदेच्या दोन्ही तटांवर बदरीनाथपुरी गांव वसलेला आहे. हरिद्वारापासून १८३ मैल अन्तरा-

वर बदरीनाथ देवस्थान आहे. येथे थंडी फार. जूनच्या ३ तारखेस दिवसा पावणेअकरा वाजतां पारा ६० अंशांवर खोलींत होता. हेमंत ऋतूंत सर्व गांव १०-१५ फूट उंचीच्या बर्फांत पुरल्यासारखा असतो, त्यामुळे मार्गशीर्ष ते वैशाख-पर्यंत ह्या ठिकाणीं चिटपाखरूंहि राहत नाहीं. पुराणांतील गन्धमादन पर्वत बदरी-नाथाजवळच आहे. ह्या क्षेत्रीं व्यासांनी चार वेद केले व भागवत रचलें अशी लौकिक समजूत आहे. बदरीनाथ गांवाचें विशालपुरी असें दुसरें नांव आहे.

श्रीबदरीनारायणाची मूर्ति ध्यानस्थ व कमलासनस्थ आहे. बदरीनाथाच्या देवालयांत वस्तुतः मुख्य देवाचीच मूर्ति असावी, पण ह्या ठिकाणीं मुख्य देवा-च्या उजव्या बाजूस कुबेर व डाव्या बाजूस नरनारायण ह्यांच्या मूर्ती आहेत. कुबेराच्या खाली उद्धवाची मूर्ति दिसते. हा अनुभव हिमालयांत सर्वत्र येतो. देवळें कमी व देव पुष्कळ, ह्या कारणास्तव असा प्रकार झाला असावा. पुजा-ऱ्यांना मूर्तींची ओळख नसते, त्यामुळे यात्रेकरूंस ते वारंवार चकवतात. देवळांत मूर्तींचें वर्णन लिहिलेल्या पाट्या लावून ठेवण्याची बुद्धि अधिकारी-वर्गाला होत नाहीं. उदाहरणार्थ, बदरीनारायणाची मूर्ति ही खरोखर बुद्धाची होती; शंकरा-चार्यांनी बुद्धाला नारायण बनवला, अशीहि आख्यायिका आहे. तसेंच जैन लोक पारसनाथाची अथवा ऋषभदेवाची ही मूर्ति आहे असें समजतात, आणि बुद्ध, पारसनाथ व विष्णु सर्व एकच आहेत असें म्हणून भोळा भाव असणारे यात्रेकरू आपलें समाधान करून घेतात.

बदरीनाथाचें सध्याचें देऊळ रामानुजसंप्रदायी स्वामी वरदराज ह्यांच्या प्रेरणेने गढवालच्या राजाने संवत् १५ व्या शतकांत बांधलें अशी दंतकथा आहे. शैव जे शंकराचार्य त्यांनी केदारनाथाचें व वैष्णव जे रामानुज त्यांनी बदरी-नारायणाचें देऊळ बांधलें व बांधविलें अशी दंतकथा निर्माण होणें साहजिक आहे. असो. हें देऊळ बांधण्याच्या पूर्वी बदरीनाथाची मूर्ति गरुडकोटी नामक शिलेजवळ होती व तिची स्थापना रामानुजाचार्यांनी केली असें म्हणतात. नारद-कुंडावर असलेली मूर्ति शंकरचार्यांनी तेथून उचलून हल्लीच्या ठिकाणीं स्थापिली असें म्हणतात. मंदिरावरचा सोन्याचा कळस अहल्याबाईने चढवला आहे.

एका गृहस्थाकडून मला आणखी असें समजलें की, थोलिंग मठाला नारायणाचें देऊळ आहे, तें मूलस्थान होय. नेपाळी व चिनी लोक त्या देवाला अजून भजतात. तेथे देवाला बकऱ्यांचा बळी अजून दिला जातो.

बदरीनाथाचा रावळ नंबुद्री ब्राह्मण असतो. त्याची नेमणूक टेहरीच्या महाराजांकडून होते. हे महाराज त्रावणकोरच्या महाराजांना ब्राह्मणाची निवड करण्यास लिहितात. त्यांनी पसंत केलेला ब्राह्मण टेहरीला आल्यावर तेथे दरबारांत महाराज टिळा लावतात; तेव्हा तो रावळ बनतो. रावळ ब्रह्मचारी असला पाहिजे असा संस्थानचा निर्बंध आहे. सध्याच्या रावळाने हा निर्बंध मोडला आहे. त्याला अधिकारच्युत करण्याचे प्रयत्न चालू आहेत असें समजतें. हातांत सलकडीं घालून मश्रूच्या गादीवर बसणारे हे रावळसाहेब यात्रेकरूंच्या सोयीकडे अत्यंत दुर्लक्ष करतात. विद्युत्प्रकाशाची योजना झाली असती तर मूर्तीचें दर्शन पोटभर घेतां आलें असतें. गरीब व अज्ञ यात्रेकरूंस आपल्या सामर्थ्याची जाणीव नाही, त्यामुळे ह्या गब्बर पुजाऱ्यांचें चांगलेंच फावतें.

बदरीनाथ येथे दररोज ४०० ते ५०० पर्यंत नवीन यात्रेकरू येतात. तेथे पोस्ट ऑफिस सहा महिने असतें; मासिक उत्पन्न दोन हजारांचें आहे. बदरीनाथाचे परिचारक माच्छीं व दुरियाल ह्या दोन जातींचे असतात.

## केदार

केदार हें बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक आहे हें पुढील श्लोकावरून दिसून येईल—

> सौराष्ट्रे **सोमनाथं** च श्रीशैले **मल्लिकार्जुनम्** ।
> उज्जयिन्यां **महाकालमोंकारम**मलेश्वरे ।
> परल्यां **वैद्यनाथं** च डाकिन्यां **भीमशंकरम्** ।
> सेतुबन्धे तु **रामेशं नागेशं** दारुकावने ।
> वाराणस्यां च **विश्वेशं त्र्यम्बकं** गौतमीतटे ।
> हिमालये तु **केदारं घुसृणेशं** शिवालये ।

केदार ह्या शब्दाचा अर्थ संस्कृतमध्ये दलदल असा होतो. डोंगरावरचें बर्फाचें व पावसाचें पाणी सतत वाहत असल्याकारणाने केदार गांवच्या आसपास सर्वत्र दलदल आहे.

केदारेश्वराचें लिंग नाही. तो एक त्रिकोणाकृति जवळ जवळ रेड्याच्या आकाराचा दगड आहे. तो चार हात लांब व दीड हात गोल आहे.

हल्लीचें देऊळ आद्य शंकराचार्यांनी बांधलें अशी दंतकथा आहे, व येथेच त्यांचें देहावसान झालें असें म्हणतात; परंतु ही नुसती दंतकथाच असावी.

केदारनाथाचा पुजारी दक्षिणेकडील लिंगायत असतो. पुजाऱ्याला तिकडे रावळ म्हणण्याची चाल आहे. रावळाचे चेले असतात. मुख्य रावळाची गादी उखीमठास आहे. गुप्तकाशी, मध्यमेश्वर व खुद्द केदार येथे रावळाचा एकेक चेला असतो असें उत्तराखंडरहस्यांत पंडित शालिग्राम वैष्णव म्हणतात; परंतु स्वतः मुख्य रावळाने मला सांगितलें की, केदारनाथगादीच्या अमलाखाली मध्यमेश्वर व तुंगनाथ येतात. ह्या चेल्यांपैकी एक पुढे मुख्य रावळ होतो. नीलकंठ जंगम हें विद्यमान रावळाचें नांव. हे हुबळीधारवाडाकडील असल्यामुळे ह्यांस मराठी चांगलें बोलतां येतें. त्यांनी तोंडी सांगितलेल्या माहितीप्रमाणे ह्या गादीला १४५ गांव इनाम आहेत. नक्त नेमणूक नाही. इनामतीचें निव्वळ उत्पन्न ५००० रु० व यात्रेचें सुमारें ८००० रु०, एकूण १३००० रु० चें वार्षिक उत्पन्न ह्या देवस्थानाचें आहे. ह्याहीपेक्षा तें जास्त असलें पाहिजे; कारण रावळांनी सांगितलेला खर्चच १३००० रुपयांहून अधिक आहे. खर्च येणेप्रमाणे—

रु० ४००० कोठी, रु० ५५०० नोकरांचा पगार, रु० १५०० संस्कृत पाठशाळा, १२०० रु० धर्मार्थ औषधालय व १००० रु० इमारतींची दुरुस्ती. ह्याशिवाय कर्जफेडींत टेहरी संस्थान दरसाल ३००० रु० घेतें.

गढवाल नरेश, नेपाळ सरकार, ब्रिटिश सरकार व अन्य राजे ह्यांच्याकडून इनाम गांव मिळालेले आहेत.

नीलकंठ रावळांनी सांगितलें की, एक जुनी सनद आहे, तिची भाषा समजत नाही; ती शक ६१ ची असावी. दुसरी सनद संवत् १२२१ ची असून, दीपचंद राजा कूर्मांचल ह्याच्या नांवाची आहे. मला सनदा पाहावयास मिळाल्या नाहीत.

यात्रेकरूंनी केदार गांवांत भोजन करणें निषिद्ध मानलें आहे. अलीकडे हा निषेध पुष्कळांना माहीतच नाही.

केदारनाथ व पशुपतेश्वर मिळून संपूर्ण देव होतो असें म्हणतात. येथे धड व तेथे मुंडकें.

कार्तिकी पूर्णिमेनंतर केदारनाथाची चलमूर्ति उखीमठाला पंडे लोक नेतात. तेथे तिची सहा महिने पूजा होते. केदारचे लोक हे बाणासुराचे वंशज असल्याची समजूत आहे.

## केदारचे पंडे

केदारच्या पंड्यांची जात अभ्यसनीय आहे. ह्या पंड्यांनी कांही ब्राह्मणांवर

बेअब्रूच्या गुन्ह्याबद्दल फौजदारींत फिर्याद केली होती; म्हणून चमोलीच्या मॅजिस्ट्रेटांच्या ठरावांत ह्या पंड्या जातीविषयी बरीच विश्वसनीय माहिती आपणांस उपलब्ध होते. ह्या खटल्यांतील पुराव्यावरून ज्या गोष्टी निष्पन्न होतात त्या येणेंप्रमाणे—

केदारचे पंडे ही एक स्वतंत्र जात बनली आहे. यात्रा नेणें हें ह्यांचें काम. हे मूळचे खासी जातीचे होत असें संशोधकांचें म्हणणें आहे. खासी म्हणजे खास त्या भूमीचे. खासी लोक ह्यांचा मूळचा हा प्रदेश. ते तेथील राज्यकर्ते होते. पुढे खालून ब्राह्मण व क्षत्रिय जाऊन त्यांनी खासी लोकांना त्यांच्या उच्च स्थानावरून हुसकावलें आणि खासी लोक जवळ जवळ शूद्र बनले. कालांतराने हेच खासी लोक आपणांस रजपूत म्हणूं लागले व त्यांनी जानवें घालण्यास प्रारंभ केला.

केदारचे पंडे ब्राह्मण हे खास रजपूत स्त्रियांबरोबर लग्नें लावतात. केदारचे पंडे म्हणजे खास ब्राह्मण होत. हे ब्राह्मण रजपूत स्त्रियांना लग्नाच्या बायका करून घेत असले तरी त्यांच्यापासून झालेली संतति पंडे ब्राह्मणांत मोडते. दक्षिणेंतून गेलेले जे ब्राह्मण पंडेपणा करतात तेसुद्धा ह्या पंडे ब्राह्मणजातींत समाविष्ट होऊन ह्या सर्व मिळून पंडे ब्राह्मणांची एक स्वतंत्र जात बनली आहे. खास ब्राह्मणांत सामील झाल्यामुळे त्यांच्या मूळ जातीशीं दाक्षिणी ब्राह्मणांचा संबंध सुटला आहे. गढवाल जिल्ह्यांतील चौधरी हे वैश्य आहेत. ह्यांचा वैवाहिक संबंध खासी जातीचे जे रजपूत जमीनदार त्यांच्याशीं होतो. गढवाल जिल्ह्यांतील हा जो जमीनदारवर्ग त्यांच्यांत खालून गेलेले न्हावी व अशाच दुसऱ्या जातीचे लोक मिसळले आहेत.

ह्याच ठरावांत एका विशेष चालीचा उल्लेख मॅजिस्ट्रेट यांनी केला आहे. ह्या चालीला धंतधंतीची चाल म्हणतात. धंती म्हणजे ठेवलेली स्त्री आणि धंत म्हणजे जार अथवा स्त्रीने ठेवलेला पुरुष. विधवा एखादा पुरुष बाळगून असतात. अशा पुरुषांना तेकूवा (Tekwas) म्हणतात. अशा संबंधापासून झालेली अधर्मंज संतति समाजांत राजरोसपणें समाविष्ट होते. त्या संततीला कोणतीहि अडचण येत नाहीं. समाज ह्या संततीला कमी लेखीत नाही. बदरीनारायणाच्या रावळाचा अधर्मंज पुत्र शिष्टपणाने समाजांत वागतो हें मीं प्रत्यक्ष पाहिलें आहे. हे गृहस्थ वकील आहेत. त्यांची ओळख करून देतांना 'रावलका लडका' असे गौरवोद्गार ओळख करून देणाऱ्या माणसाने काढले !

केदारच्या पंड्यांची नेमणूक पूर्वी राजाकडून होत असे. आता वाटेल तो ब्राह्मण पंड्याचें काम करतो. मात्र तो 'पंड्या ब्राह्मण' होतो; मूळचा ब्राह्मण राहत नाही. पंडे हे ब्राह्मण समजले जातात; पण ते कमी दर्जाचे ब्राह्मण होत. खऱ्या ब्राह्मणवर्गाच्या आपल्याहून लहान वयाच्या माणसास पत्राच्या मायन्यांत हे पंडे 'पैलगुण' ह्या विशेषणाने संबोधितात. ह्यावरून त्यांचा कमीपणा सिद्ध होतो.

## देव

हिमालयांत देव व देवळें ह्यांची कमतरता नाही. शिव, विष्णु, देवी ह्यांचीं देवळें किंवा त्यांच्या मूर्ती ठिकठिकाणीं आहेतच; पण शिवाय पांडव आणि राम-लक्ष्मण ह्यांच्याहि मूर्ती कित्येक ठिकाणीं आहेत. पुराणांतल्या कित्येक व्यक्तीहि देवत्व पावल्या आहेत. उदाहरणार्थ– उषा, अनिरुद्ध, मांधाता ह्यांच्या मूर्ती उखी मठाला आहेत. बदरीनाथाला कुबेराची मूर्ति आहे. गरुडाची मूर्ति नाही असें ठिकाण क्वचित् सापडेल. अवतारांपैकी वराहाच्या मूर्ती अनेक गांवीं आढळल्या. पांडुकेश्वरीं वासुदेवाचें देऊळ पाहण्यांत आलें. वासुदेवाची उपासना आता लुप्तप्राय झाली आहे. सूर्याचें देऊळ आढळलें नाही. गणपतीच्या मूर्ती गरुडाच्या मूर्ती-इतक्या नसल्या तरी मधून मधून आढळतात. क्षेत्रपालाचें देऊळ देवप्रयागला आहे. खंडोबाचें देऊळ कोठें असल्याचें समजलें नाही. मारुति फक्त हनुमान-चट्टीवर पाहण्यांत आला. कर्णप्रयागाखेरीज कर्णाचें देऊळ इतरत्र असल्याचें माहीत नाही. सत्यनारायणाचीं देवळें बरींच आहेत. विष्णूचीच मूर्ति पण नांव मात्र सत्यनारायण.

ऋषिकेश येथे रामाच्या मूर्तीशेजारीं एक लहानशी हृषीकेशाची मूर्ति आहे. हृषीकेश देवावरून गांवाला नांव पडलें असेल तर गांवाला ऋषिकेश न म्हणतां हृषीकेश म्हणावें लागेल. ऋषिकेश शब्दाला कांही अर्थ आहे असें वाटत नाही. चमत्कारिक दिसतें तें हें की, ऋषीकेशाला हृषीकेशाचें माहात्म्य नाही. हृषीकेश हें विष्णूचें नांव. ह्या देवाचें मुख्य व स्वतंत्र असें मंदीर नाही. रामाच्या देवळांत रामाच्या बाजूला हृषीकेशाला बसावें लागलें आहे.


ऋषिकेश गांवीं मुख्य देऊळ भरताचें आहे. हा भरत रामाचा भाऊ नव्हे अथवा दुष्यंताचा मुलगाहि नाही, तर ज्या विष्णूची उपासना दुष्यंतपुत्र भरताने केली त्या विष्णूची ही मूर्ति आहे असें तेथील लोकांकडून समजलें. ह्याचा अर्थ भक्ताचें नांव देवाला मिळालें. ह्या देवळाची व्यवस्था एका महंताकडे आहे.

देवाला टेहरी संस्थानाकडून इनाम आहे. ऋषिकेश नांवाचा उलगडा असा करण्यांत येतो की, भरताने म्हणजे विष्णूने ह्या स्थलीं ऋषींना दर्शन दिलें, ह्यावरून ऋषिकेश नांव प्रचारांत आलें. परंतु ह्या व्युत्पत्तिकारांनी केशशब्द विचारांत घेतलेला दिसत नाही. गंगेंत चन्द्रशेखराचें लहान देवालय आहे.

गोपेश्वर गांव अगदी डोंगरमाथ्यावर आहे. ह्या ठिकाणीं शिवालय आहे. देवाचेंहि नांव गोपेश्वर. शिवाची पिंडी आहे. रामस्वामी अय्यर नांवाचा मद्रासी ब्राह्मण रावळ आहे. रुद्रनाथ, देऊर, सायकोट, ग्वाड व गोपेश्वर हीं सर्व देवस्थानें एका गादीच्या ताब्यांत आहेत. मुख्य देवस्थान रुद्रनाथ. रुद्रनाथाचा रावळ गोपेश्वरीं हिवाळ्यांत राहतो. ह्या सर्व देवस्थानांना मिळून चार गांव इनाम आहेत. त्यांचें वार्षिक उत्पन्न ५०० रुपयांचें आहे. हें जमिनीच्या साऱ्याचें उत्पन्न होय. सर्व सारा नक्तांत वसूल करतात. हे गांव नेपाळच्या राजाकडून मिळालेले आहेत; त्यांस दीडशे वर्षांहून अधिक काळ झाला नाही असें सांगण्यांत आलें. गोपेश्वराचें देऊळ रामावतारीं बांधल्याची दंतकथा सांगतात. यात्रेचें उत्पन्न सुमारें ५०० रु. आहे. देवावर नित्याभिषेक नाही. रावळाची निवड इनाम-गांवच्या लोकांकडून होते. विद्यमान रावळाची निवड सन १९३१ सालीं झाली. गोपेश्वरची लोकसंख्या ३१० आहे. त्यांत १५० पुरुष व १६० स्त्रिया. हिमालयांतील गांव किती लहान असतात, हें ह्यावरून दिसेल.

गुप्त-काशी अथवा गुप्त-वाराणशी येथे विश्वेश्वराचें मुख्य देऊळ आहे. हिमालयांत बरींचशीं देवळें अस्वच्छ आढळलीं. विश्वेश्वराच्या समोर गरुड आहे. ह्यावरून विष्णूच्याच पुढे गरुड असावयाचा हा सिद्धांत खरा दिसत नाही. ह्याच देवळांत अर्धनारीश्वर हा एक आणखी देव आहे; विश्वेश्वरालाच चन्द्रशेखर हें दुसरें नांव आहे काय ? गुप्तकाशीचा व केदारचा रावळ एकच. गुप्तकाशीला पूर्वी गुप्त-वाराणशी हें नांव होतें. येथे एका मंदिरांत पांच पांडवांच्या मूर्ती आहेत.

भेत उर्फ नारायणकोटी ह्या गांवीं एका कुंडाच्या भोवती लहान लहान देवळांत बऱ्याच मूर्ती आढळल्या. देऊळ जुनें असावें. एकंदर नऊ मूर्ती आहेत. वराह, अन्नपूर्णा, पार्वती, भस्मासूर, महादेव, भैरव, गरुडावर बसलेला लक्ष्मीनारायण, भारत ह्या देवांच्या मूर्तींखेरीज १८ हातांची भंगलेली एक देवीची मूर्ति आढळली. ह्या देवीच्या हातांत त्रिशूळ असून, त्याने ती दैत्याला मारीत आहे असें चित्र दाखविलें आहे. तेथेच एक खांब उभा आहे. त्याला प्रल्हादाचा



३६ नदीवरील झुलता पूल.



३७ दोन्ही तीरांवर वसलेलें शहर व झुलता पूल.



३८ डोम स्त्री छटांगी हिचा नाच.



३९. (वर) पहाडी स्त्रिया. ४० (खाली) पहाडी कुटुंब.



कीर्तिखांब म्हणतात. ह्याशिवाय एक लांबट दगड आहे व दुसरी लहान मूर्ति आहे. सर्वच मूर्ती सुंदर आहेत. नक्षीकाम चांगलें आहे.

ह्या देवांचा पुजारी भोलानाथ नांवाचा ब्राह्मण आहे. एक मूर्ति कोणत्या देवाची आहे तें समजत नाही. ह्या मूर्तीच्या मस्तकावर हत्ती असून पायांशीं तीन स्त्रियांचीं चित्रें आहेत. एक तर नुसती उभी शाळुंका आहे. ह्या गांवाला मेत म्हणूं नका, नारायणकोटी म्हणा, असें पुजाऱ्याच्या मुलाने आम्हांस बजाविलें.

नारायण-कोटीप्रमाणे नाल्यालाहि अस्ताव्यस्त पडलेल्या अनेक मूर्ती आहेत. येथे एक ललितादेवीचें मंदीर असून, भैरव व गणपति ह्यांच्याहि मूर्ती आहेत. येथेसुद्धा वराहाची मूर्ति आहेच. शिवाचा नंदीहि आहे.

कर्णप्रयाग येथे कर्णाचें देऊळ आहे. देवळांत तीन देवांच्या तीन मूर्ती रांगेने आहेत. गौरीशंकराची मूर्ति मधोमध असून, तिच्या उजव्या हाताकडे कर्णाची व डाव्या बाजूला देवीची अशा दोन मूर्ति आहेत. कर्णाच्या देवळांत कर्णाचीच मूर्ति वस्तुतः असावी. गौरीशंकराचें व देवीचें तेथे काम काय ? निदान कर्णाची मूर्ति मध्यभागीं पाहिजे होती. कर्णाच्या ऐवजी गौरीशंकराचें देऊळ म्हणूनहि म्हणतां येईल. कर्णाच्या हातांत तरवार आहे. देवळाच्या आवारांत भंगलेली वराहाची मूर्ति पडलेली आहे. वराहाच्या सर्वच मूर्ती सुंदर आहेत. गढवालच्या राजाकडून देवास गांव इनाम आहे.

## परिशिष्ट २ रें

# लोकस्थिति

### ब्राह्मण

हिमालयांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हा मानवजातीचा वर्णात्मक विभाग अद्यापि अस्तित्वांत आहे. त्या प्रांतांत अस्पृश्य असा निराळा वर्ग नाही. सर्वांचा अंतर्भाव शूद्रांत होतो. अर्थात् सर्व लोक स्पृश्य मानले जातात. फक्त भंग्याचा स्पर्श झाला तर स्नान करण्याची वहिवाट आहे. सावली टाळण्याची तर कल्पनाच नाही. 'पुरुषार्थ' मध्ये कांही वर्षांपूर्वी मीं अस्पृश्यांवर एक लेख लिहिला होता, त्यांत आमच्या शास्त्रकारांचा हेतु चातुर्वर्ण्याच्या बाहेर कोणालाहि ठेवण्याचा नव्हता, जे लोक आज अस्पृश्य म्हणून समजले जातात, ते आपण होऊन बाहेर राहिले म्हणूनच बाह्य हें नांव प्रथम त्यांच्यासंबंधाने योजण्यांत आलें, असें

प्रतिपादन केलें होतें. ह्याचें प्रत्यंतर हिमालयांत पाहावयास मिळतें. चार वर्णांच्या पलीकडे पांचवा वर्ण तिकडे नाही. ह्यावरून सध्या अस्पृश्य मानले जाणारे चातुर्वर्ण्यांत प्रविष्ट होण्यास उद्युक्त झाले की, शूद्रांतच त्यांचा अंतर्भाव झाला पाहिजे. एका डोमं[1] जातीच्या बाईचा नाच आम्हीं पाहिला, तेव्हा त्या बाईला व तिच्या नवऱ्याला सर्व स्थानिक लोक शिवत होते, हेंहि आम्हांस पाहण्यास मिळालें.

हिमालयांतील ब्राह्मणांचे मुख्यतः दोन वर्ग पडतात. एक स्थानिक ब्राह्मणांचा व दुसरा खालून म्हणजे पायथ्याखालील प्रदेशांतून वर गेलेल्या ब्राह्मणांचा. शंकराचार्यांच्या प्रचारामुळे मद्रास इलाख्यांतून बरींच ब्राह्मणकुटुंबें हिमालयांत जाऊन कायम झालीं. ह्याशिवाय सत्तावन सालच्या बंडांतहि कांहीं ब्राह्मणांनी हिमालयाचा आश्रय केला असावा.

हिमालयांत ब्राह्मणांच्या अनेक जाती आहेत. जातीचें नांव तेंच आडनांव अथवा आडनांव तेंच जातीचें नांव असतें; उदा० थबलियार हें आडनांव व तेंच जातीचें नांव.

कुकरेती, जोशी, नोटियाल, घसमाना, थबलियार, जुयाल, भट, तेलंग, डिमरी, हटवाल, बुगाणा, गैरवाला, वैष्णव, मैठाणी, बरतवाल, सरोला, गंगाठी, सत्ती, तिवाई, गोर, कोठियाल इतक्या निरनिराळ्या जातींचे ब्राह्मण असल्याचें समजलें.

हटवाल, कोटियाल व सत्ती ह्या जातींचे ब्राह्मण ब्रह्मकपालतीर्थावर श्राद्धोपाध्ये म्हणून काम करतात. गढवाल प्रांतांत सरोला व गंगाठी ह्या ब्राह्मणांच्या दोन मुख्य जाती असें म्हणतात. बदरीनाथच्या पंड्यांमध्ये डिमरी व देवप्रयागी असे दोन भेद आहेत. सर्व स्थानिक लोकांचे पंडे डिमरी ब्राह्मण. त्यांच्या व्यतिरिक्त इतरांचे पंडे देवप्रयागी ब्राह्मण. डिमरी, हटवाल व सत्ती ह्या सर्वांस सामान्यतः सरोला ही संज्ञा आहे. सरोला हा रस्वाला ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. रस्वाला म्हणजे रसोई करणारा किंवा स्वयंपाकी. गढवाल राजाचा स्वयंपाक ज्या ब्राह्मणांकडून होतो, त्यांस रस्वाल अथवा सरोला हें नांव पडलें. सरोल्यांपैकी डिमरी जातीचे लोक बदरीनाथाचा नैवेद्य करूं शकतात. गंगाठी लोकांचा तो अधिकार नाही.

---

१ डोंब असाहि उच्चार करतात.

देवप्रयागच्या ब्राह्मणांत द्रविड, तैलंग, गौड, कर्नाटक, गुर्जर व महाराष्ट्र इतक्या प्रकारचे ब्राह्मण आहेत; त्यांचीं गोत्रें जमदग्नि, भारद्वाज, कौंडिण्य, काश्यप, वसिष्ठ, श्रीवत्स, मुद्गल, शांडिल्य, गार्ग्य, अत्रि, बाद्रस, दालव्य, गौतम, कौश्यस्प अशीं आहेत.

## नांवें

### बायकांचीं

आसाडीदेवी, सोबतीदेवी, वसंतीदेवी, मुगा, कुटुंबणी, रूपशी, फोरी, कस्तुरी, भागिर्थी, नोमी, रंती, सुरेशी, राजेश्वरी, गोविंदीदेवी, नंदीदेवी, बिचेसू, बनसा, कंवरी, मंगशेरी, चमेली, नगटी, सिब्रदेई. एका डोम बाईचें नांव छटांगी असल्याचें तिनें सांगितलें. तिच्या मुलांचीं नांवें गोंदू, गेंदी, ग्यानी, शामा, सुंतू अशीं आहेत.

### पुरुषांचीं

भगवानदत्त, बलिराम, जीवराम, शिवदत्त, रतिराम छिलुप्रसाद भट, लज्जाराम रामधन, इन्द्रदत्त, गंगाराम तिवाई, मथुरादास, गोकुळप्रसाद, भोलानाथ, पद्मदत्त, जीवानंद, पीतांबरदत्त, लक्ष्मीदत्त, शामाचरण ज्वालाराम, भालचंद्र देवानंद, शंकरदत्त, देवीदत्त, चिंतामणी.

वैश्यांच्या नांवापुढे साहा शब्द असतो; उ० जानकीसाहा, तुळशीसाहा, लाला जयसालसाहा. सिंग ह्या उपपदावरून क्षत्रियांचीं नांवें ओळखतां येतात; उ० बचनसिंग, गोवरसिंग, गवरसिंग, प्रतापसिंग, दर्शनसिंग, दलेपसिंग, फत्तेसिंग, भूपसिंग. तथापि कित्येक रजपुतांनी आपलीं नांवें खालीलप्रमाणे सांगितलीं— अयतवारू, कलीराम, असाडू, छन्या, रती, दिवाण. राउत, ठाकूर, चव्हाण, पवार हीं रजपुतांचीं आडनांवें होत. नेगी हेंहि क्षत्रियांचें आडनांव असावें.

### पोषाख

लंगोटी, पंचा व तुमान पुरुषांच्या नेसण्यांत आढळतात. स्त्रियांच्या नेसूं बहुधा बुरणूस. पुरुषांच्या अंगांत सदरा, जाकीट, कोट, बंडी तर स्त्रियांच्या अंगावर कोटवजा लांब झगा असतो. पुरुषांच्या डोक्यावर टोपी किंवा रुमाल असतो. स्त्रियांच्या केसांवर एक फडकें बांधलेलें असतें. कंबरेभोवतीं वस्त्राचें बंधन स्त्री व पुरुष दोघांच्याहि असतें. स्त्रियांची वेणी पाठीवर सोडलेली असते. आमच्या कुलींच्या गळ्याभोवती उपरणें वेष्टिलेलें असे.

## साडेपांच भाऊ

एक छापील इंग्रजी पत्रक माझ्या पाहण्यांत आलें. त्याच्या शिरोभागीं Five and half brothers असे शब्द होते. अर्थात् तें कंपनीचें नांव होतें. त्याचा अर्थ विचारतां असें सांगण्यांत आलें कीं, त्या कंपनीचे मालक सहा बंधु आहेत. पांचांचीं लग्नें झालीं असून एक अविवाहित आहे. ज्या भावाचें लग्न झालें तो संपूर्ण; अविवाहित अर्धा.

## पत्राचा मायना

सिद्ध श्री मान्यवरजी जाजीका चरणोंमा मधुसूदन की सेवा स्वीकार होवे. आगे हम् राजीखुषी छवा आपसण ईश्वरकी कृपासे कुशलपूर्वक... वगैरे.

## चालीरीती

१. गोठ्यांत स्त्रिया प्रसूत होतात. कित्येक ठिकाणीं बाळंतघर गांवामध्ये स्वतंत्र असतें. तळमजल्याचा उपयोग गोठ्यासारखा करतात.

२. वार शेणांत पुरतात.

३. लग्नाच्या वेळीं अगोदर मुंज उरकून घेण्याची वहिवाट आहे.

४. ऋग्वेदी व यजुर्वेदी ह्यांच्यांत लग्नें होतात.

५. भिन्न जातीच्या ब्राह्मणांत सगोत्रविवाह होतो.

६. गौड व द्राविड ह्यांच्यांत विवाहसंबंध होत नाही.

७. गांवांतील मुलगी गांवांतच द्यावी हा निर्बंध कांहीं ठिकाणीं आहे.

८. गौड व डिंब्री ब्राह्मणांचा रोटीव्यवहार होतो.

९. सर्व गौड मत्स्याहारी नाहीत.

१०. ब्राह्मण व क्षत्रिय ह्यांच्यांत पक्की रसोई चालते.

११. आषाढांत लग्नें होतात. श्रावण ते कार्तिक व चैत्र आणि पौष हे महिने लग्नाला वर्ज.

१२. गार्ग्य-भारद्वाज, काश्यप-शांडिल्य हीं विवाह्य गोत्रें मानतात.

१३. चारी वर्णांत स्त्रिया विटाळ चार दिवस पाळतात.

१४. विशेषतः प्रथमप्रसूतीचें अशौच एक महिन्याने जलपूजन केल्यावर जातें– अर्थात् हें आईपुरतें.

१५. विधवांचें केशवपन नाहीं.

१६. ज्या विवाहांत मुलीचे पैसे द्यावे लागतात त्या विवाहाचा विधि

मुलाकडे होतो व कन्यादानाचा प्रयोग गाळला जातो.

१७. सोडमुंजींत मामाने आपली मुलगी मुलाला देऊं करण्याची चाल खास गढवाली ब्राह्मणांत नाही. दक्षिणेंतून गेलेल्या ब्राह्मणांत आहे.

१८. नथ नाकांत नसणें हें वैधव्याचें लक्षण.

१९. अस्पृश्य शूद्रांत मोडतात.

२०. रजपूतस्त्रियांशीं ब्राह्मणांनी लग्नें लावण्याचीं उदाहरणें घडलीं आहेत.

२१. ज्या जातीशीं रोटीव्यवहार होत नाही अशा जातीची स्त्री केल्यास तिच्या हातचें शिजवलेलें अन्न म्हणजे डाळभात नवरा, मुंज झालेले मुलगे व इतर पुरुष खात नाहीत.

## परिशिष्ट ३ रें

## भौगोलिक

### शेती

कोकणांतील डोंगरावरची शेती ज्याने पाहिली आहे, त्याला हिमालयांतील शेती पाहून आश्चर्यचकित होण्याचें कारण नाही. नाली हे तिकडलें जमीन मोजण्याचें माप आहे. १६ मुठी म्हणजे १ नाली व २० नाली म्हणजे १ एकर. एका माणसाने माझी ७६ नाली जमीन असून ५ रु. सारा मला भरावा लागतो असें सांगितलें. तथापि साऱ्याचें प्रमाण नालीला २ ते ८ आणे फरकाने असतें. ७६ नालींच्या क्षेत्रांत १५–१६ मण भात, ६–७ मण गहूं, तितकाच मेडवा व १५–२० शेर तंबाखू असें पीक होत असल्याचें नंदप्रयागच्या पोस्टमास्तराकडून समजलें. अश्विनांत भात काढतात. भात कापल्यावर गहू पेरतात. आम्ही गेलों तेव्हा (जूनमध्ये) भात लावलेलें आढळलें. गहू व तंबाखू काढीत होते.

### उष्णतामान

| दिवस | गांव | वेळ[१] | उष्णता |
|---|---|---|---|
| १८ मे | ऋषिकेश | १३ | ९५ |
| १९ मे | देवप्रयाग | ९ | ९० |
| २० मे | राणीबाग | १२–३० | ९० |
| २१ मे | श्रीनगर | १३–३० | ९२ |

१ आगगाडीच्या वेळापत्रकाच्या पद्धतीने.

| दिवस | गांव | वेळ | उष्णता |
|---|---|---|---|
| २२ मे | भट्टीसेरा | ६–१५ | ६८ |
| ,, | रुद्रप्रयाग | १८ | ८५ |
| २३ मे | छातोली | ७ | ७० |
| ,, | अगस्तिमुनी | १२–३० | ८५ |
| २४ मे | भेरी | ६–१५ | ७८ |
| ,, | गुप्तकाशी | १२–० | ८२ |
| ,, | व्योम | १८ | ८२ |
| २५ मे | रामपूर | १० | ७६ |
| ,, | गौरीकुंड | १९ | ७२ |
| २६ मे | रामबाग | ९–३० | ५८ |
| ,, | केदार | १२ | ५४ |
| २७ मे | गौरीकुंड | १५ | ७८ |
| २८ मे | मेत | १०–४५ | ८२ |
| २९ मे | उखीमठ | ५–३० | ७६ |
| ,, | बनियाकुण्ड | १२–३० | ७० |
| ३० मे | मण्डल | १० | ८० |
| ,, | गोपेश्वर | १८–३० | ८४ |
| ३१ मे | सियासैण | ९–४५ | ८२ |
| ,, | सियासैण | १२–४५ | ९२ |
| ,, | गरुडगंगा | १८ | ८६ |
| १ जून | कुमारचट्टी | १५ | ८२ |
| २ जून | पांडुकेश्वर | १५ | ७६ |
| ,, | हनुमानचट्टी | १९ | ६८ |
| ३ जून | बदरीनारायण | १०–४५ | ६० |

हरिद्वारपासून १५०–२०० मैलांच्या आंत असलेल्या बदरीकेदारपर्यंत हिमालयांतील उन्हाळ्या-थंडीचा चढउतार वरील आंकड्यांवरून ध्यानांत येईल.

उखीमठ येथील पावसाचे आकडे येणेंप्रमाणें—

१९३६— ९७ इं. १९३७—७९ इं. १९३८— १०३ इं.

## परिशिष्ट ४ थें

# पंचांग

नर्मदेच्या उत्तरेस सामान्यतः विक्रमसंवत् चालतो. हिमालयांतहि विक्रम-संवत्सर प्रचारांत आहे. आपल्या इकडे ह्या संवत्सराचा आरंभ कार्तिक शुद्ध प्रतिपदेपासून होतो. हिमालयाच्या गढवाल जिल्ह्यांत रूढ असलेलें पंचांग आमच्या पाहण्यांत आलें. तें संवत् १९९६ चें असूनहि वर्षाचा आरंभ चैत्र शुद्ध प्रतिपदेला केलेला त्यांत आम्हांस आढळला. पंचांगाला कीर्तिपंचांग हें नांव दिलेलें होतें. टेहरी संस्थानच्या महाराजांच्या नांवावरून हें नांव ज्योतिष्याने दिलें असावें; कारण पंचांगकर्ता टेहरी संस्थानांतील ज्योतिषी आहे.

उत्तरहिंदुस्थानांत महिना पूर्णिमान्त असतो. त्याप्रमाणें चैत्राचा पहिला पंधरवडा झाल्यानंतर दुसरा पंधरवडा वैशाख वद्याचा येतो.[१] म्हणजे चैत्र शुद्ध व वैशाख वद्य मिळून वर्षाचा पहिला महिना; वैशाख शुद्ध व ज्येष्ठ वद्य मिळून दुसरा महिना, अशा रीतीने शेवटचा महिना फाल्गुन शुद्ध व चैत्र वद्य या दोन पंधरवड्यांचा होतो. सौर महिने पंचांगांत दिलेले असतात. मीन राशींत सूर्याचें संक्रमण झालें की सौर चैत्र मासाला प्रारंभ होतो. मेषसंक्रांतीच्या दिवशीं सौर वैशाख महिन्याला सुरवात होते. फाल्गुन शुद्ध चतुर्थी– तारीख १३ मार्च– हा सौर चैत्राचा आरंभदिन होय.

उत्तरायण व दक्षिणायन ह्यांना अनुक्रमें सौम्यायन व याम्यायन ह्या संज्ञा तिकडील पंचांगांत वापरलेल्या आढळल्या.

नक्षत्रांचीं प्राचीन नांवें तिकडे अद्यापि प्रचलित आहेत; उ० दास्र = अश्विनी, वासव = धनिष्ठा वगैरे. हीं नक्षत्रांच्या देवतांचीं नांवें होत. नक्षत्राच्या कोष्टकांत अश्विनी, भरणी इत्यादिच नांवें लिहितात; परंतु ग्रहांचीं गृहान्तरें लिहितांना दैवत नांवाचा उपयोग करतात; जसें अदितौ (पुनर्वसु) शुक्रः अर्यम्णि [पूर्वा फल्गुनी] शः; सार्पे [आश्लेषा] भौमः इत्यादि.

चालू सालच्या पंचांगांत अधिक महिना श्रावण आहे. अधिक मासाला मलिन मास म्हणतात. पंचांगांत शुद्ध व मलिन श्रावण मास यांचा क्रम दिला

१ आपला चैत्र-वद्य तो त्यांचा वैशाख-वद्य होय. दोघांचे शुक्ल पक्ष सारखेच येतात. कृष्णपक्षाला मात्र पुढील महिन्याचें नांव मिळतें.

आहे तो असा— शुद्ध श्रावण कृष्ण, मलिन श्रावण शुक्ल, मलिन श्रावण कृष्ण आणि नंतर शुद्ध श्रावण शुक्ल.

श्रावणी पूर्णिमेला ऋषितर्पणी पूर्णिमा म्हणतात.

आपल्या इकडे वटसावित्रीपूजन ज्येष्ठ शुद्ध पूर्णिमेस करतात. परंतु गढवाल पंचांगांत तें ज्येष्ठ कृष्ण अमावास्येस सांगितलें आहे. उत्तरेस बहुधा हाच प्रघात सर्वत्र असावा.

इकडील पंचांगांत १९९५ हा विकृति संवत् लिहिलेला आहे; परंतु हिमालयांत संकल्प म्हणतांना नंदनसंवत्सराचा उच्चार केलेला ऐकला व चौकशी करतां चालू संवत्सराचें नंदन नांव असल्याचें समजलें. पंचांगांत क्षय-तिथि दाखविण्याची पद्धति आपल्याहून निराळी आहे. तिथि निरनिराळ्या दाखवून एकच वार दोनदा लिहितात; उ० ६ चा रविवारीं क्षय आहे अशी कल्पना केली तर ती क्षयतिथि खाली दिल्याप्रमाणे लिहितात—

| तिथि | वार | घ. | पळें |
|---|---|---|---|
| ५ | रविवार | २ | १५ |
| ६ | रविवार | ५६ | १९ |

हिमालयांत उन्हाळ्यांत दिनमान आपल्यापेक्षा दोन घटकांनी अधिक आहे. २१ जूनला आपल्याकडे ३३ घ. ४ पळांचें दिनमान असतें, तर हिमालयांत त्याच दिवशीं ३४ घ. ५८ पळांचें असतें. तिकडे सकाळीं चार वाजतां उजाडतें असें म्हणावयास हरकत नाही. हिंवाळ्यांत २१ डिसेंबर रोजीं ह्या बाजूला दिनमान २७ घ. २२ पळें असतें, त्याच वेळीं हिमालयांत २५ घ. ४ पळें असतें. सूर्योदय लवकर म्हणजे ५ वाजून १ मिनिटाने आणि उशिरा म्हणजे ७ वाजतां होतो.

## परिशिष्ट ५ वें

## गढवाली भाषा

संयुक्त प्रांतांत गढवाल नांवाचा जिल्हा आहे. हा जिल्हा बहुतेक हिमालय पर्वतांत आहे. टेहरी संस्थान व गढवाल जिल्हा हिमपर्वताच्या पश्चिम भागांत मोडतात. तेथील लोकांची भाषा ही गढवाली भाषा होय. हिलाच पहाडी भाषा असें दुसरें नांव आहे. कित्येक मध्यपहाडी असेंहि म्हणतात. इंग्रेजी राज्यांतील

१ शके १८६१.

मध्यपहाडी बोलणारांची संख्या स. १८९१ च्या गणतीप्रमाणे ११०७६१२ आहे. गढवाली भाषा संस्कृत व हिंदी मिळून बनलेली आहे. तिच्यांत राजस्थानीचें मिश्रण आहेच. तथापि हिंदीमध्ये न आढळणारे असे देश्य शब्द त्या भाषेंत आहेतच. भाषांच्या अभ्यासकाला अशा शब्दांचेंच महत्त्व वाटत असतें. अशा शब्दांपैकी कांही शब्द येणेंप्रमाणे[१] :

| | |
|---|---|
| भोल = उद्या | ब्याले = काल |
| सगवाळी = शेतें | डाळ = झाड |
| ढुंगेळा = दगड | भिपॅर = गुरुवार (भिपॅर ह्याचा उच्चार बिप्यारहि करतात) |
| नाली = एक शेर | पाथा = दोन शेर |
| नौनी = मुलगी; लडकी | नौनू = मुलगा; लडका |
| नानी = आजी | ब्वारी = स्त्री |

अेका दगडा = ह्याच्याबरोबर.

कोन (कोपरा), पाणी, धुंडणें (शोधणें), बाप, आज, पहिला, बारा, तलाव, दुसरा, घर, भला (चांगला), बोलणें, हिस्सा, आवाज, संग (बरोबर), गाय, म्हैस, नाक, जीभ, भांडें, वाट, रस्ता वगैरे कांही शब्द मराठीप्रमाणेच आहेत. उच्चारभेद सोडला तर वारांचीं व महिन्यांचीं नांवें मराठीप्रमाणेच आहेत.

गुरुवार = बिप्यार (बृहस्पतवार) शनिवार = संचार

मामाला मामा हाच शब्द आहे. गढवाली भाषेंत मामाला दुसरा शब्द नाही. द्राविडी व संस्कृतोद्भव भाषांत मामाशिवाय दुसरा शब्द आढळत नाही. ह्यावरून ह्या शब्दाचें मूळ अेकच असलें पाहिजे असें म्हणावें लागतें. हिंदी भाषेंत मामा हा कानडी शब्द आढळतो. तेव्हा हिंदी भाषेचा जन्म कर्नाटकांत झाला असें कोणी आता म्हणतील काय ?

सदृश परिस्थितींत आचारसादृश्य व भाषासादृश्य निर्माण होतें. शौच्यास जाण्याला आपल्याकडे बहिर्दिशेस किंवा परसाकडे जाणें असें म्हणण्याचा परिपाठ आहे. हिमालयांत सर्वत्र जंगल असल्याकारणाने "जाव झाडा जंगल" असा वाक्प्रचार पडला आहे.

---

१ अशिक्षितांच्या तोंडची ही भाषा घेतली आहे. अर्थात् उच्चार अशिक्षितांचे आहेत.

मराठी षष्ठीचा 'चा' प्रत्यय हा 'स्य' पासून आला असावा असें गढवाली लोक स चा उच्चार च सारखा करतात त्यावरून वाटूं लागतें.

'तुळशीसी पूजा करो' असें मुलें रस्त्याने म्हणत असतांना 'तुळशीची पूजा करो' असा स्पष्ट उच्चार माझ्या कानांवर आला. पुढे चौकशी करतां 'तुळशीची' नसून 'तुळशीसी' शब्द आहे हें समजलें. त्याचप्रमाणे 'कौंसी' ह्याचा उच्चार 'कौंची' असा होत होता. का-कीप्रमाणे सा-सी हे गढवालींत षष्ठीचे प्रत्यय आहेत असें दिसतें.

कोमल शब्दाचा उपयोग लक्ष वेधण्यासारखा आहे. माती जरा मऊ असली की तिला 'कोमल मट्टी' म्हणतात. कोमल शब्दाचा हा उपयोग आपणांस अपरिचित आहे.

झाडांचीं नांवें फार करून सर्वत्र देश्य असतात. म्हणून कांहीं झाडांचीं गढवाली नांवें येथे देतों :— (झाडाला पेड म्हणतात.)

बंबोर, आक्रोड, चिपळ्या, रिंस, ताचिला, हौडी, पंयां, फूली, टेमरू, खडकी, गंवत्या, शमलो, हानड, गेंथी, कांगू, आरु, चिवला, बाबलो, गोरखो-शांरु, चअलो, महरु, बांज, अंयार, बुऱ्हां, धिंध्यारु, कैडी, इंसार, किनगोड, भेकव, करंदु, तुंगलो, गिऱ्याल, भिमल.

द्वितीयेचा सणी प्रत्यय मराठीमध्ये कुणब्यांच्या भाषेत सनी ह्या रूपांत पाहावयास मिळतो; उ० मराठी— त्यासनी (त्याला), पहाडी— मैंसणी (मला). मराठींतील भूतकाळाचा प्रत्यय पहाडी भाषेंत भविष्यकाळ बनवतो; उ० आला— येतील; बोलला— बोलतील.

## कांहीं शब्द

| | |
|---|---|
| दादा = वडील भाऊ | दिदी = वडील बहीण |
| भला = धाकटा भाऊ | भुली = धाकटी बहीण |
| लूण = मीठ | बाटा = वाट |
| प्रजापत = कुंभार | भतिजा = पुतण्या |
| भांजा = भाचा | डाई—दाई = ओझेवाला; हमाल (हा नेपाळी शब्द आहे) |
| बय = स्त्री | जेठा = मोठा |
| आंगबचा = लंगोटी | गल्येप = उपरणें |

| | |
|---|---|
| कंडोड = कान | घीच्या = तोंड |
| रुमाल = केस | आंगला = बोट |
| खुट्ट = पाऊल | बॉंव = डावा (सं. वाम पासून) |
| देण = उजवा (सं. दक्षिण पासून) | बागी = रेडा |
| किमला = डोंगळा | बेर = बोर |
| नरसो } नरसऊं } = तेरवां | |
| कांड = कांटा | यख = येथे |
| वख = तेथे | खसम = नवरा |
| त = तेव्हा | |

## गढवाली भाषेचा नमुना

अेक दिन मिन देखे कि दुई आदमी बोणमा शिकार खेलन कु जान लगोंछ्या. उ अफणी अफणी बन्दूक ल्दी गेन और सत्तासरलोंगन एक घोल्ड मारी. उ बडू तोपच्या छ. वेकाबराबर दौडनवालो मिन आजतक गढवालमाँ कुई नी देखे. वेन मैंकु तैं भी बोले कि घुमणका वास्ता चल. पर मैन ना करे. किलाई की मैं वेका बराबर नी दौड सकदोछ्यो. सत्तासलोंग जब घर आये त रातकु फसोरी क तैं सेगे.

## भाषांतर

अेक दिवस म्यां पाहिलें की, दोन पुरुष वनांत शिकार करण्यास गेले-त्यांनी आपली आपली बंदूक घेतली. आणि सत्तासरलोंगने एक हरीण मारलें. तो मोठा शिकारी आहे. त्याच्याबरोबर चालणारा म्यां आजपर्यंत गढवालमध्ये कोणी नाही पाहिला. त्यानें मला सुद्धा बोलणें केलें की फिरण्याकरिता चल. परंतु म्यां नाहीं केलें (नाकारलें). कारण की, मी त्याच्याबरोबर नाहीं चालूं शकतों. सत्तासर-लोंग जेव्हा घरीं आला तेव्हा रात्रीं गाढ निजला.

मोटर का औणसे काफी[1] सुमीतो[2] होई गए. मोटर सडक हमारा महाराज टिहरी सरकार की इमदादसे बणाई गई. हम लोग देवप्रयागका रैणवाला. बल्कि मैं इनो सोचदो छ्यू कि हमारा देवप्रयागमां मोटर कभी भी नी आई सकदी. किन्तु हमारा महाराजन हमारा वास्ता अच्छो सुमीतो ढूंडे. मैं मधुसूदन मोतीवाल

१ पुष्कळ. २ विचार.

अफणा महाराज सण श्री बद्रीनाथकी सच्चो भक्त समझदो. हमारा महाराजन सारा गढदेश को भलो करदीने यासे सारो गढवाल हमारा महाराज को धन्यवाद देदु.

**कविता**

बोल बौराणी क्या तेरो नौं छ ।
बेवो बौराणी कख तेरो गौं छ ।
रौतु की बेटी छैं रात्री नौं छ ।
सेट्टु की बुवारी पाली गौं छ ॥

## परिशिष्ट ६ वें

## संकल्प

हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं म्हटले जाणारे संकल्प एकत्र करण्याची बुद्धि अद्यापि कोणास झाली नाही, ह्याचें आश्चर्य वाटतें. संकल्पांवरून इतिहास व भूगोल ह्या दोहींचें ज्ञान होण्यासारखें आहे. अन्य दृष्टीनेहि संकल्पाचें महत्त्व फार आहे. म्हणून यात्रेंत निरनिराळ्या क्षेत्रांच्या ठिकाणीं म्हटले जाणारे जे संकल्प मला मिळवितां आले ते येथे देत आहें.

### हरिद्वारचा संकल्प

"आर्यावर्तांतर्गतहिमालयदेशे बदरिकारण्ये वालखिल्याश्रमे दक्षप्रजापतिक्षेत्रे मायापुरीमंडले केदारखंडे." ह्या संकल्पावरून आपणांस कितीतरी भौगोलिक व पौराणिक माहिती मिळते. आर्यावर्तांत हिमालय प्रांत येतो. हिमालय स्वतंत्र देश मानला आहे; केदार हें एक खंड आहे. भरतखंड केदारखंडाहून निराळें कीं काय हा विचार येथे उद्भवतो. हरिद्वारचें दुसरें नांव मायापुरी आहे; परंतु मायापुरी-मंडल असें संकल्पकार उच्चारतो. मंडल म्हणजे देश किंवा राष्ट्र. दक्षप्रजापतीने हरिद्वार येथे यज्ञ केला, त्यावरून ह्या शहराला दक्षप्रजापतिक्षेत्र म्हणूं लागले. तसेंच ह्या ठिकाणीं वालखिल्य ऋषींचा आश्रम होता, हें वरील संकल्पावरून प्रत्येकाच्या ध्यानांत येतें व आपोआप पौराणिक कथा समजतात.

### देवप्रयागचा संकल्प

"आर्यावर्तांतर्गतहिमपर्वतैकदेशे कैलासखंडे श्रीरामचन्द्रचरणारविन्दसंनिधौ देवप्रयागसुदर्शनक्षेत्रे अलकनंदाभागीरथ्योर्मध्ये सरस्वती-गुप्तरूप-त्रिवेणी-संगमे ब्रह्म-कुंडवसिष्ठकुंडयोर्मध्ये नंदननामसंवत्सरे..."

ह्यांत हिमालय देशाचा कैलासखंड हा एक भाग पाडलेला दिसतो. देव-प्रयागला पूर्वी सरस्वती नदी होती असें दिसतें. सुदर्शनक्षेत्राचा इतिहास मला माहीत नाही. देवशर्मा मुनीने भगवान् विष्णूची येथे स्तुति केली, त्यावरून देव-प्रयाग हें नांव पडलें. ब्रह्मकुंडाच्या ठिकाणीं ब्रह्मदेवाने स्तुति केली. वसिष्ठकुंड अलकनंदेच्या कांठीं तर ब्रह्मकुंड गंगेच्या कांठीं आहे.

### ऋषीकेशचा संकल्प

ह्या संकल्पांत "कुब्जामृके केदारशैले" असें इतर वर्णनाबरोबर म्हणतात. येथे केदारक्षेत्रे न म्हणतांना केदारशैले असें म्हणण्याचा प्रघात कदाचित् अज्ञानाने पडला कीं काय असा संशय येतो. केदार-पर्वत ऋषीकेशाहून १३४ मैल आहे. ऋषीकेशाला कुब्जामृकतीर्थ म्हणण्याचें कारण भगवान् विष्णु रैभ्यमुनीला म्हणाले, "हे मुनिराज! तुमने यहांपर कुब्ज होकर आम्रवृक्ष के नीचे हमारे दर्शन किये हैं इस कारण इस तीर्थका नाम कुब्जामृक होगा" असें सांगण्यांत आलें.

### गरुडगंगेचा संकल्प

"सुमेरुदक्षिणपार्श्वे हिमपर्वतैकदेशे केदारखंडांतर्गतसूक्ष्मबदरिकाश्रमे गरुड-गंगायाः निकटे......अलकनंदामंदाकिन्योः वामतटे" ह्यांत हिमपर्वत सुमेरूच्या दक्षिणेस असल्याचें सांगितलें आहे. बदरिकाश्रम सूक्ष्म, अतिसूक्ष्म व शुद्ध असे तीन आहेत. त्यांच्या सीमा येणेंप्रमाणे—

**सूक्ष्म**— गरुडगंगा ते विष्णुप्रयाग;
**अतिसूक्ष्म**— विष्णुप्रयाग ते कुबेरशिला;
**शुद्ध**— कुबेरशिला ते सरस्वतीगंगा.

६२४६

### बद्रीनाथचा संकल्प

बद्रीनाथचा संकल्प पंड्याने लिहून दिला तो असा— "ओम् विष्णुः हरिर्हरिः श्रीमद्भगवतः श्वेतवाराहकल्पे वैवस्वतमन्वंतरे आर्यावर्तान्तर्गतहिमपर्वतैकदेशे केदार-खंडे भारतवर्षे श्रीबौद्धावतारे षष्ठी शुम्भस्त्राणामध्ये (?) अधयउत्तरायणे ग्रीष्मऋतौ ......श्रीबद्रिकाश्रमे नरनारायणपर्वतयोर्मध्ये पञ्चशिलामध्ये वह्निक्षेत्रे..."

नरनारायण हे दोन पर्वत असून त्यांच्यामध्ये बदरीनारायण गांव आहे... वह्निक्षेत्र हें नांव ह्या स्थलाला कां पडलें मला सांगतां येत नाही; परंतु दक्ष प्रजा-पतीने शिवाची स्तुति केली, त्यांत त्याने "वह्नौ कृतनिवासाय नमोग्निमुखतेजसे" असें म्हटलें आहे. नरसिंहशिला, वाराहशिला, मार्कंडेयशिला, नारदशिला, व

गरुडशिला ह्या पांच शिला बदरीनारायणाच्या क्षेत्रीं गंगेंत आहेत, त्यांचा उल्लेख संकल्पांत आहे.

### केदारचा संकल्प

"आर्यावर्तांतर्गतहिमपर्वतैकदेशे केदारक्षेत्रे श्रीमंदाकिनी खीरगंगा, महोदधि, स्वर्गद्वारी, सरस्वती, पंचगंगा स्मरेन्नित्यं महापातकनाशनम्."

अर्थात् केदारक्षेत्रीं पांच नद्या आहेत. ह्या सर्व नद्या मंदाकिनीला मिळतात. केदारखंडाला केदारकल्पहि कित्येक ठिकाणीं म्हणतात.

### काशीचा संकल्प

"भरतवर्षे ... जंबुद्वीपे आर्यावर्तैकदेशे अविमुक्तवाराणसीक्षेत्रे आनंदवने महास्मशाने गौरीमुखे त्रिकंटकविराजिते विक्रमशके ......"

महास्मशान मणकर्णिकेच्या घाटावर आहे. हरिश्चन्द्राचें स्मशान त्याच्या नांवानें प्रसिद्ध असलेलें निराळें आहे. त्रिशुळावर आधारलेली काशी असल्यामुळे त्रिकंटकविराजित हें विशेपण क्षेत्राला लावलें आहे.

### प्रयागचा संकल्प

"... जंबुद्वीपे आर्यावर्तान्तर्गतब्रह्मावर्तैकदेशे विष्णुप्रजापतिक्षेत्रे षट्कुलमध्ये अंतरवेद्याम् भागीरथ्याः पश्चिमे तीरे कालिंद्याः उत्तरे तीरे वटस्य पूर्वदिग्भागे विक्रमशके ..."

षट्कुल = सहातीर : गंगा— यमुना— सरस्वती— प्रत्येकीं दोन तीर; मिळून सहा.

### नेपाळचा संकल्प

"जंबुद्वीपे आर्यावर्तान्तर्गतहिमवत्पर्वतैकदेशे वाग्मत्याः पश्चिमे तीरे पाशुपत-क्षेत्रे......"

### अयोध्येचा संकल्प

"आर्यावर्तान्तर्गतकौशलदेशे प्रमोदवने वराहउखरे सारस्वतक्षेत्रे नंदिग्रामे अयोध्यायाम् ब्रह्ममानसतीर्थे स्वर्गद्वारे विक्रमशके ......"

नंदीग्राम अयोध्येपासून १४ मैलांवर आहे. येथेच भरत रामाच्या पादुका स्थापून राहात असे.

ब्रह्ममानसतीर्थ = ब्रह्मदेवाच्या अश्रूंतून निघालेल्या शरयू नदीचें नांव.

स्वर्गद्वार = शरयू नदींतलें एक तीर्थ.

## गंगोत्रीचा संकल्प

"... जंबुद्वीपे आर्यावर्तान्तर्गतहिमालये देशे सुमेरुदक्षिणपार्श्वे केदारखंडे बद्रिकाश्रमे श्रीगंगोत्रीतीर्थे सूर्यकुण्डक्षेत्रे अद्यषष्टीसंवत्सराणाम् मध्ये ..."

## भटवाडीचा संकल्प

"... आर्यावर्तान्तर्गतक्षेत्रे सुमेरुदक्षिणपार्श्वे सूर्ये उत्तरायणे चन्द्रे दक्षिणायने मासानां मासे ..."

## जमनोत्रीचा संकल्प[१]

"... अद्यपर्वणि द्वितीये परार्धे कल्पमंत्रे जंबुद्वीपे भारतखंडे भारतवर्खे (र्षे) आर्जाबदाम क्षेत्रे ... केदारखंडे बद्रिकाश्रमे पारसोयी गंगाजमुनानिकटे (यमुना-क्षेत्रे) ... मासानुमासे उत्तमे मासे ..."

---

REFBK-0006246

१ बरेच संकल्प स्थानिक भिक्षुकांच्या तोंडी बसलेल्या भाषेत घेतले आहेत.

म.ग्रं.सं. ठाणे
विषय :
सं. क्र. :
REFBK-0006246